मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी
१९८६

के.मा, ए.म, गु.रु, ऑगो - 15 [illegible]

अनुक्रमणिका



विदर्भ
साहित्य
संघाचे
मुखपत्र

कै. गजानन त्र्यंबक उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर
(निधन – २७ नोव्हेंबर १९७६)

युगवाणी

आक्टोबर–नोव्हेंबर १९७६


अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, वणी शाखा द्वारा आयोजित

पहिले वैदर्भीय लेखिका संमेलन, दि. ६ व ७ नोव्हेंबर १९७६




अध्यक्ष
सौ. यमुनाबाई शेवडे



स्वागताध्यक्ष
सौ. विमलताई गोहोकर



परिसंवादाच्या अध्यक्ष
डॉ. सौ. शकुंतला खोत



संमेलनाध्यक्ष सौ. यमुनाबाई शेवडे यांचा विदर्भ साहित्य संघातर्फे ४ नोव्हेंबर १९७६ रोजी सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी सौ. शेवडे भाषण करताना. डावीकडून – डॉ. सौ. शकुंतला खोत, संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल', कवयित्री श्रीमती योगिनी जोगळेकर व सौ. उषा लिमये.

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

युगवाणी

आक्टोबर - नोव्हेंबर १९७६

कार्तिक – मार्गशीर्ष शके १८९८

संपादक : मधुकर आष्टीकर

कार्यकारी संपादक : वि. वा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये

वर्ष [illegible] अंक ७-८

संपादकीय

मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ।

कै. भाऊसाहेब माडखोलकर

सत्तावीस नोव्हेंबरला श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकरांचे दुःखद निधन झाले. मृत्यू, हा शरीराचा स्वाभाविक धर्म आहे आणि म्हणूनच नाशवंत शरीराबद्दल आसक्ती नाही. पण ह्या शरीराधीन चैतन्यांशाचे व्यावहारिक कर्मकौशलादी त्यामुळे कायमचे अंतरते ही सामाजिक खंत कशी नाकारता येईल ? भाऊसाहेबांचे शरीर नाश पावले, ह्याबद्दल म्हणूनच अख्या मराठी मनाला खंत आहे. भाऊसाहेबांच्या परिपक्व पत्रकारितेतून लाभणारा जीवनरस घेऊन फोफावणारे मराठी राजकारण, समाजकारण व साहित्यकारण आता काही काळ तरी अवरुद्ध झाल्यासारखे भासेल. त्यांचे निर्भीड व निःपक्ष मतप्रदर्शन राजकारणाला अंतर्मुख करीत असे. त्यांचे वाग्बाण आणि लिखाण दुर्बलांच्या वलवत्तर दुःखांना वेशीवर टांगून रूढिप्रिय तथाकथित समाजसुधारकांचे मुखवटे भेदीत असे. सभासम्मेलनांच्या व्यासपीठावरून आणि सभारंभीय अध्यक्षपदावरून दिलेला समयोचित इशारा साहित्याच्या जीवनलक्षी निकोप वृद्धीला भागीरथ साथ देत असे.

राजकारण, समाजकारण व साहित्यकारण ही त्रिमूर्ती अविभाज्य आहे. भाऊसाहेबांनी ह्यांपैकी कोणतेही अकारणच एकाकीपणे राबविले नाही; व ते तसे राबविता येणार नाही – हेही त्यांनी ठासून प्रतिपादिले. त्यांचे साहित्य सभोवारचा समाज व भोवणारे राजकारण विसरू शकले नाही. त्यांचे राजकारण, मराठी समाज व मराठी साहित्य अलग ठेवून कधी राबले नाही; नव्हे ह्या दोहोंसाठीच ते राबले हे सत्य आहे. मराठी समाजाच्या हिताची संयुक्त महाराष्ट्राची राजकीय मागणी साहित्याच्या व्यासपीठावरून त्यांनी केली ही एकच घटना ह्या अविभाज्य त्रिमूर्तिपूजनाची साक्ष नाही काय ?

विदर्भ साहित्य संघाला तर त्यांनी जीवापाड जपले. संघाला मिळालेली मोक्याची जागा, तिच्यावर उभी झालेली मुबलक वास्तू आणि तिला प्राप्त झालेली मातब्बर अनुदाने, ही केवळ भाऊसाहेबांच्या सर्वक्षेत्रीय प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाचेच प्रत्यंतर होय. म्हणूनच भाऊसाहेब निवर्तले

आणि ही वास्तू क्षणार्धात अवकळली — उदासली; पण लगेच सावरून तिनं भाऊसाहेबांच्या, तिच्या पुढ्यात क्षणभर विसावलेल्या अमर आत्म्याला आश्वासन दिले, की भाऊ ! ही वास्तू तुमचे ऋण विसरणार नाही. तुम्ही ज्या मूल्यांसाठी जीवनभर झगडलात तिचे अवमूल्यन होऊ देणार नाही. तुमचे आशीर्वाद घेऊन मराठी माणसाच्या वर्गविहीन व भेदभावरहित मंगल विचारांना प्रगत करीत व सामाजिक दुर्बल घटकांना क्रान्तिप्रवण करीत सर्व मानवजातीचे सर्वतोभद्र साधेल.

भाऊसाहेबांचे माडखोलकरीयांशी कौटुम्बिक नाते होते पण सर्वस्तरीय मराठी माणसांशी असलेले त्यांचे सामाजिक नाते त्या नात्यावर मात करून बसलेले अंत्ययात्रेच्या वेळी अनुभवले. माडखोलकरीयांच्या अंत:करणांतील शोकावेगांचे पूर ओसंडून वहाताना आढळले ते पौरजनांच्या लाखो मलूल मुखांवर ! त्या दिवशी अमंगळ मृत्यूलाही मांगल्य प्राप्त झाले त्या भाऊंच्या मरणाने.

भाऊसाहेबांना माझी, विदर्भ साहित्य संघाची आणि असंख्य मराठी मनांची विनम्र श्रद्धांजली !

सामान्यांसाठी जगलेला असामान्य साहित्यिक

कै. विनायक रामचंद्र उपाख्य भाऊसाहेब हंवर्डे, ह्यांच्या निधनाला १९ नोव्हेंबर १९७६ रोजी तब्बल एक तप लोटले. नाटककार, कादंबरीलेखक व पत्रकार अशा त्रिविध नात्यांनी साहित्य क्षेत्रात आपल्या उत्तुंग प्रतिभेने चमकलेल्या ह्या वैदर्भीय साहित्यिकाचा मृत्यू आजवर विस्मृति–जमा राहिला ह्याची आम्हाला दारुण खंत वाटते !

बडनेरला ह्यांचा जन्म झाला. मध्यमवर्गीय सामान्य हंवर्डे कुळात त्यांचा जन्म झाला. पण बाळपणापासूनच राष्ट्रीय संस्कार त्यांच्यावर झाले. त्यांनी तिशीच्या राष्ट्रीय आंदोलनात शाळा सोडली आणि पुढे ते खाजगीरीत्या मॅट्रीक झाले. ही राष्ट्रीय वृत्ती त्यांच्या नाटकांतून, कादंबऱ्यांतून आणि वृत्तपत्रीय लिखाणातून ठायीठायी प्रकट होते.

मुंबईला भागवतांच्या 'मौजे'चे ते संपादक होते. पण विदर्भाची, जन्मभूची सेवा घडावी म्हणून ते मुंबई सोडून नागपूरला आले. 'महाराष्ट्र', 'राष्ट्रदूत', 'किरण', आदी वृत्तपत्रे आणि 'उल्हास' वगैरे मासिके त्यांनी संपादिली आणि सामान्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी तनमनधने आयुष्य वेचले.

रंगभूमीच्या पडत्या काळात दूरदृष्टी ठेवून आणि प्रतिभेच्या जोरावर नवनवीन प्रयोग करून त्यांनी त्यावेळच्या नाटककंपन्या, नट आणि पर्यायाने मराठी रंगभूमी जगविली. भाटेबुवांच्या 'नाटच-कला प्रवर्तक'ने सुटसुटीत एक अंक एक प्रवेशी 'बिगारीचा बैल' हे त्यांचे विनोदी नाटक रंगभूमीवर आणले आणि त्यांचे दैन्य फिटले. आनंदसंगीत मंडळीने त्यांचे '१८५७' गाजविले, तर बेंजामिन फ्रँकलिनच्या नाटक कंपनीने त्यांचे 'होमकुंड' रंगभूमीवर नावारूपाला आणले. ह्या नाटक कंपन्या ह्या वि. रा. हंवर्डेंच्या नाटकावर बाळसे धरू लागल्या ही महत्वाची बाब होय. 'मराठी रंगभूमी' ही शिलेदारांची नाटक कंपनी हंवर्डेंची 'बाजीरावमस्तानी', 'अठरा अक्षौहिणी', 'कमळाच्या पाकळ्या' इत्यादी नाटके सतत प्रयोगांत गाजवीत असे. बाळ कोल्हटकरांची नाटके ह्या मराठी रंगभूमीवर मागे पडली आणि हंवर्डेंनी बाजी मारली ही घटना उल्लेखनीय होय.

नागपुरातील श्री. रामराव बाळबुधे, श्री. नाना रेटर वगैरे नट मंडळींना रंगभूमीवर गाजविले ते श्री. हंवर्डेंनीच ! पदरचा पैसा खर्चून त्यांनी नाटकमंडळी उभारली व उपासमारीने जर्जर झालेल्या नटांच्या तोंडी घास घातला. ते स्वत:ही नाटकांत कामे करीत असत; दिग्दर्शन देखील त्यांनी केलेले आहे.

साहित्य, समाजसापेक्ष असावे; राष्ट्रहिताची जाणीव लेखकाने ठेवावी; दीन दुबळ्यांचे प्रश्न व जातिवर्गभेदाधिष्ठित उग्र दलित–समस्या साहित्यिकाने आवर्जून जनतेसमोर मांडाव्या हे

अनुक्रमणिका

त्यांनी कृतीने आचरिले. ते सामान्य कुळात जन्मले, सामान्यांसाठी जगले पण असामान्य ठरले ! विदर्भ त्यांचा ऋणी राहील. त्यांच्या तेराव्या वार्षिक श्राद्धानिमित्त माझी व विदर्भ साहित्य संघाची त्यांना विनम्र श्रद्धांजली !

नाटचवेडे कै. तात्यासाहेब भोळे

'अरुणोदय' आणि 'सरलादेवी' ह्या गाजलेल्या नाटकांचे कर्ते कै. वा. वा. उपाख्य तात्यासाहेब भोळे दि. ४–१०–७३ रोजी मुंबईला निवर्तले आणि विदर्भ एका नाटचवेड्या रसिकाला मुकला. तात्यासाहेब व्यवसायाने वकील पण नाटक हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय. त्यांनी स्वतः नाटके लिहिली व नाटके बसविलीही. नागपुरात नाटचाची चळवळ खूप वृद्धिंगत व्हावी आणि नवनवीन होतकरू नट रंगभूमीच्या निकोप आणि सरस प्रगतीसाठी उपयोगी पडावे म्हणून त्यांनी पुढाकार घेऊन 'नाटच अकादमी' स्वरूपाचे 'अभिनव नाटचमंदिर' स्थापन केले. त्यांना नाटचाची व अभिनयाची प्रगल्भ जाण होती. तात्यासाहेब तालमींत कडक शिस्त पाळीत. एरव्ही सदा हसतमुख आणि लडिवाळ तात्या, तालमीचे वेळी प्रसंगोपात्त हिरवट तात्या पंतोजी होत. त्यांना नटांनी अभिनयात व पाठांतरात कुचराई केलेली अजिबात आवडत नसे. मुंबई पुण्याकडील नाटचसंस्था गाजाव्यात आणि नागपूर–विदर्भात गुणीजन असूनही ही कला त्यांच्याद्वारा राबविली जाऊ नये ह्याचे त्यांना वैषम्य वाटे.

ते उत्तम नाटचसमीक्षकही होते. इब्सेन हा त्यांचा आवडता नाटककार. आपली नाटके इब्सेनच्या नाटचतंत्रानुसार लिहिली आहेत ह्याचा ते अभिमानपूर्वक उल्लेख करीत. अभिनय दुर्लक्षून, केवळ साहित्यगुणांनी मंडित नाटचकृती त्यांच्या दृष्टीनं सरस ठरत नव्हती.

तात्या प्रेमळ होते, वत्सल होते – विदर्भ साहित्य संघावर त्यांचा असीम लोभ होता. तात्या म्हणजे मूर्तिमंत उत्साह व प्रसन्नतेचा निर्मळ निर्झरच ! त्यांच्या प्रती माझी व विदर्भ साहित्य संघाची विनम्र श्रद्धांजली.

––संपादक

विदर्भ साहित्य संघाच्या विद्यमाने

वणी येथे भरलेले पहिले वहिले वैदर्भीय महिला लेखिकांचे अभिनव सम्मेलन

दिनांक ६ व ७ नोव्हेंबर रोजी वणी येथे वैदर्भीय महिला लेखिकांचे सम्मेलन, विदर्भ साहित्य संघ शाखा, वणी द्वारा आयोजित केले गेले. अध्यक्ष होत्या, सुप्रसिद्ध कादंबरीकार व लघुकथाकार, संगीतप्रिय सौ. यमुनाताई शेवडे आणि स्वागताध्यक्ष होत्या, लोभस आणि प्रभावशाली व्यक्तिमत्वाच्या प्रेमळ, रसिकरागिणी सौ. विमलताई गोहोकर. सौ. गिरजाताई कीर ह्यांच्या हस्ते ह्या सम्मेलनाचे उद्‌घाटन झाले. विदर्भातून फार मोठ्या संख्येने लेखिका उपस्थित होत्या. कथाकथन, कविसम्मेलन व परिसंवाद ही कार्यक्रम त्रयी अत्यंत रोचक व यशस्वी झाली. विदर्भातील लेखिकांचा शोध व त्यांची उपयुक्त सूची ह्यानिमित्ते तयार झाली हा फार मोठा लाभ. हे सम्मेलन यशस्वी करण्यात प्राचार्य राम शेवाळकर, श्री. माधव सरपटवार, श्री. राजुरकर आदी वणीवासियांचे अपार श्रम खर्ची पडलेत. त्यांचे व सर्व लेखिकांचे मनःपूर्वक अभिनंदन !

––संपादक

अनुक्रमणिका

सहा लेख

गाथा व गजल देवीसिंग चौहान २५३; जनीचा विठू मानवतेचे एक प्रतीक विमल भालेराव २६८; अर्वाचीन मराठी काव्य 'परंपरां'च्या संदर्भात नरेन्द्र पोफळी २७१; द. चिं. सोमण पां. ब. गाडगीळ २७७; तिमिरातून तिमिराकडे जयन्त वाळकृष्ण कुळकर्णी २८६; निकाय : सर्वंकष क्रांतीचे अक्षर पीठ : ह. चं. घोंगे २९२.

तीन कथा

उत्तरा : अनुराधा केने २५९; बोल वघ प्रकाश जोशी २८०; हेल्पलेस सुरेश खेकाळे २८८.

अकरा कविता

कविता : दिलीप वसंत क्षीरसागर २५८; सावलीचे दुःख : ऋतुराज २७०; शांतता ! भाषा वधारतेय नंदा दारव्हेकर २७०; अतृप्त श्रीकांत नरूले; साक्षी अनुराधा केने; वादळ : धर्मराज निमसरकर; पहाट निरंजन उजगरे २७६; दोन कविता बजरंग सरोदे; वादळ सुलभा हेर्लेकर २८३; दिवा एक विझताना नीलकृष्ण देशपांडे २९१; कर्पूरवडी प्रमिला भागवत २९४.

एक ग्रंथपरीक्षण

मराठ्यांच्या इतिहासाची साधने पोर्तुगीज दप्तर : गो. वं. देगलूरकर २८४.

रसिक पत्रे २९१.

कार्यवृत्त ५९ ते ६३. **साभार पोच** ६३.

विशेष सूचना : निवडणूक–विषयक सूचना कार्यवृत्ताच्या पृष्ठ क्र. ६४ वर पाहावी.

दुरुस्ती

पृष्ठ	स्तंभ	ओळ	असे छापले	असे पाहिजे
२५५	दुसरा	वरून आठवी	भास्काचार्यांनी	यास्काचार्यांनी
२६१	पहिला	वरून सहावी	फोटो ते.	फोटो होते.
२६१	पहिला	वरून सतरावी	सन ले.	सन दिले.
२६३	दुसरा	खालून सहावी	आनन्द	अरुण
२८५	दुसरा	खालून दहावी	खरी व	खरी न

गाथा व गजल

देवीसिंग चौहान

प्राकृत लौकिक साहित्यातील गाथा व आधुनिक ईराणी साहित्यातील गजल ही दोन्ही अर्थसंधारणेच्या दृष्टीने इतकी जवळची, इतकेच नव्हे तर सूक्ष्म विचार करून पाहिले असता, एकरूप आहेत, असे स्पष्टपणे दिसून येते. गाथा शब्दाने येथे तुकारामादी संतांच्या गाथा अभिप्रेत नाहीत. तर येथे गाथा शब्दाचा संकेत गाथासप्तशती या प्राचीन गाथाकोशात आढळणाऱ्या आशय व अर्थाकडे आहे. गाथासप्तशती किंवा प्राचीन प्राकृतांतील मूळ गाहासत्तसई हा ७०० गाथांचा संग्रह असून त्यात प्राधान्येकरून श्रृंगारपर पद्यांचा संग्रह आहे. गाथासप्तशती प्राकृत वाङ्मयातील आद्य व अग्रगण्य ग्रंथ आहे. प्राचीन महाराष्ट्राच्या लैंगिक ग्रामीण जीवनाचे प्रामाणिक प्रतिबिंब यात उमटलेले आहे. विद्वानांनी, वाणभट्टानेही त्याची स्तुती केलेली आहे. अलंकाराची उदाहरणे म्हणून साहित्यशास्त्रज्ञांनी त्यातील गाथा उद्धृत केलेल्या आहेत.

या ग्रंथाच्या व इतर पार्श्वभूमीमुळे गाथा, गाहा शब्द श्रृंगारमूलकच आहे, असा समज निर्माण झालेला आहे. गाहासत्तसई हा संग्रह किंवा कोश इ. सनाच्या पहिल्या, दुसऱ्या शतकात सम्पादित झाला असा काल-निर्णय विण्टरनित्झ याने आपल्या भारतीय साहित्ये-तिहास ग्रंथात काढलेला आहे. या ग्रंथाच्या अनुकरणरूप, अशाच प्राकृत गाथांचा कोश जयवल्लभ या जैन कवीने शकाच्या ९ व्या शतकात वज्जालग्ग नावाने सम्पादित केला. गोवर्धनाचार्याने (मृत्यू, शक १०४७) संस्कृत भाषेत आर्यासप्तशती ग्रंथ स्वतःच्या अशाच आर्यांचा रचिला, व बिहारीलाल याने अशाच दोहरे – दोह्यांचा ग्रंथ शक १५८५ च्या पूर्वी लिहिला.

तसे पाहिले तर गाथा शब्द ऋग्वेदकालीन आहे. गा धातूपासून गाथ, किंवा स्त्रीलिंगी गाथा म्हणजे गीत या अर्थाने तो ऋग्वेदात अनेकवेळा प्रयुक्त आहे. गाथा शब्द उत्तरकालात छन्द या अर्थाने प्रयुक्त होत होता. पिंगलाचार्यांनी तो याच अर्थाने वापरल्याचे दिसून येते. नंतरच्या छन्दःशास्त्राच्या टीकाकारांनी गाथा शब्द म्हणजे आर्या किंवा गीति होय हे स्पष्ट केलेले आहे (पाहा जोगळेकर, पृ. ४६). गाथा छन्दात पहिल्या – तिसऱ्या चरणांत बारा व दुसऱ्या, चौथ्या चरणांत अठरा मात्रा सामान्यपणे असत. कधी कधी चौथ्या चरणात १५ मात्राही येत. मराठीत मात्र आर्या या अर्थाने गाथा शब्द रूढ नाही. आर्या, गीति, उप-गीति, उग्दीति, आर्यागीति इत्यादी शब्द आहेत.

गाथा साहित्य ढोबळपणे प्राचीन लावणी साहित्य होय असे म्हणता येईल. लावणी व गाथा यांत श्रृंगार, उत्तान व विप्रलंभ, हा सामान्य घटक असला, तरी गाथांची विदग्धता लावणीपेक्षा फारच वरच्या स्तराची आहे असे म्हणावे लागते. गाथा ग्रामीण जीवनातल्या असल्या तरी, त्यांच्या विदग्धतेमुळे त्यांना संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी कुरवाळले, जवळ केले व आपल्या साहित्यशास्त्रात मुक्त हस्ताने त्यांचा भरपूर समावेश केला. गाथांचा आपल्या शास्त्रग्रंथात वापर न करणारे दण्डी व रुद्रट हेच दोन आद्य साहित्यशास्त्रज्ञ. आनन्द-वर्धनाने आपल्या ध्वन्यालोकात (शक ८४० ते ८७०) गाहासत्तसईतील १५ गाथा समाविष्ट केल्या आहेत. त्याच्यानंतरच्या ११ साहित्यशास्त्रज्ञांनी आपल्या ग्रंथात सत्तसईतील गाथा अलंकाराची उदाहरणे म्हणून वापरल्या आहेत. पुनरावृत्ती जमेस धरून ७०० गाथां-पैकी ३३४ गाथा या शास्त्रज्ञांनी उद्धृत केलेल्या आहेत. यावरून साहित्य विश्लेपकांनाही मोहित करण्याची जादू या गाथात सामावलेली आहे, हे दिसून येते. गाथांच्या विदग्धतेचा हा ताम्रपटच होय.

वज्जालग्ग कोशाचा सम्पादक जयवल्लभाच्या शब्दांत गाथांचे मनोहारित्व असे सांगता येईल (जोगळे-कर, पृ. ४७) – ओठातल्या ओठात लाडिकपणे घोळलेले अर्धस्फुट बोल, विलासोन्मुख मुग्धेचे स्मित, आणि अपांगावलोकन याचे स्वारस्य प्राकृत गाथांच्या परि-शीलनानेच प्रत्ययास येते. गाथांचे स्वरूप प्रेयसीसारखेच

असते, सालंकृत, सुलक्षण व सौरभपूर्ण. गाथांचे अंतर्याम आणि महिलांचे अन्तःकरण यांचे मर्म रसिकांनाच उमजते. वरकामिनीप्रमाणेच दृढ परिचयावाचून गाथा आपले अन्तर्याम प्रकट करीत नाहीत. गाथा सारेच गातात, मात्र त्यांच्या रसाचा आस्वाद विदग्धांनाच घेता येतो. संस्कृत काव्य नागरी, तर प्राकृत काव्य, विशेषतः गाथा, या ग्रामीण, हे खरे. पण गाथांचे रस-ग्रहण ग्राम्य वृत्तीने करता कामा नये. विदग्धता हीच ग्राम्य व ग्रामीण यांमधील विभागरेषा. ललित व मधुर, शृंगारिक व युवतिजनप्रिय अशा गाथा उपलब्ध असताना संस्कृत काव्ये कोण पाहणार ?

धार्मिक हेतूसाठी गाइल्या जाणाऱ्या गाथांची परम्पराच आद्यकालीन आहे. वैदिक कालात ती निर्माण झाली. ती ईराण देशातही बद्धमूल झालेली होती. इ. सनपूर्व लिहिले गेलेले जरतुष्ट्र धर्मातील साहित्य गाथा या नावानेच ओळखले जाते. बौद्ध धर्माचे पाली भाषेतील साहित्य गाथा म्हणजे आर्या छन्दात लिहिले गेलेले आहे. धर्मपद, धम्मपद या बौद्ध ग्रंथातील पद्ये गाथाच होत. अशा रीतीने प्राचीन परम्परेचा विकास झालेला दिसून येतो. महाराष्ट्रातील संतांच्या अभंग-वाणीसंग्रहाला रूढ झालेले गाथा हे नावं याच प्राचीन परम्परेचे स्मारक आहे. इ. सनाच्या आरम्भकाली हीच गाथा छन्दाची परम्परा ऐहिक जीवन वर्णण्या-साठी सामान्य जनांनी स्वीकारली. त्याची परिणती निरनिराळ्या गाथा कोशापर्यंत पोचलेली आहे. प्रस्तुत प्रसंगी अशाच गाथांचा विचार कर्तव्य आहे.

ईराण देशाच्या प्राचीन धार्मिक साहित्यनिर्मितीस गाथा हे नाव रूढ असले तरी, या परम्परेचा विकास गजल, आधुनिक ईराणी साहित्यातील (शककाल ८०० च्या नंतर) या काव्यप्रकारापर्यंत कसाकसा होत गेला, हा इतिहास खण्डित व अप्राप्त आहे. अरब मुसलमानांनी ईराणी साम्राज्याचा निहावंद येथे शक ५५३ मध्ये पराभव केला. सासान सम्राट् यज्दगिर्द (सं. यज्ञकृत्) याचा शक ५७४ त शिरच्छेद करण्यात आला. पुढील दोनशे वर्षांत ईराणी धर्म, संस्कृती व भाषा यांचा उच्छेद करण्यात येऊन सर्व ईराण इस्लाममय झाला. या काळात ईराणातील कसलेच ईराणी साहित्य उपलब्ध नाही. शक ८०० च्या सुमारास याकूब विन लईस या सफ्फ़ार (लोहार) नेत्याने खलिफाविरुद्ध बंड पुकारून आपले स्वातंत्र्य सइस्तान प्रदेशात प्रस्थापित केले. याच्या काळातच नव ईराणी साहित्याच्या निर्मितीस आरंभ झाला. पुढील शतकात समरकंदहून राज्य करणाऱ्या सामानी राजवंशाच्या अमदानीत ईराणी साहित्यवृक्षाने मधुर फलपुष्पे धारण केली. याच काळात गजल या काव्यप्रकाराने मूळ धरले.

नवीन ईराणी काव्याचा आरंभ दक़ीक़ी याने केला व त्याच्यानंतर अर्ध्या शतकाने फिर्दौसी याने महा-भारततुल्य शाहनामा हे महाकाव्य निर्माण केले (मृत्यु शक ९४७). याच काळात गजल लेखनाचा विकास होत होता. पहिला प्रख्यात गज़ल–गो (गजल कवि) शेख़ सअ़दी होय. त्याचा जन्म शक १०९८ (हिजरी ५७१) व मृत्यु शक १२१४ (हि. ६९१) मधील होत. आरंभीची गज़ल परमार्थपर होती. जसजसा हा काव्य-प्रकार लोकप्रिय व प्रसृत होत गेला तसतसे त्याला ऐहिकत्व, शृंगारप्रधानता येत गेली. शेख़ सअ़दी सूफी-मनश, परमार्थप्रवण वृत्तीचा होता. वासनायुक्त प्रेमाची खंत बाळगू नकोस; पारमार्थिक सिद्धी गाठणाऱ्या सोपानांची ती एक पायरी आहे. अशा ऐहिक व पर्यायाने कामुक गज़ल रचणाऱ्यावर सअ़दीने आसूड उगारलेले आहेत. (पाहा :– दिवेकर पृ. ९ व १४).

बदलत्या काळाबरोबर गजलच्या स्वरूपात होणाऱ्या परिवर्तनाचा प्रवाह थांववता आला नाही. गज़ल वरचेवर अधिकाधिक ऐहिक व शृंगारप्रधान बनत गेली. ईराणी भाषेत गज़ल गो असलेला नामांकित भारतीय कवी म्हणजे अमीर खुस्रो. त्याचे देहावसान शक १२४७ त (हिजरी ७२५) झाले. एका परीने सअ़दी व खुस्रो हे, काहीसे, समकालीन होत. त्यानंतर ईराणात शीराज शहरनिवासी हाफ़िज़ हा कविकुलगुरु होऊन गेला. त्याचे देहावसान शक १३११ त (हिजरी ७९१) झाले. सअ़दीनंतर महाकवी हाफ़िज़ एका शतकाने उत्तरकालीन आहे. त्याने कसलेच कथाकाव्य (मस्नवी) किंवा महाकाव्यही लिहिलेले नाही. त्याच्या ३–४ शे गजलांचा एकच दीवान–गज़लसंग्रह आहे. एवढ्याच त्याच्या काव्यसंपदेवर तो कविकुलगुरुपद भूषवीत आहे. तो खऱ्या अर्थाने गज़ल–सम्राट आहे.

ईराणी गजल हा काव्यप्रकार आहे. गजल हा छन्द नव्हे. कोणत्याही वृत्तात गजल करता येते. ईराणीत पद्यांचा प्राथमिक घटक म्हणजे दोन ओळींचा

शिअर किंवा बेत. श्लोकार्ध म्हणजे मिसरअ. पहिल्या दोन मिसऱ्यांचे जे यमक तेच प्रत्येक शिअराच्या दुसऱ्या मिसऱ्याचे. गजलचे आणखी एक वैशिष्टच असे की प्रत्येक मिसऱ्यात वेगवेगळा विषय असतो. अर्थात् अर्थ व मुद्याच्या दृष्टीने प्रत्येक मिसरा स्वयं अर्थपूर्ण, स्वावलंबी व स्वयंपूर्ण असतो. त्याच्या मुद्याचे सूत्र दुसऱ्या मिसऱ्यात अडकलेले नसते. शेवटच्या शिअरात कवी आपली मुद्रा किंवा तखल्लुस वापरतो. नाममुद्रा ही भारतात व ईराणात स्वतंत्रपणे निर्माण झालेली व चालत आलेली परम्परा आहे. भारतात ती, काही लोक समजतात तशी, ईराणातून मुसलमानांच्या माध्यमाने आलेली नाही.

गज़ल शब्दाची व्युत्पत्ती

गजल शब्द गाथा शब्दापासून व्युत्पन्न आहे, असे दिसून येते. संस्कृतमूल त वर्णाचे रूपान्तर प्राकृतात च ध्वनीत होते. हा नित्याचा अनुभव आहे. सत्य शब्दाचे सच्च, साच, साच; नृत्त शब्दाचे नच्च, नाच इत्यादी तद्भव रूपे चिरपरिचित आहेत. गाथा शब्दाचे रूपान्तर या पद्धतीने झाले असावे. थ ध्वनीचे रूपान्तर छ ध्वनीत होणे नियमानुसारी ठरते. परंतु असे झाल्याचे गाथा सप्तशतीत आढळत नाही. गाथा शब्द गाहा असा परिचित झालेला आहे. मात्र सं. रथ्या शब्दाचे रच्छा असे तद्भवीकरण गाथासप्तशतीत आढळते. रच्छा हे परिवर्तन रच्छासु (क्रमांक ११९), गामरच्छासु (२४१), रच्छा (३९३) गामरच्छाए (४१९), ओच्छाअअं (अवरथ्योदकं ६२१), रच्छाओ (६२३), रच्छामुह (रथ्यामु खं. ६८२) असे दिसून येते. प्रदीर्घ समासात मात्र रथ्या शब्दच कायम राहिलेला दोनदा आढळून येतो (गाथा १४०, १९०).

पाली वा प्राकृतात सर्वच आकारान्ताचे अकारात रूपान्तर होते. बौद्धधर्माचे मोठे केंद्र तक्षशीला, गांधार, समरकंद, बुखारा (सं. विहार) व खोतान प्रदेशात राहिलेले असल्याने आकारांचा अ होण्याची प्रवृत्ती या प्रांतांत सर्वत्र रूढ होती. राजाधिराज या उपाधीचे या प्रदेशातील रवतिराज हे रूप नाण्यावर शककालाच्या आरंभापासून प्राप्त आहे. म्हणून गाथांना गाहन, गाच्छान, गछन, गजल, अशी रूपे विकसित होणे प्रवाहप्राप्त आहे. शिवाय ईराणी भाषांत महाप्राण नाहीतच. म्हणून छ ध्वनी ज ध्वनीत रूपान्तरित होतो. ह ध्वनीचे ज ध्वनीत रूपान्तर होण्याची प्रक्रिया अवेस्ता भाषेत सर्वत्र दिसते. सं. हस्त शब्दाचे ज़स्त, होता शब्दाचे जोता, हिरण्य शब्दाचे ज़र अशी रूपान्तरे सर्वत्र अवेस्तात आढळतात. म्हणून गाथानं गहनं, गजल असे रूप परिणत झाले असावे. न, र, ल हे ध्वनी भारत-युरोपीय कालापासून परस्पर परिवर्तनीय आहेत. हे ध्यानी घेतल्यास गजल शब्द गाथा शब्दाचे समकाय व समार्थ रूप आहे असे म्हणावे लागते.

भास्काचार्यांनी आपल्या निरुक्तात **"अयानन्वितेऽर्थे प्रादेशिके विकारे अर्थनित्य परीक्षेत केनचिद् वृत्तिसामान्येन"** सांगितल्याप्रमाणे गाथा व गजल यांचे अर्थनित्यत्व ध्यानी घेतल्यास, हे दोन्ही शब्द वृत्तिसामान्यत्वाने सगोत्र असल्याचा निर्णय क्रमप्राप्त ठरतो. जरतुष्ट्र धर्माच्या गाथा, गांधारी धर्मपद व पालीतील गाथा, गाथासप्तशतीची परम्परा या गोष्टी पाहिल्या म्हणजे गाथा व गज़ल यांच्या अर्थनित्यत्वाचा अडीच हजार वर्षांचा इतिहास डोळ्यांसमोर येतो.

ईराणी गज़ल

भारतीय गाथेच्या जशा धार्मिक व ऐहिक, श्रृंगारिक अशा दोन धारा उपलब्ध आहेत, त्याचप्रमाणे ईराणीत प्राचीन काळी धार्मिक गाथा व उत्तरकाळी भक्तिपर व शृंगारिक गजल असे दोन प्रवाह दिसून येतात. भारतीय गाथेत पती व पत्नी, प्रेयसी यांचे प्रेम, विरह, मीलन, सुखद अनुभव, पत्नी प्रेयसी कोप विरहव्यथा यांचे वर्णन असते. परंतु आधुनिक ईराणी गजलचे क्षेत्र संकुचित व साचेबंद झालेले आहे. भारतात स्त्री ही प्रेम–विषय आहे. ईराणात मिसूर न फुटलेला साकी, मअशूक, छोकरा असा पुल्लिंगी मअशूक आहे. या प्रथेचे कारण, मुगल तुर्कांची ईराणी देशावरील राजकीय सत्ता हे होय. शक ११८० मध्ये चंगीजखान याचा मुलगा हलाकू हा बगदादचा सुलतान बनला. मध्य आशियातील तुर्कांत अगम्यगमनाची दुष्ट प्रथा होती. गुलामाची देखणी पोरे या कामी उपयुक्त होती. म्हणून पुरुष मअशुकाची चाल रूढ झाली. याचा परिणाम गज़ल कृत्रिम बनण्यात झाला. ईराणी साहित्यातील श्रृंगाराची उल्लेखनीय गोष्ट म्हणजे प्रेमिकाची तपस्या, विरह, यातना व निष्ठुर मअशूक या वर्णनाची साचेबन्द पद्धती हे गज़लचे तंत्र बनलेले आहे. प्रेमिक हा विलासप्रिय तर असतोच. त्याला यामिनी, कामिनी, मधू, ज्योती व वारुणी यांच्या विश्वात वावरावयाचे असते. भोग्य वस्तूंचे गोडवे

अनुक्रमणिका

गाणारा कवी मात्र, प्रणय किंवा मीलनाचे वर्णन करताना विरहयातना यांना बळी पडलेला असतो, मअशुकाचा निर्दय जुलुम व आशिकाच्या प्रेमापायी यातना सहन करणे ही ठराविक पद्धती बनलेली आहे. (दिवेकर पृ. १५).

ईराणीत श्रृंगार हा मीलनसुखप्रधान कधी नसतोच. स्त्रीदेहाधिष्ठित शृंगारवर्णन ईराणी गजलेत वर्ज्य आहे. कुचकुंभ ईराणीत वावरत नाहीत. कारण हे वर्णन पुरुष मअशुकाला उपयोगी पडत नाही. मुख, नख, लब (ओठ), आबरु (सं. भ्रूलता) नयनबाण (तीर) यांची वर्णने, समान अवयवांमुळे चालू शकतात. मुख लालह् पुष्पासारखे असते. केश सुंबल फुलासारखे मृदू व कृष्णवर्ण, नयन नर्गिस पुष्पासारखे असतात. गुलाब (गुल), कपोल व ओष्ठ हे यांचे उपमेय होय. लालह, सुंबुल, नर्गिस व गुल हे पुष्पचतुष्टय सौन्दर्योपवनाच्या विरहाचा आनंद देते.

भारतीय गाथेत स्त्रीपुरुष लैंगिक जीवनाच्या मनोविश्लेषणरूपी अगणित... विविधरंगी अंगांचे दर्शन होते. गाथांच्या या तुलनेने ईराणी आधुनिक गजलेचा प्रान्त फारच सीमित व संकुचित बनलेला आहे. तीच अवस्था उर्दू गजलेची. जे ईराणीत पिकते ते उर्दूत खपते. उर्दू साहित्याचा मूळ प्रेरणास्रोत ईराणीचाच आहे. अरबी भाषेत गजल कधीही नव्हती व आजही नाही. ही उर्दू साहित्यातील शक १७२५ च्या नंतरची विकसित अवस्था. हे परिवर्तन दिल्ली लखनौच्या धर्माभिमानी साहित्यिकांनी हेतुपुरःसर घडवून आणले. परंतु जुन्या उर्दूत अथवा दक्खिनी हिन्दीत हे दृश्य दिसत नाही.

दक्खिनी हिन्दी

दक्खिनी हिन्दीत भारतीय गाथाच वावरते आहे. भारतातील हिन्दू मुसलमानांच्या राजकीय व सांस्कृतिक, जिवंत व ज्वलंत प्रश्नाच्या सुयोग्य आकलन व उकलीसाठी दक्खिनी हिन्दीचे चार शतकांतील (शक १३०० ते १७००) साहित्य अत्यंत उपयुक्त आहे. पण ईराणी–उर्दू लिपीमुळे ते सामान्य भारतीय विद्वानांनाही अगम्य बनलेले आहे. या दक्खिनी हिन्दीतील सर्व साहित्य व गज़ल ही भारतीय परम्परेतीलच आहेत. येथे प्रेयसी स्त्री आहे. भाषेतील अलंकार भारतीय परम्परापूत आहेत. भारतीय काव्यसंकेतांचाच सर्वत्र वापर करण्यात आलेला आहे. मुसलमानांचा, निदान महाराष्ट्रातील तरी मध्ययुगीन सूफीपंथ (भक्तिमार्ग) मराठी साधुसंतांच्या भक्तिपंथाने प्रभावित आहे (पाहाः- चौहान पृ. १३८,१५२). दक्खिनी हिन्दीतील गज़लेबद्दल येथे जास्त परंगूळ लावणे इष्ट नाही. तरी या भाषेतील गजलेत स्त्रीच्या स्तनाला किती स्थान आहे हे समजावे म्हणून, हाशमी बीजापूरी (मृत्यु शक १६१९ हिजरी ११०९) याच्या गज़लेतील एक शिअर विद्वज्जनांला पेश करीत आहे. यात छत्रपति शिवाजीचा उल्लेख आला आहे.

मैं यूं कहा कुछ कर तेरे ले हात में कुच, दंद करूं
कई–सच सिवा ने दंद किया कोकन के गड बलकाए पर

मी असे म्हणालो – काही तरी करून तुझे कुच, स्तन हातात घेऊन मी (तुझ्याशी) दंद, द्वंद्व–युद्ध करीन. ती म्हणाली – खरोखरच कोकणाचे गड बळकावल्यावर शिवाजीने (चांगलेच) युद्ध केले. या श्लोकात हाशमीने प्रियकरास शिवाजीची, प्रेयसीस कोकणची, कोकणाच्या वक्षःस्थळी असलेल्या गडांस प्रेयसीच्या कुचद्वयाची उपमा दिलेली आहे. प्रियकराच्या प्रश्नास होकार न देता तो टाळलेला आहे. व शिवाजीने कोकणचे गड हस्तगत करून जोरदार युद्ध केले असे सांगून, तिने प्रियकरास अपन्हुतीने अनुकूलता दर्शविलेली आहे. भाषेतील मराठीपणही लक्ष्य आहे (चौहान पृ. २२). दक्खिनी हिन्दी भाषेतील गज़लेची निरनिराळी अंगे पाहाण्यासाठी अभ्यासूंनी वरती सांगितलेला लेख पाहावा.

गाथा व गज़ल

गाथा व गज़ल ही मनुष्याच्या प्रेम, सुखदुःखानुभूती यांच्या आविष्काराचा प्रान्त आहेत. हे आविष्करण व्यक्ती, देश व काल या सर्वांना व्यापणारे आहे. शककालाच्या पहिल्या शतकातील गाहासत्तसई व शकाच्या चौदाव्या शतकाच्या पहिल्या पादात होऊन गेलेल्या महाकवि हाफ़िज़शीराजी यांच्या गाथा, गज़लांतही हे आविष्करण समाईक असलेले आढळते. येथे सप्तशतीतील काही गाथा व हाफ़िज़ कवीच्या गज़लातील काही शिअरांचे विषयसाम्य पडताळून पाहावयाचे आहे. आरम्भी प्राकृत गाथा, तिची संस्कृत छाया व शेवटी गजलेचा शिअर दिलेला आहे. सं. छाया टीकाकार गंगाधरभट रचित आहेत.

तिलोत्तमा

पेछन्ति अणिमिसच्छ पहिआ हलिअस्स
पिट्ठपण्डुरिअम् ।
धूअ दुध्दसमुत्तरन्तलच्छिं विअ सअहणा ।। ३८८
प्रेक्षन्ते ऽ निमिषाक्षाः पथिका हलिकस्य
पिष्टपाण्डुरिताम् ।
दुहितरं दुग्धसमुद्रोत्तरलक्ष्मीमिव सतृष्णा ।।

दळताना अंगावर पीठ उडाल्यामुळे शेतकऱ्याच्या तरुण मुलीच्या शरीरावर पाण्डुरता आलेली आहे. दुग्धसमुद्रातून निघणाऱ्या लक्ष्मीकडे देवांनी पाहिले असेल त्याप्रमाणे वाटसरू हिच्याकडे अनिमिष व सतृष्ण दृष्टीने पाहात आहेत.

ज़ अिश्क़-ई ना-तमाम-ई मा जमाल-ई
यार मुस्तग्नी स्त
ब-आबो-रंगो-ख़ालो-ख़त चिह् हाजत रूए-जेबा रा

माझ्या या अपूर्ण प्रेमामुळे माझ्या प्रेयसीच्या सौंदर्यात कसली संपन्नता येणार आहे ? जे रूपसुंदर असतात त्यांना गुलाबाचे अत्तर, रंग लेपने व चित्ररेखन त्यांची गरज कशाला ?.

कालिदासाचा श्लोक सर्व परिचित आहे.

सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यं
मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ।
इयपधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् ।।

सौन्दर्यपिपासा

जस्स जहं चिअ पढमं तिस्सा अङगम्मि
णिवडिआ दिट्ठी
तस्स तहिं चेअ ठिआ सव्वङ्गं केण वि ण
दिट्ठम् २३४
यस्य यत्रैव प्रथमं तस्या अङ्गे निपतिता वृष्टिः ।
तस्य तत्रैव स्थिता सर्वाङ्गं केनापि न दृष्टम् ।।

तिच्या ज्या अवयवावर ज्याची पहिल्यांदा दृष्टी पडली, ती तिथेच खिळून राहिली. (दुसऱ्या अवयवाकडे पाहण्याचे भानच राहिले नाही). यामुळे तिचे संपूर्ण सौंदर्य कोणीच पाहिले नाही.

मन अज़ आँ हुस्न – रोज़ – अफ़ज़ूं कि यूसुफ़
दाश्त दानिस्तम्
कि अिश्क़ अज़ पर्दए – अिस्मत विरूँ आरद
जुलैख़ा रा.

जुलैखा ही ईजिप्त देशाच्या राजाची राणी. पैगंबर यूसुफ हा अपूर्व सौन्दर्यवान युवक. त्याचे सौन्दर्य चंद्राच्या कलेप्रमाणे अनुदिन वाढते होते. म्हणून जूलैखा युवतीचे प्रेम तिच्या पातिव्रत्याचा पडदा फाडून बाहेर पडले. या गोष्टीचा जगात बोभाट झाला. येथे हाफिज़ गाथेपेक्षा अधिक अर्थगर्भ आहे हे सहज ध्यानी येते.

स्थितप्रज्ञ

अवमाणिओ वि ण तहा दुम्मिज्जइ सज्जणो
विहवहीणो
पडिकाऊं असमत्थो मणिज्जन्तो जह परेण ।। ३२०
अवमानितो ऽ पि न तथा दूयते सज्जनो
विभवहीन ।
प्रतिकर्तुमसर्थो मान्यमानो यथा परेण ।।

ज्याच्या जवळ कसलेही (बाह्य) वैभव नाही अशा सज्जनाचा कोणी अपमान केला, तरी त्याला मनोव्यथा होत नाही. इतरेजन त्याच्यात प्रतिकाराची शक्ती नाही, असे मानत असले तरी त्याची त्याला खंत नसते.

हाफ़िज़ ब – ख़ुद न पोशीद ईं ख़िर्कए–मय
–आलूद
अय शेख़ काय – दामन मअज़ूर दार मा रा

हे हाफिज शराब वारंवार पीत राहिल्याने आपली शराबीने मलिन झालेली गोधडी लपविण्याचा प्रयत्न करू नकोस (आपला स्वीकारलेला मार्ग सोडू नकोस, आपल्या ध्येयापासून च्युत होण्याचे कारण नाही). अरे ! (तथाकथित) शुद्धाचरणी शेख, साधु, वाटल्यास तूं मला अशक्त, असमर्थ समजू शकतोस.

अमृतस्रावी

दढरोसकलुसिअस्स वि सुअणस्स मुहाहि विप्पिअं
कत्तो
राहुमुहम्मि वि ससिणो किरणा अमअ चिअ
मुअन्ति ३१९
दृढरोपकलुपितस्यपि सुजनस्य मुखाद्विप्रियं कुतः
राहुमुखेऽपि शशिनः किरणाः अमृतमेव मुञ्चन्ति

अत्यंत क्रोध येऊन मन कलुपित झालेले असले तरी सज्जनाच्या मुखातून अप्रिय शब्द कसे निघतील ? आपल्याला मिळावयास आलेल्या राहूच्या मुखातसुद्धा चंद्राचे किरण अमृताचाच वर्षाव करितात. (प्रियकर

स्पष्ट झालेला असला तरी तुझा रहस्यस्फोट किंवा प्रेमभंग करणार नाही.)

अगर दुश्नाम मी – गोई वगर नफरीँ दुआ गोयम्
जवाब – ई तल्ख् मी – जेबद लब – ई लअ्लो
–शकरखारा

जर माझा मअ्शूक् मला शिव्या देत असला तरी, फार चांगले केलेस म्हणून त्याची स्तुती करणे मला जमले नाही, तरी मी त्याला दुआ जरूर देईन. कठोर उत्तर देणे बिम्बाधर व शर्करामुखासच शोभून दिसते.

अभिन्नस्वभाव

वसणाम्मि अणुव्विग्गा, विहवाम्मि अगव्विआ, भए धीरा
होन्ति अहिण्ण सहावा समेसु विसमेसु सप्पुरिसा ।। ३८०

व्यसनेऽनुद्विग्ना विभेव ऽगर्विता भये धीराः
भवन्त्यभिन्नस्वभावाः समेषु विषमेषु सत्पुरुषाः ।।

सत्पुरुष दुर्दैवाच्या फेऱ्यात उद्विग्न होत नाहीत, वैभवप्राप्तीमुळे गर्विष्ट होत नाहीत, संकटात धैर्याने वागतात, परिस्थिती अनुकूल असो अगर प्रतिकूल असो, तीमुळे त्यांच्या स्वभावात बदल होत नाही.

हंगाम – ई तंग – दस्ती दर अैश कोश – दस्ती
कीँ कीमियाए – हस्ती क़ारून कुनद गदा रा

जीवन कुण्ठित झालेल्या आणीबाणीच्या प्रसंगी, तसेच ऐश्वर्याच्या भरभराटीत, मुक्त हस्ताने वागणाऱ्या फकिरास, परमेश्वराने जीवनाचे हे कसले रसायन प्रदान केलेले आहे!

शेवटी शृंगारप्रधान असलेल्या व टीकाकारांनी शृंगारिक दृष्टीने पाहून अधिक शृंगारिक बनविलेल्या गाथासप्तशतीतील स्त्रीपातिव्रत्याच्या घालून दिलेल्या आदर्शाचा उल्लेख करू.

हसिअं अदिट्ठदन्तं, भमिअमणिक्कन्तदेहलीदेसम्
दिट्ठमणुक्खित्तमुहं एसो मग्गो कुलवहूणम् ।। ५२५
हसितमदृष्टदन्तं भ्रमितमनिष्क्रान्तदेहलीदेशम् ।
दृष्टमनुत्क्षिप्तमुखमेव मार्गः कुलवधूनाम् ।।

हसायचे, पण दात दिसू द्यावयाचे नाहीत, फिरावयाचे, पण ते घरातल्या घरात, उंबरठा ओलांडावयाचा नाही, पाहावयाचे, पण मुख वर न उचलता. ही वागणूक कुलवधूंची. घरंदाज स्त्री हे समाजाचे अन्तर्याम.

भाद्रपद १५, १८९८.

संक्षेप व सन्दर्भ

जोगळेकर – **गाथासप्तशती,** स. आ. जोगळेकर, पुणे श. १८७८.

दिवेकर – **सअ्दीकृत बोस्तान,** गु. व्यं. दिवेकर, मुंबई श. १८९५.

हाफिज – **दीवान – ई हाफिज,** हैद्राबाद, इ. १९४२.

चौहान – **दक्खिनी हिन्दीतील इतिहास,** मुंबई, श. १८९५.

कविता

दिलीप वसंत क्षीरसागर

शब्द लेखणीतून घसरतात कोऱ्या वहीवर
पण त्यांना अर्थ असतोच असे नाही
कधी ते घरंदाज बाईसारखे अव्वल असतात
वर कधी रांडेसारखे निर्लज्ज होतात

कधी इतके कोवळे होतात
की चिमणी होऊन टिपून घ्यावेत
असल्या फसव्या शब्दात शहाणी माणसे अडकणे
हा शब्दांचा दोष नाही.

उत्तरा

अनुराधा ज्ञा. केने

विवाह हे काटयांत हसणारं गुलावाचं फूल आहे की कोळचाचं जाळं? तलम सुंदर पण त्यात एकदा अडकलं की मृत्यूशिवाय दुसरा मार्गच नाही.

उत्तरा आपल्याच विचारात गढून गेली होती. भाकरीचं पीठ मळता मळता तिचे हात मध्येच थांवले होते. तिच्या सुकुमार गौर चेहेऱ्यावर चुलीतील जाळाचा उजेड पडल्यामुळे वेगळीच मनोहर छटा तिच्या रंगाला आली होती. तिचे चकाकते टपोरे डोळे विचारात हरवून गेले होते. घामाने डवरलेला तिचा चेहेरा दवांनी भिजलेल्या गुलावाच्या फुलासारखा दिसत होता.

पोरींची ताटं काढायची होती. उष्टी खरकटी काढून घ्यायची होती. अजून सासरे जेवायला आले नव्हते. भूक लागून गेली होती तिला, पण उंबऱ्यातच सासू शेजारणीशी गप्पा मारत वसली होती, आणि तिचा निलाजरा वेशरम नवरा शेजारच्या खोलीत डाराडूर झोपला होता; रात्र झाल्यासारखा.

क्षणभर उत्तराला आपल्या दिनक्रमाचा, आयुष्याचा, सगळचाचा कंटाळा आला. या क्षणी हे सारे संपून जाईल तर किती चांगलं, असं तिला वाटत होतं. पण तोच तिला त्या अमृतमय संजीवक स्पर्शाची आठवण झाली.

फुलासारख्या नाजुक उत्तराला घरीसुद्धा ढीगभर कामे उपसावी लागत होती. वाळपण, निरागस वाळपण – किती कौतुक होतं त्या बाळपणाचं. पण कळायला लागल्यापासून सदैव कुजकी नासकी वोलणी खावी लागली होती तिला. ती मुळातच सोशिक होती. त्यावेळीसुद्धा तिने कधी तक्रार केली नव्हती. उलट तेव्हाही ती सतत हसतमुख असायची. कामे आटोपून वेळेवर शाळेत जायची. किती लाडकी होती ती शाळेत सर्वांची! वाईंची, सरांची, सगळ्या शाळेची. देखणी मनमिळावू उत्तरा खेळाची, कला कौशल्याची, अभ्यासाची, गाण्याची, सारी वक्षिसे स्टेजवरून घेऊन जायची तेव्हा सगळचांच्या कौतुकाने भारलेल्या नजरा तिच्यावर खिळलेल्या असायच्या. प्रत्येक वेळी टाळ्यांच्या कडकडाटात तिचे स्वागत होई, आणि ती परत फिरे तेव्हा आणखी जोराचा कडकडाट होत असे. त्या वैभवाने तसा गळा कापला, या वैभवाने असा. उत्तराच्या मनात पुन्हा कडवट विचार आला. ती पुन्हा विचारात हरवून गेली.

त्या दिवशी पोखरापूरचे इनामदार वक्षिससमारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. खेळ, गाणे, परीक्षा या सर्वात पहिले वक्षीस मिळवणारी उत्तरा एकदम त्यांचा मनात भरली, आपल्या एकट्या उनाड मुलासाठी. उत्तरेच्या घरची परिस्थती अगदीच गरीब आहे आणि तिला सावत्र आई आहे हे कळल्यावर त्यांनी मुळीच विलंब लावला नाही. हा धूमधडाका लग्नाचा! मानपानाच्या गडवडीत नवऱ्या मुलाकडे विशेष कोणी पाहिलेही नाही. कशी तरी वाहेर काढायची ती. इतक्या इतमामाने गेलेली पाहून उत्तरेच्या वडिलांचा जीव समाधानाने भरून आला. इनामदारांची अफाट शेती, गुरावासरांनी भरलेला वाडा; हाताखाली दहावारा नोकर – त्यातून नवीन सून इनामदारांची फारच लाडकी – यामुळे उत्तरेच्या आईचा मात्र अगदी जळफळाट झाला. शुक्राच्या चांदणीसारखं लखलखीत रूप सदाशिवच्या वाटचाला आलं होतं. पण लग्नविधी होईपर्यंत सदाशिव नुसता वखवखलेल्या डोळचांनी तिच्याकडे पाहात होता. तिच्या स्वप्नातील देखणा, ऐटवाज, तिच्या रूपाने भुलून जाणारा, तिला जीवापाड जपणारा, आतुर प्रियकर, जीवनसाथीदार, ज्याच्या एकाच आशेवर तिनं आपलं सारं जीवन घालविलं होतं, तो साथीदार होता कुठे? त्याऐवजी एक वखवखीत प्रेमहीन वासनामय व्यक्तिमत्व तिचं स्वामित्व वळकावून वसलं होतं. आता तडफडणं हे एकच जीवन उरलं होतं; इथंच मरणही.

लग्नाच्या पहिल्या रात्रीच सदाशिवनं त्या फुलाचा चोळामोळा करून टाकला. तिच्या सौंदर्याचं

गुणांचं जराही चीज, कौतुक त्याच्या नजरेत दिसलं नाही. त्याच्या दृष्टीने त्याची जशी मोटरसायकल, तशीच बायको.

एकामागून एक चारही मुलीच झाल्या उत्तरेला. साऱ्याच तिच्या रूपाचा वारसा सांगणाऱ्या, पण स्वभावाने अगदी आपल्या बापाच्या वळणावर गेलेल्या. उत्तरेच्या मनात वात्सल्य फुलण्याच्या आतच करपून गेलं. उरलं ते रुक्ष कठोर कर्तव्य.

उत्तरेचं रूप जराही ढळलं नव्हतं. प्राजक्ताच्या ताज्या फुलासारखी ती टवटवीत दिसायची. तिचे हात चटाचट काम उरकायचे. ओठांच्या कोपऱ्यात सदैव ते स्वर्गीय हास्य उमललेले असावयाचे. पण तिच्या डोळ्यातील अवखळ उत्तरा या बंदिस्त परावलंबी जीवनात कायमची हरवून गेली होती.

तिच्या मोठ्या नणदेला लग्नानंतर १२ वर्षांनी प्रथमच दिवस गेले होते. पण माहेर खेडेगावात असल्यामुळे तिचा इंजिनिअर नवरा तिला इकडे पाठवायला मुळीच तयार नव्हता. त्या दोघांनी मिळून इनामदारांनाच गळ घातली होती की तीन महिन्यांसाठी उत्तरेलाच इकडे पाठवून द्या. घरात एका नोकराखेरीज कोणीच नव्हते. आणि सुमनला – तिच्या नणदेला आपल्या आईपेक्षाही अधिक विश्वास वहिनींचाच होता. शिवाय आपल्या घरात आपल्या वहिनीचं अगदी पोतेरं होत आहे याबद्दल तर तिला नेहेमीच खंत वाटत होती. दवाखान्यात किती दिवस राहावं लागेल हे अनिश्चित होतं. उत्तराच्या मुलींना आईपेक्षा आजीचाच लळा अधिक होता. लाडक्या लेकीच्या आणि जावयाच्या पत्राप्रमाणें इनामदार एकटेच उत्तरेला कोल्हापूरला मुलीच्या घरी पोहोचवून परत निघून गेले होते. शहरचा आधुनिकपणा, नणदेच्या घरचं मोकळं वातावरण, त्या दोघांना तिच्याविषयी वाटणारा विलक्षण जिव्हाळा, त्यामुळे इथे तिला अगदी मोकळेपणी श्वास घेता येत होता. किती कुचंबणा व्हायची तिची घरी! पोरींच्या गराड्यात, सासू–सासऱ्यांच्या सेवेत दिवस, तर नवऱ्याचा सेवेत रात्र. अगदीच बांधल्यासारखं झालं होतं तिला तिथं. इथं आल्यापासून मात्र ती मजेत होती. सुमनचे प्रत्येक डोहाळे हौसेने पुरवीत होती. तिला चांदण्यातलं वनभोजन; नौकेतील वनभोजन; रोज एक नवीन बेत करून पार पाडत होती.

अजून जवळ जवळ तीन आठवडे तिला अवकाश होता. पण तपासायला मात्र आठवड्यातून दोन वेळा जावं लागत असे.

ताज्या मोगऱ्याचा गजरा सुमनच्या वेणीवर माळता माळता तिच्या मनात विचार आला. "किती फुलासारखं जपतात हिला! किती एकजीव झालेत दोघं. असाच संसार आपणही केला असता. इतका मोकळेपणा आपल्याला मिळाला असता तर – सदाशीवसारख्या पत्थरालाही आपण पाझर फोडला असता. मुलांना फुलासारखं वाढवलं असतं."

पण स्वतःच्या जीवनावर तिची सत्ता कधीच नव्हती, आणि आता तर तिने विचार करणेंच सोडून दिले होते.

एवढ्यात गाडीचा हॉर्न वाजला. उत्तरा वळली. तेवढ्यात सुमनने दोन टपोरी सपर्ण गुलाबाची फुले तोडली आणि उत्तराच्या काळाभोर भरगच्च डौलदार अंबाड्यावर माळली. त्या पूर्ण सौंदर्याकृतीकडे पाहाता पाहाता आनंदच्या मनातही विचार आला. "दैवाने हिची गाठ सदाशिव बरोबर का बांधली असेल?"

त्या दोघीही गाडीत चढल्या. त्याने गाडी दवाखान्याकडे घेतली. राजारामपुरीच्या प्रशस्त रस्त्यावरून गाडी शिवाजी चौकाकडे धावू लागली. महाद्वार रोडवरील एका गजबजलेल्या दवाखान्यासमोर उभी राहिली.

अरुण क्लिनिक
डॉ. अरुण देशमुख
M. D.
स्त्रीरोगतज्ञ.

गाडीतून उतरताच दरवानाने आदबीने सलाम केला. आणि त्या दोघींना डॉक्टरांच्या खोलीकडे नेले. ६–७ स्त्रिया आपल्या क्रमांकाची प्रतीक्षा करीत बाहेर उभ्या होत्या. उत्तराकडे त्या पाहातच राहिल्या. एवढ्यात गाडी पार्क करून आनंद आला आणि त्या दोघांपाठोपाठ उत्तराही आत शिरली. समोरच टेबलावर काही औषधांच्या जाहीरातींची पुस्तकं पडली होती. समोरच्या भिंतीवर शांतता पाळा असं सांगणारी पांढऱ्या ड्रेसमधील नर्सची तसबीर होती. एका हसऱ्या बाळाचं ग्लॅक्सोचं कॅलेंडर होतं. खुर्ची रिकामीच होती.

एकवार या सगळ्यावर नजर फिरवून उत्तरा मान खाली घालून बसली. या अरुण भावोजींच्या डॉक्टरी कौशल्याच्या अनेक कथा अनेकवार या दोघांच्या तोंडून तिने ऐकल्या होत्या. आणि त्याच्या घरातील अल्बममध्ये त्याचे आनंदवरोवर काढलेले वरेच फोटो होते.

इतक्यात वाजूचे दार वाजले. उत्तराने नजर वर उचलून पाहिले. "चला वहिनी आधी तपासून घ्या." असे म्हणून अरुणने हसतमुखाने आनंदशी हस्तांदोलन केले. सुमन, तिच्या पाठोपाठ आनंद, अरुण, तिघेही आत गेले. दार आपोआप लागले गेले. वाहेर उत्तरा एकटीच राहिली.

थोड्या वेळातच शब्द कानावर आले. सगळं नॉर्मल आहे. फक्त अशक्तपणा फार आहे. पूर्ण विश्रांती घ्यावी लागेल. काळजी करण्यासारखं काही नाही. निदान मी असताना तरी – डॉक्टरांनी भरघोसआश्वासन दिले.

"शिवाय आता आई येणारच असतील ना?"

"आई नंतर येईलच. वहिनी आलीय्.

"असं असं"–पण मग त्याने मागे वळून पुन्हा विचारले, "कोण आलय् ?" "उत्तरा वहिनी! वाहेर खुर्चीवर आहे."

त्या दोघांच्या तोंडून उत्तरेची वरीच स्तुती त्याने ऐकली होती. मनोमन तिची एक तसवीर त्याने रेखाटली होती. तिला पाहण्याची त्याला वरीच उत्सुकता दिसली.

दार उघडताच त्याची नजर समोर गेली. भरघोस अंवाड्यावर पिवळ्या गुलावाची दोन सपर्ण फुले हसत होती. मालकिणीच्या सौंदर्यात भर घातल्याचं समाधान त्यांच्याही चेहेऱ्यावर दिसत होतं. कानावरून रेशमी पिंगट वटा भिरभिरत होत्या. उन्नत गाल, रेखीव भुवया, भांगाची सरळ रेघ आणि केसांची मोहक मेहरप! एखादा उत्फुल्ल गुलाव तर नाही आला चुकून इथे? त्याला संभ्रम पडला.

क्षणमात्र आपण एखाद्या वादळात उभे आहोत असा त्याला भास झाला.

पण चटकन् नजर वळवून तो आपल्या खुर्चीवर जाऊन वसला. या समुद्राचा ठाव लागणं अगदी कठीण आहे, असं त्याला उगीचच वाटलं.

कोणीही पागल व्हावं अशी ही रूपसंपदा. जीव कुर्वान करावा अशी ही दौलत!

"काय मग? यांची खूप काळजी घ्यावी लागेल!" तो उत्तरेकडे पाहात म्हणाला.

क्षणमात्र ती मासोळीसारखी चपळ नितळ नजर डॉक्टरांच्या डोळ्यांकडे वळली. अधरांच्या कळ्या अस्फुट उमलल्या. त्या स्वर्गीय हास्याचा प्रकाश सगळीकडे पसरल्यासारखा झाला.

अत्यंत मधुर आवाजात अस्फुट उत्तर आलं, "हो ना डॉक्टर."

ती अधिक मोहक की तिचा आवाज? हे त्याला ठरविता आलं नाही.

"अच्छा, मग काय घेणार तुम्ही लोक?"

सराइतपणे विषय वदलत त्यांनी विचारले.

"अरे सद्गृहस्था, आता काही नको. तूच ये ना संध्याकाळी!"

"हो हो अगदी अवश्य येइन. वहिनींना वेडरेस्ट, त्यामुळे पाहुण्यांना पाहुण्यांकडूनच पाहुणचार घ्यावा लागणार."

"अरे, कोण पाहुणे?" आनंद उद्गारला.

"उत्तरा वहिनी पाहुण्या? की तू? एकदम परकं झालं घर? एका पाहुण्यामुळे? ब्रम्हचारी गृहस्थ तू, सरळ जेवायलाच ये ना?"

"वरं झालं वोलावलंस, –वाहेरच्या जेवणाला अगदी कंटाळलोय मी. आणि वरं का, तुमच्या पाककलेची, वाढण्याची, स्वभावाची, इतकी इतकी तारीफ केलीय या लोकांनी! मला तर वाटायचं की खोटंच बोलतायत् हे लोक – प्रेमापोटी"

"पण आज समजलं, खोटंच वोलत होते हे लोक" – क्षणभर अरुण थांवला. तिघांच्याही नजरा अरुणच्या नजरेकडे वळल्या.

"तुमचं एक शतांशही वर्णन करता आलं नाही– कठीणच आहे ते म्हणा."

उत्तरेची नजर कृतज्ञतेने भरून आली. या अभावित प्रशंसेने ती सुखावली. वोलणाऱ्याचा प्रामाणिकपणा तपासण्याची गरजच नव्हती मुळी. आपलं म्हणणंच खरं ठरलं अशा अर्थाने सुमन आणि आनंद एकमेकांकडे

पाहून हसली. उत्तराची नजर खालीच होती, अतीव संकोचाने.

या एकाच रस्त्याने स्त्रीच्या हृदयात पुरुष प्रवेश मिळवू पहातो का? पण तिच्या नवऱ्याला तर याची अजिबात गरज वाटली नव्हती. एक काळा ढग सरकन् तिच्या चेहेऱ्यावरून सरकला. अरुणच्या दृष्टीतून ते निसटलं नाही.

"बाहेर लोक खोळंबलेत. निघतोच आम्ही आता", असे म्हणत म्हणत आनंद–सुमन निघाले. उत्तरा आधीच बाहेर पडली होती.

उत्तराच्या जाण्याने त्या खोलीतील सारे चैतन्य हरविल्याचा भास त्याला झाला.

त्याने बाजूला खिडकीतून पाहिलं. गाडीत चढणाऱ्या उत्तराची व त्याची पुन्हा नजरानजर झाली. एक प्रसन्न लाजरंबुजरं स्मित तिच्या लाजऱ्या बुजऱ्या नजरेतून आणि कमालीच्या मोहक नाजूक अधर-पाकळ्यांतून उमललं.

क्षणभरच अरुणला वाटलं, आपण अतिशय दरिद्री आहोत. आणि उत्तरा सम्राज्ञी आहे. तिच्या अलौकिक व्यक्तिमत्वाच्या प्रकाशामुळे त्याला दिपून गेल्यासारखे झाले. दुसऱ्या क्षणी त्याला मघाच्या त्या काळ्या ढगाची आठवण झाली, तिच्या दैनंदिन जीवनाच्या कल्पनेनेही तो व्याकुळ झाला. पुन्हा पुन्हा त्याला सुमनचे उद्‌गार आठवू लागले.

"उत्तरावहिनी, म्हणजे हिरा आहे हिरा. पण आमच्या दादांनी तिचं अगदी पोतेरं पोतेरं केलंय्."

क्षणभर त्याला वाटलं द्रौपदीची कथा खरी असावी. पाच पतींनी भोगूनही तिचं कौमार्य अभंग राहिलं होतं. कमळाच्या पानावरील बिंदूप्रमाणे या संसारातही उत्तरा अलिप्तच राहिली होती. 'स्वर्गीय' हे एकच विशेषण तिला लावता येत होतं.

जेवणाच्या खोलीत आनंदाला उधाण आलं होतं. टेबलावर चमच्यांनी ठेका धरला होता आणि हसण्यांनी हॉल भरून गेला होता.

अनावर कुतूहलाने उत्तराने डोकावून पाहिले. तोच हसरा चेहेरा, रेशमी केस, मिष्किल नजर, मर्दानी धारदार नाक.

एखाद्या पुरुषाकडे डोळे उघडे ठेवून पाहण्याची तिची ही पहिलीच वेळ होती. त्या दर्शनाने अंतरंगात कुठे तरी खळबळ माजत होती. कधी काळी तारुण्याच्या पहिल्या बहारात ज्याची स्वप्नं पाहिली होती तोच हा. उत्तरा क्षणमात्र बावरून गेली. प्राणांच्या पायघड्यांनी ज्याचे स्वागत करायचे होते त्याच्याकडे नजर उचलून पाहाताही येत नव्हते! कुणी तरी म्हटलंय ना? 'परवशते, तुझे नाव स्त्री!'

उत्तरेच्या रूपवैभवाने दिपून गेलेल्या तिच्यातील स्वभावसिद्ध मार्दवाने भारावलेला अरुण नकळत तिची प्रत्येक डौलदार हालचाल निरखीत होता आणि लक्षात येताच पटकन नजर वळवीत होता.

तिचे गोरे गुलाबी हात – ती शांत गहिरी नजर– त्याच्या स्वप्नांच्या कोंदणातला हिरा एकदम प्रकाशमान झाला होता.

तो एक डॉक्टर होता.

माणसाची त्याला पारख होती.

त्याला मनं ओळखता येत होती.

उत्तराचं रितं, अतृप्त जीवन, मन त्याला व्याकुळ करत होतं.

सासरी आल्यापासून प्रथमच उत्तरा मोकळी अशी बाहेर पडत होती. तो मोकळेपणा तिला मानवला होता. आल्हाददायक वाटत होता.

पोरांचा कोलाहल, घरचा जाच; नवऱ्याचा निरुत्साही आक्रमक प्रणय, या साऱ्यांचा तिला खरोखर वीट आला होता. या जीवनात एक प्रकारचा मोकळेपणा होता, खळखळत्या नदीसारखा, वाहत्या वाऱ्यासारखा. तिला तो फार आवडला होता.

"चला खेळणार पत्ते?"

त्या आमंत्रणाने ती गोंधळली. ती म्हणाली, "मला नाही येत खेळायला." हल्लीच्या मुलींमध्ये न आढळणारा तो संकोच विनय लज्जा – या वाक्याने व आविर्भावाने, अरुण मुग्ध झाला.

"मी शिकवेन ना."

अत्यंत हळुवारपणे तो म्हणाला.

क्षणभर आपली टपोरी नजर त्याच्या चेहेऱ्यावर तिने खिळवली. नाही – या नजरेत – या आवाजात पुरुषी वासनेचा जराही स्पर्श नव्हता. तिला विश्वास वाटला.

हळू हळू ती समोर येऊन बसली.

मोकळेपणाने खेळू लागली. एखाद्या विनोदावर मोकळेपणाने स्मित करू लागली.

एखादाच मोजका शब्द ती उच्चारत असे. पण त्यातही तिच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटत असे.

तिच्या अंबाड्यावरील मोगऱ्याच्या गजऱ्याने सारे वातावरण धुंद झाल्यासारखे अरुणला वाटले.

हृदयाचा तळातून फुटणारी, पण ओठात अडलेली, पापण्यात उमललेली त्याची हाक आपल्यासाठीच आहे याची जाणीव तिला तिथे झाली. त्याच्या हळुवार आवाजाने मागे प्रयत्नपूर्वक दडवलेलं भावनांचं तुफान तिला स्पष्ट दिसलं. क्षणमात्र तिला वाटलं, या आवेगात स्वतःला लोटून द्यावं. त्या हाकेला प्रतिसाद द्यावा. एकाच उत्कट आलिंगनात साऱ्या जन्माची तृप्ती मिळवावी.

"टाका ना पान.

"अं!" उत्तरा एकदम स्वप्नातून जागी झाल्यासारखी उद्गारली.

इतक्यात आनंद म्हणाला,

"सुमन कॉफी करतेस?"

पण उत्तर दिलं ते उत्तराने.

"कशाला असं आडवळणांनी विचारताय्? सांगा ना कॉफी हवीय म्हणून."

"मी निघतो वाबा. पावणे अकरा झाले आणि वहिनींना विश्रांतीची फार गरज आहे." अरुण म्हणाला.

इतक्यात उत्तरा कॉफी घेऊन आलीच.

आपल्या वहकणाऱ्या मनाची खंत वाटून, भीती वाटून म्हणा, अरुण चटकन निघून जायला संधी पाहात होता.

पण नेहमीच्या सवईप्रमाणे धाड धाड जिना उतरत असतानाच शेवटच्या दोन पायऱ्या राहिल्या असताना त्याचा पाय घसरला आणि स्वतःला सावरायच्या आतच त्याचे डोके समोरच्या भिंतीवर आदळले. खोक पडली. आः आः! असा दुःखार्त उद्गार काढून तो खाली बसला.

आनंद क्षणमात्र हतबुद्ध झाला. सुमन मटकन खुर्चीत बसली. धावली ती उत्तरा, वीजेसारखी. एका क्षणात ती त्याच्या जवळ पोहोचली.

त्याच्याच जवळचा रुमाल घेऊन तिने त्याच्या डोक्यावर घट्ट बांधला. पुन्हा वर जाऊन थंड पाणी, बँडेजसाठी स्वच्छ कापड आणि वाटीत चमचाभर हळद घेऊन आली.

थंड पाण्याने जखम पुसून त्यात हळद भरून पुन्हा कापड व्यवस्थित बांधलं. तिच्या कृतीतील हळुवारपणा, तत्परता, आत्मविश्वास, सफाई, याचं अरुणला मनापासून कौतुक वाटलं. तिच्या त्या निकट सान्निध्यात त्याला आधार गवसल्यासारखा वाटला.

"तुझ्या घरातून जखमी होऊन जाईन असं वाटलं नव्हतं वाबा", अरुण निर्विकल्पपणे म्हणाला. पण ती डोळ्यांची भाषा उत्तराला समजली असावी. एकच क्षण काळ्या ढगांनी तिचा चेहरा व्यापून गेला. पण दुसऱ्या क्षणी तिचे भावनिर्भर हास्य चमकले.

"जखमेवर पट्टी बांधून जाल असं तरी वाटलं होतं?"

तिच्या उत्तराने चकित होण्याची पाळी आता त्याची होती.

"थोडक्यात निभावलास म्हणून वरं. चल मी सोडतो तुला घरी. दवाखान्यावरूनच जाऊ" – आनंद अरुणला म्हणाला.

"कशाला?"

"बँडेज करावं लागेल ना पुन्हा?"

"बँडेज? बँडेज कशाला?"

"हे बँडेज अगदी परफेक्ट आहे. उद्यापर्यंत जखमेचं नावही रहाणार नाही; वण मात्र राहील."

त्या वाक्याने उत्तरा एकदम अंतर्मुख झाली.

आनंद अरुणला घेऊन गेला. उत्तरा सुमनला झोपवायला तिच्या खोलीत घेऊन गेली.

पंधरा मिनिटात त्याला पोहोचवून येणारा आनंद तब्बल अर्ध्या तासाने आला; तोही अरुणला बरोबर घेऊनच. त्याला दार उघडायला उत्तरा खाली आली. चालताना आनंद गुडघ्यात वाकत होता. वेदना असह्य झाल्यामुळे त्याने बाहेरच्या खुर्चीतच बसकण मारली होती. डॉक्टर अरुणला पाहताच ती म्हणाली, "डॉक्टर बाबू, घर तर तुमचंच होतं. कशाला घाई केलीत." "म्हणे उत्तरावहिनींना संकोचल्यासारखं होईल. काही तरीच. तरी वरं लहानपणापासून आपण

एकत्रच वाढलोत. आणि वहिनींचा स्वभाव असा आहे, की गडचा माणसांपासून त्या सगळचांना आपल्याच वाटतात. शिवाय घर काय लहान आहे आपलं? इतरांना अडचण व्हायला? पण दुसऱ्याला स्वत:साठी काही करू देईल तर शपथ!"

"इथं तू राहिलास म्हणून काही बिघडत नाही. वहिनींना काही कामाचा त्रास व्हायचा नाही. घरी रोज २४ माणसांचं करायची सवय आहे त्यांना."

"म्हणूनच म्हणत होतो रे; इथं तरी चार दिवस त्यांना विश्रांती मिळाली असती." ती दोनच वाक्ये – पण उत्तराच्या वाळवंटासारख्या रुक्ष जीवनाचं त्यांनी क्षणार्धांत नंदनवन करून टाकलं – "कशाला माझा त्रास? नाही तर त्या म्हणतील, 'चार दिवस जाऊन नाही झाले तोच पाहुण्यांनी घातला गोंधळ.'"

संभाषण आपल्यावर येतय् हे पाहताच उत्तरा म्हणाली.

"चांगलं ओळखता बरं माणसांना तुम्ही!"

अरुण वरच्या जिन्यालगतच्या खोलीत झोपायला गेला. उत्तराही स्वत:च्या खोलीत गेली.

सकाळचं खाणं आटोपताच आनंद कामावर निघून गेला. न्हालेले लांब सडक केस पाठीवर मोकळे सोडून उत्तरा गच्चीवर आली पांढऱ्या साडीमध्ये. दिवस वर आला होता. सूर्योदयाच्या आत ती नेहेमी तुळशीला पाणी घालून जात असे. आजही ती नेहेमी-प्रमाणे आली. तुळशीला कुंकू वाहिलं. दिवा लावला. मनोभावे हात जोडले. डोळे मिटले.

"कशासाठी वशिला लावताय देवाजवळ?"

त्या आवाजाने उत्तरा विस्मयचकित झाली. विस्मयाने तिने तोंड फिरविले. आरामखुर्चीवर अरुण कसलेसे पुस्तक वाचीत पडला होता. आपण आल्या-पासून तो आपल्याकडे पाहात असावा या जाणीवेने उत्तरा अर्धमेली झाली.

तिचा संकोच पा न अरुण पटकन म्हणाला, "त्याचं काय आहे, रोजची पहाट डोळे भरून पाहिल्या-शिवाय मनाला समाधानच वाटत नाही."

"चांदणं काय सुरेख होतं रात्री?"

"तर काय, डॉक्टरसाहेब रात्रभर तीच शोभा पहात होते वाटतं?"

"हो, म्हटलं पाहावं इथे तरी चैन पडते का?

"का? झालं काय इतकं बेचैन व्हायला? इतकीशीच ना जखम? तरी डॉक्टर आहात!"

"या जखमेची खोली तुला नाही उमजणार उत्तरा," अरुण उद्गारला. या एकेरी उल्लेखाने उत्तरा चपापली. ती तडक खाली आली ती थेट स्वयंपाक-घरात. त्यानंतर तिने बाहेर पाऊल टाकले नाही.

दुपारी अरुण आणि आनंद बरोबरच जेवले. जेवण होताच आनंद आपल्या कामाला निघून गेला. सुमन आपल्या खोलीत झोपली होती.

दुपारी कपडे वाळत घालायला जेव्हा उत्तरा वर आली तेव्हा तिने आधीच जिन्यातून पाहिले. भिंतीच्या तुटपुंज्या सावलीत आरामखुर्ची टाकून अरुण विसावला होता. जरा निरखून पाहताच तिला जाणवलं. त्याच्या मिटलेल्या डोळ्यांचा कडा ओल्या आहेत. आणि त्याच्या गालावरून अश्रू ओघळत आहेत. तिला एकदम वाईट वाटलं.

पण वरकरणी हसून ती म्हणाली, "काय करताय एकटेच बसून?" हसत हसतच अरुण उत्तरला, "या झाडाला कहाणी सांगतोय माझी."

"का एवढा एकच मित्र आहे वाटतं?"

"हो, मी सांगितलेलं दुसऱ्यांना न सांगणारा, एवढा एकच."

"खोटं अगदी खोटं, –अहो यांनीच तर मला सांगितलं!"

"काय?"

"एक माणूस एकटंच वर येऊन माझ्याशी बोलतोय् म्हणून!

"काय बोलतोय् हे नाही सांगितलं?"

"अ हं – काय काय सांगेल तो तरी?"

"एवढं तरी सांगायला हरकत नव्हती की एक देखणं माणूस एका वेड्या माणसाला वेड लावून गेलंय्."

"आणि त्या वेड्या माणसाला पाहाण्यासाठी त्या देखण्या माणसाचे डोळे सारखे भिरभिरत असतात हेही त्याला कळलंय."

"प्लीज डॉक्टर – पुढं काही एक बोलू नका."

" कां खोटं आहे हे ?"

" सगळ्या खऱ्या गोष्टी बोलायलाच हव्यात असं थोडंच आहे ?"

" जे खरं आहे ते लपवावं तरी कां ?"

" काय, ऐकाल खरं ?"

" सांगशील ते, तुझ्या बद्दलच्या माझ्या भावना बोलताना मला अजिबात संकोच वाटत नाही. तूही मोकळेपणाने बोल ना !"

" मी एक स्त्री आहे, आई आहे चार मुलींची. एका नादान बेजबाबदार नवऱ्याची बायको आहे. लग्नाच्या पहिल्या रात्रीपासून बलात्कार सहन करणारी. संशयी गुदमरविणाऱ्या वातावरणात क्षण क्षण घालविणारी, रोजचा दोन्ही वेळेचा घास न घास सासूच्या नजरेच्या पहाऱ्यात अश्रूबरोबर गिळणारी. लादलेल्या मातृत्वाला अंतरीच्या ओलाव्याने जगवू पाहाणारी. काय मिळणार आहे तुम्हाला हे सर्व ऐकून ?"

"तुम्हाला पाहिलं आणि वाटलं, सात जन्म ज्या पावलांबरोबर चालावसं वाटत होतं ती हीच पावलं. ज्यांच्या चरणधुळीत जीवन उजळून निघालं असतं ते हेच चरण. ज्यांच्या शुभाशीर्वादाखाली चिरशांती मिळाली असती ते हेच माणूस. परिस्थितीने माझ्याच रूपागुणांकडून माझं जीवन उधळून उध्वस्त करून दिलं आहे.

" तोंडातून एक शब्द जरी काढला तरी नरकात खितपत पडण्याची भीती. बदचालीची ठरेन मी. पोटभर रडावं म्हटलं तर तेसुद्धा शक्य नाही." ओंजळीत तोंड लपवून उत्तरा घळघळा रडायला लागली.

अरुण चटकन खाली गेला.

दुपारचा चहा घेता घेता तो निमुटपणे उत्तरेच्या चेहेऱ्याकडे पाहात होता. मघाच्या वादळाचा तिचा चेहेऱ्यावर मागमूसही नव्हता. पण तिच्या अंतरीच्या व्यथा तोच जाणू शकत होता. पण त्याने व्यथित होण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हता. इतक्यात सुमनने शांततेचा भंग केला. "वहिनी, आज संध्याकाळी बाहेर जायचंय बर का ! ध्यानात ठेव."

" काय दाखवणार आहात आज कोल्हापुरातलं तुमच्या वहिनींना ?" उत्तरा हसत हसत प्रश्नार्थक चेहेरा करीत म्हणाली. पण ते हास्य चेहेऱ्यावर आणायला तिला बरेच प्रयास पडले होते.

" पिक्चरला जाऊ या आज."

एवढ्यात अरुण उठला. "बराय वहिनी, आता मात्र दवाखान्यात जायलाच हवय्. आज मात्र जेवायला नाही येणार. आनंदलाच रात्री घरी पाठवा. चलतो मी."

"या जखमी अवस्थेत कशाला एकटे घरी जाताय ? पुन्हा हे आम्हाला रागावतील बरं !" सुमननं म्हटलं.

त्यांनी राहावं असं उत्तरेलाही वाटत होतं. पण तिनं काहीच म्हटलं नाही. खाली मान घालून ती गप्पच बसली. अरुण निघून गेला. तिला पुन्हा घर रिकामे झाल्यासारखे वाटायला लागले.

सुमनने तिला म्हटले, "वहिनी आवर ना ग लवकर ! मला परत नाही सिनेमाला जाता यायचं. संध्याकाळी हे घरी यायच्या आत आपण तयार व्हायला हवय्."

सुमनच्या गळ्यात प्रेमभराने हात टाकत ती म्हणाली, ' खरच ग बाई; पण राजाराणीच्या मध्ये मी कशाला ? तुमचीच मी अगदी छान तयारी करून देईन."

"नको वहिनी, या अवस्थेत त्यांच्या बरोबर सिनेमाला जायला मला नाही बरं वाटत. आपण दोघीच जाऊ या ना !"

"नको हो नको, आज दोघंच जा ना ! एक माणूस सगळं सगळं ऐकतं म्हणून मी नाही ऐकायची बरं !" उत्तरा उद्गारली.

" बरं बरं फार नको चेष्टा करू, ह्यांनी आग्रह केल्यावर कशी नाही म्हणशील ते पाहातेच मी."

" शपथ आहे तुम्हाला, मला संकटात नका टाकू बरं. आज डोकं फार दुखतंय, नुसतं पडून राहावसं वाटतंय."

" थांब वहिनी, मी तुला छान चहा करून देते. एखादी गोळी घे अॅनॅसिनची, बरं वाटेल. डॉक्टर खूप प्रकारचा गोळ्या ठेवून गेले आहेत. एखादी त्यातली गोळी घे."

"नको खरंच नको. तुम्ही चटकन तयार व्हा बरं. मागून नाराज कराल त्यांना."

मोठ्या नाराजीने सुमन तयार झाली.

आज उत्तरेच्या उद्वेगाचा कडेलोट झाला होता. स्वतःवर काबू ठेवणे तिला अशक्य वाटत होते. असहाय होत होते.

क्षणभर तरी परंपरा, पातिव्रत्य, लौकिक, या सर्व गोष्टी बाजूला ठेवाव्यात, कांही चूक नसताना वाट्याला आलेल्या शापित आयुष्याबद्दल पोटभर रडून घ्यावे. अरुणच्या स्नेहार्द्र डोळ्यांत स्वतःला हरवून टाकावे अशी उत्कट इच्छा होत होती. तर दुसऱ्या बाजूला आपल्या मनाच्या कमकुवतपणाबद्दल स्वतःचाच तिला राग येत होता.

सुमन आनंदबरोबर बाहेर पडताच तिने थेट गच्चीचा आश्रय घेतला.

ध्यानी मनी नसताना मनाची जखम भळभळ वाहात होती. असहाय होतं सारं. पण सहन करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

संध्याकाळच्या त्या कातर प्रकाशात त्या गच्चीचाच आश्रय तिला दिलासा देऊ शकत होता.

दुपारची आरामखुर्ची तिथेच पडली होती. शेजारीच उन्हाचा चष्मा पडला होता.

उत्तराला एकाएकी भरून आले. ती हमसाहमशी रडायला लागली. दुःखाचा असहाय भार हलका करण्याचा तो एकमात्र उपाय तिच्याजवळ होता. ज्याचा तिथे ती निसंकोच आश्रय घेऊ शकत होती.

"शांत हो उत्तरा, शांत हो." अरुण उद्गारला.

अरुणची बोटं हळुवारपणे तिच्या मस्तकावरून फिरत होती. त्या स्पर्शाने तिच्या मनाला सांत्वना मिळत होती. पण एक दोन क्षणातच विलक्षण आत्मबलाने संयम करून उत्तराने आपले अश्रू पुसले. चेहेरा बदलला. आणि आवाजात सहजता आणीत ती म्हणाली,

"पहा बरं कसं गोंधळात पाडलंत! जेवायला येत नाही म्हणालात. मी काहीच तयारी केली नाही. आता जर उशीर झाला तर म्हणाल की काय रीत? पाहुण्यांना पोटभर जेवायलाही घालत नाहीत." आणि चटकन ती जायला जिन्याकडे वळली. अरुणचा चेहेरा कोमेजून गेला होता. ती जायला निघाली. क्षणमात्र त्याला तिच्या आत्मसंयमाचं कौतुक वाटलं. तिच्या असहाय परिस्थितीबद्दल करुणा वाटली.

"इतके का दुतोंडी आहोत आम्ही उत्तरा, की नावं ठेवण्याखेरीज आम्हाला काही येतच नाही असं वाटतं का तुला? नको असलेल्या पुरुषाबरोबर राहावे लागल्याने तुला सारेच तसे वाटतात कां?"

त्या उल्लेखाने तिचा अभिमान डिवचला गेला. अनवधानाने त्याने वर्मावर बोट ठेवले होते.

हृदय पिळवटून तिच्या तोंडातून उद्गार निघाले,

"डॉक्टर बाबू, पत्थरालासुद्धा देव समजून पूजणाऱ्या आम्ही बायका, देवब्राह्मणाच्या साक्षीने ज्याच्या गळयात माळ घालतो त्याच्याशी जन्मोजन्म बांधून घेतो स्वतःला, ते त्याच्या रूपावर वा संपत्तीवर भुलून नव्हे – धर्म म्हणून. दिवसभराच्या खस्ता खातानाही, त्या वणव्यात तहान असते ती एका प्रेमळ नजरेची. पहाडासारखा आधार समोर दिसावा लागतो तेव्हा इतरांचे शिव्याशापही फुलासारखे होतात. रागद्वेषातूनही अमृत फुलवितो आम्ही. पण हे काहीच न समजणारा, नुसतीच वासनेची वखवख असणारा, वापरून फेकून देणारा नराधम भेटला तर सोन्यासारख्या आयुष्याची माती होताना उघड्या डोळयांनी बघावी लागते. तापल्या तव्यावर उभा जन्म काढावा लागतो, न कुरकुरता."

"हे सारं करताना संवेदना ठार माराव्या लागतात डॉक्टर बाबू, सारे कढ आतल्या आत गिळावे लागतात. आलेल्या निष्प्रेम जीवनाचे घाव झेलावे लागतात. पुरुष जातीने आमचा केलेला हा सर्वांत मोठा सन्मान आहे. स्वतःच्या आखीव सीमेपलीकडे गेलेली स्त्री स्वतःच मृत्यूला कवटाळते. नाही तर आप्त पुढे सरसावतात. आणि सारा समाजही ही जबाबदारी आनंदाने पत्करतो."

उत्तरेच्या चेहेऱ्याकडे अरुण टक लावून पाहात होता. समाज, रूढी, पातिव्रत्य, या सर्वांचा केवढा मोठा बोझ होता या शिरावर! आणि या सर्वांचा केवढा मोठा अधिक्षेप करीत आहोत आपण! एका चार मुलींच्या आईवर, देखणी असली म्हणून काय झालं? एखाद्या परपुरुषाने इतकं लोभवून जावं!

"बस ना उत्तरा."

"नको जाते मी" – नजरेची दोन फुलपाखरं बावरलेली.

"बस ना, ऐकणार नाहीस माझं?" आर्ततेने अरुण म्हणाला. हळू हळू उत्तरा खाली बसली. गुडघ्या-

भोवती हात गुंफून. क्षणभर नजरेत नजर गुंतली. मोठ्या प्रयत्नाने तिने आपली नजर बाजूला केली.

"उत्तरा तू मला फार आवडलीस," अरुण म्हणाला. त्याचे शब्द खूप दुरून येत आहेत असे तिला वाटले. "माझ्या लक्षात यायच्या आधीच मनाने फितुरी केलीय्. नजरेला भुलवणाऱ्या खूप मुली होत्या. पण तुला पाहताच जन्म जन्मांतरीची साथ मिळाल्या सारखे वाटले. एका बाजूने अगदी तृप्त तर एका बाजूने अगदी रिता रिता झालोय मी. भेटलीस तू पण परकी होऊन. नजर उचलून पहाताही येऊ नये. वाटतय् जीवनाची सारी सुखं तुझ्या पायाशी अर्पण करावीत आणि आपण चिरशांती मिळवावी – उत्तरा, मन अजिबात ऐकत नाही, काय करू मी?"

"डॉक्टर, ही काळी साखळी ज्यांनी घातली माझी इच्छा नसताना मी जन्मभर त्यांचीच आहे. हाच इथला नियम आहे. तो नियम मलाही तोडायचा नाही आहे." उत्तरा निश्चयाने उद्गारली पण लगेच तिचा स्वर व्याकुळ झाला.

"पण तुमची शपथ, माझं मन अजून अस्पृष्ट आहे. ते मात्र शेवटपर्यंत तुमचंच राहील. तुमची सहानुभूती हीच माझ्या एकाकी जीवनाची सोबत आणि स्मृती; हाच विरंगुळा!"

"हा तुळशीपुढचा इवलासा दिवा, केवढीशी त्याची शक्ती पण अंधार उजळतोय. स्त्रीच्या वत्सलतेतच जगाची संस्कृती पोसली जाणार आहे. वाढणार आहे. आपली तहान अधुरी अपुरी ठेवूनही ती इतरांना तृप्त करणार आहे. तुम्हाला वाटत असेल तर एकच प्रार्थना करा. माणुसकीच्या रस्त्यात येणाऱ्या सर्व संकटांचा मी सामना करू शकेन."

"ती ताकद तुझ्यात मूळचीच आहे. पण जर तुला खरोखरच माझ्याविषयी काही वाटत असेल, तर उद्या वटपौर्णिमा आहे. पुढचा जन्म माझ्यासाठी मागून घेशील?"

उत्तर एकदम उद्गारली,

"डॉक्टर, हे खरं असेल तर मी इथल्या इथे या क्षणी मरेन. मनाच्या हतबल अवस्थेत असे खोटे समाधान मानावेच लागते. पण माझ्यासाठी तुमच्यावर ही वेळ यावी याचे मला फार वाईट वाटते."

"अन् उत्तरा, तुझं मी वाईट चिंतित नाही, पण असं ऐकलंय की तुझे पती फार व्यसनासक्त आहेत. स्वतःच बेजबाबदारपणे जर कधी अचानक त्यांना हे जग–"

"तर सगळी बंधनं तोडून मी तुमच्याकडे येईन त्याचा विश्वास धरा. मी इथून जाईन ती शरीराने. पण मनाने मी येथेच राहीन. तुम्ही जेव्हा जेव्हा आठवण कराल तेव्हा तेव्हा मी तुमच्या जवळच असेन."

"अन् उत्तरा हा घे माझा पत्ता – कधी संकटात सापडलीस, असहाय झालीस तर मला कळवशील ना?"

"हो – आहे कोण माझं तुमच्याशिवाय?"

"पण उभा जन्म आठवणीत जळत राहावं, तुमच्या सारख्याने इतकी मोठी मला करू नका."

"ते मी पाहीन. या अतृप्तीतही मला विलक्षण समाधान आहे." उत्तराला भडभडून आलं. ती गदगदून रडायला लागली.

"रडू दे डॉक्टर. आनंदाने रडायची कधी वेळच आली नव्हती. प्रथमच येतेय – रडू दे मला पोटभर!"

अरुणचे डोळे पाणावले.

अनावर होऊन त्याने उत्तरेला आपल्या जवळ ओढले. आपल्या हातांनी तिचे अश्रू पुसले. तिच्या भालप्रदेशाचे हळूवार चुंबन घेतले.

संध्याकाळ संपून रात्र झाली होती. पारिजात आपल्या लक्ष नेत्रांनी हा सुखसोहळा न्याहाळत होता. आकाशात चन्द्र अमृतवर्षाव करीत होता आणि उत्तरा या क्षणभराच्या मीलनानंतरचा चिरविरह आठवून क्षणाक्षणाला खचत होती. आणि तिच्या साऱ्या आयुष्याचं दुःख आपल्या प्रेमळ अंगुलीस्पर्शात विरघळवून टाकण्याचे स्वप्न जवळ घेऊन त्या चांदण्यात अरुण उभा होता.

अनुक्रमणिका

जनीचा विठू : मानवतेचे एक प्रतीक

विमल भालेराव

लहानपणी बरेचसे पोरकेपण वाट्याला आलेली 'जनी' आज संतस्त्रियांत बरेचसे वरचे स्थान मिळवून बसली आहे. ती एक शूद्र. त्यातही नामदेवाकडे काबाडकष्ट उपसण्यासाठी अगदी बालपणापासून आलेली एक दासी. आईबापाविना म्हणून पोरकी. एवढेच तिचे सारे भांडवल. त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा तिच्याकडे शून्यच. आपले दासीपद मात्र जनी समाधीकाळापर्यंत निष्ठेने सांभाळते. आपल्या स्त्रीजन्मावर ती कधी रुसलेली नाही —

'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास ।
साधुसंता ऐसे केले जनीं ।।'

विठोबाशी तिची मैत्री जडते केवळ नामदेवामुळे. हे नामदेवाचे ऋण जनाबाई मोठ्या कृतज्ञतेने मान्य करते.

'जनी म्हणे जोड झाली विठोबाची ।
दासी नामयाची म्हणोनिया ।'

'धन्य मायबाप नामदेव माझा ।
तेणे पंढरीराजा दाखविले ।।'

अभंगाच्या शेवटी येणाऱ्या 'नामयाची जनी' या शब्दांतूनही कृतज्ञताच पाझरते. नामदेवाचे ऋणाईत म्हणून राहण्याचे सामर्थ्य जनाबाईत आहे व त्यातच तिला धन्यता वाटते.

जनी आपली पोरकी कहाणी विठ्ठलाला ऐकवते. आता तूच मला सांभाळ म्हणून त्याच्यापुढे पदर पसरते —

'माय मेली बाप मेला ।
आता सांभाळी गा विठ्ठला ।
मी तुझे लेकरू । नको मजसी अव्हेरू ।।'

तिचे अनाथ दुःख या शब्दांतून जाणवते. या परिस्थितीत जनाबाईला सांभाळणारा, तिला समजून घेणारा विठ्ठल म्हणजे मानवतेचे एक प्रतीक वाटतो. विठ्ठलामुळे तिचे पोरकेपण सर्वस्वी संपते. आणि —

'पांडुरंग माझा पिता । रखुमाई माझी माता ।।'

हे नवीन नाते तिच्या जीवनात अंकुरते.

'मायबाप बंधुबहिणी । तू बा सखा चक्रपाणी ।।'

अशी सर्व नाती तिला एकाच विठ्ठलाच्या ठिकाणी जाणवतात. एका विठोबाविना तिला दुसऱ्या कोणाची गरजच वाटत नाही. 'विठ्ठल' तिला 'माहेर' वाटते. माहेरच्या मोकळ्या मनाने ती विठ्ठलाशी वागते. विठ्ठलापुढे सर्व सामाजिक संकेत तिला निरर्थक वाटतात. आपले सुखदुःख त्याला सांगितल्याशिवाय तिला आंतरसुख लाभत नाही.

'सुखदुःख सांगेन तुजपाशी ।
माझा जीव होईल खुषी ।।

या निष्पाप मानवतेवर ती निर्धास्तपणे विसावते. विठोबाला आपले सर्वस्व मानते. त्याच्या भेटीसाठी ती तडफडते. आणि मोठ्या काकुळतीने म्हणते —

'तुज वाचोनी माये । जीव माझा जावो पाहे ।
प्राण धरियेला कंठी । जनी म्हणे देई भेटी ।।'

—विठोबाचा विरह मनाला तोलत नाही.

'तुजवाचोनी विठ्ठला । कोणी नाही रे मजला ।।'

असे ती विठ्ठलाला कळवळून सांगते.

प्रत्येक ठिकाणीच विठ्ठलाला पाहण्याची सवय झाल्याने विठोबा आपल्या कामातही मदत करतो असे तिला वाटते.

'झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।। '
'पाटी घेऊनियां शिरी । नेऊनियां टाकी दुरी ।। '
'साळी सडायास काढी ।
पुढे जाऊनी उखळ झाडी ।।
'दळू लागे संगे । वेचोनिया शेणी भरी अंगे।। '
'ओझे झालें म्हणूनि पाठी पितांबरी ।
घेऊनियां घरी आणितसें ।।

—तिला कपडे धुण्यास मदत करतो, पाणी भरू लागतो. जशी या दासीच्या कामात विठ्ठल मदत करतो तसेच तिला मातेच्या ममतेने सांभाळतो, तिची काळजी घेतो हे ती पुढील अभंगामधून स्पष्ट करते—

'जनी डोईनें गांजली । विठावाई धांविन्नली ।।
एके दिवशी न्हावयास । पाणी नव्हते विसणास ।।
देव धावोनियां आले । शीतळ उदक घे घे वोले ।।
आपुल्या हातें विसणी । घाली जनीच्या डोई पाणी ।।
माझ्या डोईच्या केसांस । न्हाणें नव्हतें फार दिवस ।।
तेणे मुरडी केसांस । कां म्हणे उगीच वैस ।।
आपुल्या हातें वेणी घाली । जनी म्हणें माय झाली ।। '

'तुळशीचे वनीं । जनीं उकलीत वेणी ।।
हातीं घेऊनियां लोणी । डोई चोळी चक्रपाणी ।।
माझे जनीला नाहीं कोणी । म्हणूनी देव घाली पाणी ।।'

—विठाईचे हे प्रेमळ वागणे बघून विठ्ठलाचे व आपले 'गाय : वासरू', 'हरिणी : पाडस' अशा जिवंत रूपकांतून कुठलाही लपफेदार शब्द न वापरता आपले प्रेममय चित्र उभे करते.

विठ्ठल आपल्या कामात मदत करतो, आपल्याला पोटच्या मायेने सांभाळतो. म्हणून जनीला कृतज्ञता वाटते —

'पुरे आता संसार । कुठे फेडू उपकार ।। '

असे ती विठ्ठलाला विचारते. आपल्याला जसे विठूविना करमत नाही तसेच विठ्ठलालाही आपल्याशिवाय करमत नसावे असे तिला वाटते. म्हणून ती म्हणते—

'धुणे घेऊनी काखेसी । जनी गेली उपवासी ।।
मागे विठ्ठल धावला । म्हणे कां टाकिले मला ।। '

आपले अभंग–लेखन विठ्ठलच करतो असाही उल्लेख ती करते. जनीवर पदक चोरल्याचा आरोप येतो तेव्हा 'मुळाचे झाले पाणी' अशी विठोबाची थोरवी ती मोठ्या अभिमानाने व कौतुकाने सांगते.

अति जवळीकीमुळे विठोबा भेटला नाही तर ती त्याला चक्क शिव्या घालते —

'अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।।
तुझी रांड रंडकी झाली ।जन्मसावित्री चुडा ल्याली ।।
तुझे गेले मढे । तुला पाहूनी काळ रडे ।।
उभी राहूनी आंगणी । शिव्या देतसे दासी जनी ।। '

प्रेमापोटी दिलेल्याच या शिव्या आहेत. अधिकाराशिवाय कुणाला कशा वरे शिव्या घालता येणार ? कृतज्ञतेने विठ्ठलाचे आपल्यावरचे उपकारही ती मान्य करते—

'माझे मनी जे जे होते । ते ते दिधले अनंते ।।
देह देऊनि विदेही केले । शांति देऊनि मीपण नेले ।।
मूळ नेले हे क्रोधाचे । ठाण केले विवेकाचे ।।
निजपदी दिधला ठाव । जनी म्हणे दाता देव ।। '

'तुझे कृपे तरली जनी'. केवळ विठ्ठलामुळेच जन्ममरणाच्या फेऱ्यांतून आपल्याला मुक्ती मिळाली असे ती नम्रतेने सांगते.

विठ्ठल तिला एवढा जवळचा वाटत असला तरी आपण त्याच्या 'एकमेवा' आहोत, असे मात्र तिला वाटत नाही. विठ्ठलाने आपल्या एकटीवरच प्रेम करावे असा संकुचित दृष्टिकोण तिचा नाही.

'विठो माझा लेंकुरवाळा । संगे लेंकुरांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।
पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडिवरी । चोखा जीवा बरोबरी ।।
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ।।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।। '

—हा अभंग विशाल मानवतावादी दृष्टिकोणाचे प्रतीक वाटतो.

जनाबाई आपल्या विठ्ठलाचे निरनिराळ्या शब्दांत गुणगान करते. विठ्ठलाला वानवण्यास तिला सव शब्दधन थिटे वाटते. आणि म्हणून — 'दीनानाथा,' 'दीनबंधू,' 'कृपासिंधू,' 'सुखाचा सागर,' 'कल्पवृक्ष,' 'देवाचिया देवा,' 'ब्रह्मांड-

पालक,' 'सकळ जीवाच्या जीवना,' 'सुखालया,' "सर्व देवांचा 'विश्राम'", 'ब्रह्माचिया ताता,' 'अमरेश्वरा, 'मोक्षाचा जो मोक्ष,' 'मुक्तीची जी मुक्ती' — अशा एकाहून एक श्रीमंत विशेषणांनी त्याला भूषविते.

केवळ या भरघोस स्तुतीने विठ्ठल जनाबाईकडे आलेला नाही. त्याने एका शूद्र दासीची व्यथा जाणली, तिच्या काळजात लपलेले पोरकेपणाचे हुंदके ऐकले. या मानवतेच्या आड उच्चवर्ण आलेला नाही, पांडित्य आलेले नाही; धनदौलतीचा दिमाख आलेला नाही. उच्च सामाजिक पदवीही आलेली नाही. मानवतेने मानवतेला दिलेला हा एक फक्त हुंकार वाटतो. विठ्ठलाच्या या वागण्याने जनीच्या आयुष्याची मात्र नवच बदलली — ज्यामुळे ती आजही संतांमध्ये मोठ्या सात्त्विक रुबाबाने झळकत आहे.

सावलीचे दुःख

ऋतुराज

सावलीचे दुःख
उरी वागविले !
झाकून दुज्यांना
स्वतः नागविले !! १.

कडू शतकांचे
घोट ते जबरी !
गिळिले बांधित
स्वतःच्या कबरी !! २.

लेवुनिया लेणे
लक्ष जखमांचे !
फुलविले हास्य
ओठी गुलाबांचे !! ३.

सर्प विळख्यांचा
माझा इतिहास !
मृत्यूच्या घरात
माझा उपहास !! ४.

क्षुद्र कीटकांनो,
भिणार मी कैसे ?
आलोना जेवून,
मृत्यूचे बारसे !! ५.

शांतता ! भाषा वधारतेय

नंदा दारव्हेकर

मी–आम्ही
तू–तुम्ही
ते – त्या – ती
किती शुद्ध भाषा आहे, नाही ?
व्याकरणशुद्ध
रेखीव चौकोनी ठोकळे
शब्दांचे
त्यांच्याचकरिता निर्माण केलेल्या
चौकोनी खाचातून
पटापट बसताहेत.
संपली खटपट
झाले तय्यार गाणे
व्याकरणशुद्ध गाणे
'च्यायला, संपले सगळे'
अस्ताव्यस्त
अनिर्बंध
शब्द कुजबुजले.
'कमल नमन कर।
गणपत नमनं कर।'
व्याकरण – ठोकळे – भाषा
शांतता ! भाषा वधारतेय.

अर्वाचीन मराठी काव्य 'परंपरां'च्या संदर्भात

नरेन्द्र पोफळी

केशवसुतांनाच 'अर्वाचीन मराठी काव्याचे जनक' का म्हणावयाचे ? त्यापूर्वीच कुंटयांनी लिहिलेले 'राजा शिवाजी' हे काव्य अर्वाचीन नव्हे काय ? असे प्रश्न द. भि. कुळकर्णी ह्यांनी आपल्या 'पहिली परंपरा' व 'दुसरी परंपरा' ह्या समीक्षा–ग्रंथांतून मांडले. कुंटयांपासून मानावयाची अर्वाचीन मराठी काव्य-परंपरा म्हणजे भारतीय संस्कृतीच्या वारसाने पुढे आलेली वस्तुनिष्ठ, नाटयनिष्ठ, > रसनिष्ठ > 'अलौकिकवादी' परंपरा असून केशवसुती परंपरेपेक्षा म्हणजे आत्मनिष्ठ > लौकिकवादी परंपरेपेक्षा श्रेष्ठ अशी ही 'दुसरी परंपरा' आहे असे मत मांडले आहे.

'अर्वाचीन' मराठी कविता ह्याचा अर्थ इ. स. १८१८ नंतर लिहिले गेलेले मराठी काव्य. ह्या अर्थाने 'अर्वाचीन' हा शब्द वापरला तर कुंटे ह्यांच्या काळाचा अर्वाचीन मराठी काव्यात समावेश करता येतो. अर्थात 'अर्वाचीन' हा शब्द काव्यमूल्यवाचक अर्थानेही वापरता येतो. परंतु द. भि. कुळकर्ण्यांनी तसा तो वापरला नसून काळाचे विशेषण म्हणून वापरला आहे. (दुसरी परंपरा, पृ. १५३) ह्या अर्थाने केशवसुतांची परंपरा ही अर्वाचीन मराठी काव्यातील 'पहिली परंपरा' ठरणार नाही, तर कुंटयांपासून मानलेली 'दुसरी परंपरा'च पहिली ठरेल. तेव्हा केशवसुतां-पासून 'नवी मराठी कविता' सुरू झाली असेच म्हटले पाहिजे. केशवसुत म्हणजे 'नव्या मराठी कवितेचे जनक' असे म्हणावयास पाहिजे. असे असता 'आत्म-निष्ठ' केशवसुती संप्रदायासच द. भि. कुळकर्ण्यांनी 'पहिली परंपरा' म्हटले आहे. खरे तर नव्या मराठी काव्यक्षेत्रात भिन्न प्रवाह (Currents) आहेत, परंपरा नाहीत.

कुंटे यांच्या काव्यापेक्षाही त्यांच्या काव्या-संबंधीच्या विचारांच्या अपूर्वतेवर व आधुनिकतेवर द. भि. कुळकर्णींचा भर आहे. त्या आधारेच त्यांनी कुंटयांचे महानत्व मान्य केले आहे. कुंटयांनी कविता कशी असावी हे आधी ठरविले. त्यावरहुकूम काव्यसिद्धी व रचना करण्याचा त्यांचा खटाटोप सर्वश्रुत आहेच. कुंटयांच्या 'राजा शिवाजी'ने मराठी काव्याचे 'अर्वाचीन' युग सुरू झाले की इंग्रजी अमलानंतर इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनाने सुरू झालेल्या भाषांतर युगाचाच तो एक भाग होता हे प्रत्यक्ष कृतीवरून स्पष्ट होतेच. कुंटयांनी पुराणपुरुषाऐवजी ऐतिहासिक पुरुष निवडला व प्रामुख्याने भाषाबदलावर जोर दिला म्हणून त्यांच्यापासून अर्वाचीन मराठी काव्याची सुरुवात असे मानता येणार नाही. तुकारामाने केलेली सोप्या भाषेतील अभंगरचना जनसामान्यासाठी होती असा अलीकडचा दृष्टिकोण स्वीकारून तुकारामापासून संतकवींची एक वेगळी परंपरा मानता येईल काय ? मूलतः तुकारामाच्या अभंगांचा आशय व काव्यविषय आणि इतर संतकवींचा काव्यविषय यात भेद नसताना अशी 'अपूर्वता' मानणे योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे 'संतांच्या साहित्यशास्त्राशीही जिची जवळीक आहे' त्या कुंटयांच्या काव्यदृष्टीपासून मराठी काव्याच्या अर्वाचीन युगास सुरुवात झाली असे मानणेही सयुक्तिक नाही.

"कवि - काव्य - रसिक यांची व्यक्तितत्वातून सुटका करण्याकरिता कुंटे यांनी संस्कृती आणि समाज यांचा आश्रय घेतला", असे द. भि. कुळकर्णी म्हणतात. (दु. प. पृ. १५४) कुंटयांनी व्यक्तितत्वापासून सुटका करून घेतली हे म्हणणे यथार्थ ठरवावयाचे असले तर त्या आधी व्यक्तितत्वाचे अस्तित्व दाखवावयास पाहिजे. तरच सुटकेचा प्रश्न निर्माण होईल.

द. भि. कुळकर्णी म्हणतात, "वर्डस्वर्थ व कुंटे यांच्या विचारपद्धतीत काही महत्त्वाची साम्येही आहेत. काव्याची भाषा व समाजाची भाषा, काव्यातील अलंकरण व काव्याची स्वाभाविकता तसेच समाजाची काव्याभिरुची या प्रश्नांचा दोघांनीही परामर्ष घेतला आहे." वर्डस्वर्थची प्रस्तावना वाचून तसे करणे कुणा-

सही अशक्य नव्हते. अशक्य होते वर्डस्वर्थच्या काव्याच्या व्याख्येस उतरणारी काव्यनिर्मिती करणे. कुंटयांची काव्यनिर्मिती तशी आहे काय ? हा मूलभूत प्रश्न आहे. द. भि. कुळकर्णी म्हणतात, "पारंपरिक काव्यपद्धतीला निःसंदिग्ध शब्दात विरोध करून नव्या अभिरुचीला अनुकूल असे वातावरण प्रस्तुत महाकाव्याने निर्माण केले." बाह्य विश्वात सुंदर व उदात्त समजल्या जाणाऱ्या विषयाची काव्यरचनेसाठी निवड करून सर्वांस ठाऊक असलेली कथा पद्यबद्ध करण्याचे कुंटे ह्यांचे कार्य पारंपरिक काव्यपद्धतीच्या विरुद्ध कसे ठरते ? नवी कविताच जन्मास यावयाची असताना ते नव्या अभिरुचीची तयारी कशी काय करून ठेवणार ? ज्या व्यक्तिवादी जीवनमूल्यांमुळे नवी कविता निर्माण झाली 'त्यापासून सर्वस्वी विरोधी' असे मूल्य दर्शविणारी कुंटयांची काव्यरचना म्हणजे 'अर्वाचीन मराठी काव्य'-पूर्वकालीन, इंग्रजी धर्तीवर महाकाव्य रचण्याचा प्रयत्न होय, ह्याचा विसर न पडावा.

केशवसुतांनी पहिली कविता नोव्हेंबर १८८५ मध्ये लिहिली. ती 'खिडकीकडे मौज पहावयास'. ही कविता भाषांतर स्वरूपाची. त्यानंतरच्या पुढच्या ४–५ कवितांमध्ये त्यांची नवकाव्याकडे जाणाऱ्या पाऊलांची चाहूल आहे. नंतर ३० डिसेंबर १८८६ ला केशवसुतांनी 'कविता आणि कवि' ही कविता लिहिली. ती पहिली मराठी नवकविता. तेथून मराठी नवकाव्याची सुरुवात होते. काव्यातील क्रांती प्रथम आशयात होत असते. मराठी काव्याचे अर्वाचीनत्वही आशयाशीच निगडित आहे. ह्या नव्या आशयाला जीवनमूल्यांचा बदल कारणीभूत होतो.

मराठी काव्यात क्रांती घडून आली केशवसुतां-मुळेच. ही क्रांती घडून येण्यास कारक ठरले केशवसुतांचे व्यक्तिमत्त्व. प्रा. क्षीरसागर म्हणतात, "वस्तुतः अर्वाचीन कवितेच्या विशिष्ट स्वरूपाचे मूळ विशिष्ट वाङ्‌मयाच्या अध्ययनात नसून विशिष्ट जातीच्या व्यक्तिमत्त्वात आहे. ज्या इंग्रजी कवींचे अध्ययन केल्यावर प्रधान, कुंटे, महाजनी यांच्या काव्यात आत्मलेखनही आले नाही की उत्कटताही आली नाही त्याच कवींचे अध्ययन केल्यावर केशव-सुतांचे काव्य अंतर्बाह्य नवीन आणि उत्कट कसे झाले ? अर्थात् या चमत्कारप्राय प्रकाराचे मूळ अध्ययनात नसून व्यक्तिमत्त्वात आहे." (टीकाविवेक, पृ. २७८)

द. भि. कुळकर्णी यांनीही व्यक्तिमत्त्वाच्या अनन्यतेचा आवर्जून उल्लेख केला आहेच. (पहिली परंपरा, पृ. ७१–७२) मराठी कवितेचे अर्वाचीन युग केशवसुतांपासून सुरू झाले की नाही हे ठरविण्यास व्यक्तिमत्त्वावर आधारलेली मीमांसा लक्षात घ्यावयास हवी. मराठी काव्याच्या आधुनिकतेची मीमांसा कवी अनिलांच्या 'फुलवात' (१९३२) या संग्रहास त्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेत आढळते.

कवी अनिलांनी केलेली आधुनिक मराठी काव्याच्या उद्‌गमाची मीमांसा

अनिल म्हणतात, "आधुनिक मराठी काव्यात जे काही विशेष आले आहेत ते सर्व व्यक्तीचे व वैय-क्तिक जीवनाचे महत्त्व, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, स्वातंत्र्य या कल्पनांच्या परिणामामुळेच आले आहेत. व्यक्तीचे महत्त्व पटल्यामुळे कवीच्या व्यक्तित्वास, व्यक्तिविषयक अनुभूतीला व सुखदुःखांना काव्यात अग्रस्थान मिळाले. आपली काव्याची जुनी व्याख्या 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' अशी होती. आधुनिक कवींनी तिची जाणीव करून घेऊन व्यक्तित्वाच्या दृष्टीने 'उत्कट भावनांचा सहजोद्‌गार' व 'संस्कृतीची टीका' ह्या व्याख्यांची तिला जोड करून दिली. आत्मप्रत्यय हा आधुनिक कवितेचा पाया होऊन बसला. पूर्वीप्रमाणे उदात्त व सुंदर हेच काव्याचे विषय राहिले परंतु त्याविषयीची कल्पना मात्र बदलली व त्यांची व्याप्तीही वाढली. साधारण व प्रायः क्षुद्र, हीन, क्षुल्लक व अनुदात्त समजल्या जाणाऱ्या गोष्टींनाही आत्मप्रत्य-याच्या सापेक्षतेत (Relatively) उदात्ताचे व सुंद-राचे स्वरूप प्राप्त होऊ लागले. ह्यामुळे कोणतीही गोष्ट उदात्त वा क्षुल्लक, काव्यास योग्य असा विषय होऊ लागली. उदात्ताविषयीच्या व सौंदर्याविषयीच्या कल्पनांत क्रांतिकारक फरक पडला. . पूर्वीचे कवी काव्याविषयीची उदात्तता व सौंदर्य आपल्या स्वतःच्या अनुभूतीत उतरले आहे की नाही हे पाहत नसत व त्याप्रमाणे वर्णन करीत नसत. तो काव्यविषय बाह्य विश्वात वा समाजात उदात्त वा सुंदर समजला जात असला तर त्याची उदात्तता वा सौंदर्य गृहीत धरूनच चालत. त्यामुळे काव्यनिर्मितीची त्यांची वृत्ती, वर्णन करण्याची पद्धती, बहिर्मुख (objective) होती. याचे कारण व्यक्तीला व व्यक्तीच्या जीवनाला व अनुभूतीला त्यावेळी महत्त्व नव्हते. . . त्या महत्त्वाची

जाणीव झाल्यावर आधुनिक कवीच्या वृत्तीत फरक पडला. कवी या व्यक्तीला ज्या विषयातील उदात्ततेची व सौंदर्याची जाणीव झाली – मग तो विषय भव्य असो अगर क्षुल्लक असो – त्या विषयाचे स्वतःच्या आत्मप्रत्ययाच्या दृष्टीने आधुनिक कवी वर्णन करू लागला व त्याची उदात्तता वा सौंदर्य स्वतःस जाणवले त्याप्रमाणे इतरांस सांगू लागला. ज्या गोष्टी बाह्य जगास व समाजास उदात्त व सुंदर वाटतात त्यांची उदात्तता व सौंदर्य त्याच्या अनुभूतीस पटले नाही तर त्याचे त्याला महत्त्व वाटेनासे झाले. उलटपक्षी क्षुल्लक गोष्टींनाही त्याच्या अनुभूतीच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले. ज्या विषयासंबंधी कवीच्या वैयक्तिक जीवनात भावोत्कटता आहे तेच विषय सहजोद्‌गाराच्या रूपात बाहेर पडू लागले व बाहेर पडताना कवीच्या अनुभूतीत त्यांना जे स्थान असेल तेच त्यांना मिळू लागले. स्वतःच्या प्रतीतीप्रमाणेच व वैयक्तिक अनुभूतीच्या सापेक्षतेत, काव्यविषयाचे वर्णन होऊ लागल्यामुळे अर्थात् ते अंतर्मुख वृत्तीचे (Subjective व Introspective) झाले व त्या दृष्टीचे क्षेत्र कवीचे वैयक्तिक अनुभूतिरूप आंतर्विश्व झाले. हा जुन्या व नव्या कवितेतील फरक खालीलप्रमाणे दाखविता येईल.

काव्य–विषय = उदात्त व सुंदर

वैयक्तिक अनुभूतीची सापेक्षता नसलेले बाह्य विश्वातले उदात्त व सुंदर	वैयक्तिक अनुभूतीच्या सापेक्षतेत आत्मप्रतीत असे आंतर्विश्वातील उदात्त व सुंदर
बहिर्मुख दृष्टी	अंतर्मुख दृष्टी
जुने कवी.	आधुनिक कवी.

ही आधुनिक काव्याची प्रवृत्ती लक्षात आणली तर त्या काव्याचे भावगीत हे एक मुख्य अंग का झाले हे सहज समजण्यासारखे आहे. (फुलवात, प्र. पृ. ५,६ व ८) (ही प्रस्तावना १९३२ ची. तेव्हा 'लिरिक'ला 'भावगीत' हा पर्याय रूढ होता.) "व्यक्तीला, वैयक्तिक जीवनाला व अनुभूतीला महत्त्व आल्यावरोबर भावगीत हा काव्यप्रकार सर्वसाधारण होणे अपरिहार्यच होते. वस्तुतः भावगीत ही काव्याची महत्त्वपूर्ण अवस्था आहे. बाह्य वस्तूतील अगर आंतर्विश्वातील कोणत्याही गोष्टीचा संबंध येऊन त्याचा परिणाम कविमनावर झाला म्हणजे त्याची भावना उचंबळून येते, उत्कट व अनावर होते व शब्दाच्या रूपाने बाहेर पडते हा प्रकार अगदी निसर्गसिद्ध आहे. परंतु व्यक्तीला जुन्या काळी महत्त्व नसल्यामुळे या प्रकाराला संस्कृत व जुन्या मराठी काव्यात म्हणण्यासारखे स्थान मिळाले नाही. (फुलवात, प्र. पृ. ८) "सामाजिक कविता व राष्ट्रीय कविता ही जी दुसरी आधुनिक काव्याची अंगे होत त्यांचेही अंतिम स्वरूप भावगीतात्मकच आहे. व हे प्रकार समता व स्वातंत्र्य या कल्पनांच्या परिणामामुळेच उत्पन्न झाले. या दोन्ही प्रकारातही वैयक्तिक अनुभूतीलाच सर्वव्यापी महत्त्व असावयास पाहिजे. काही आधुनिक कवींच्या सामाजिक व राष्ट्रीय कवितांत ते असलेले दिसूनही येते. परंतु इतर आधुनिक कवी अशा प्रकारच्या कविता जुन्या काव्याप्रमाणे बहिर्मुख दृष्टीनेच लिहितात. त्यात त्यांच्या स्वतःच्या अनुभूतीचा अगर आत्मप्रत्ययाचा अंश काहीच नसतो. त्यामुळे अशा प्रकारचे सामाजिक अगर राष्ट्रीय काव्य जरी काळाने व स्वरूपाने आधुनिक असले तरी ते जुन्या काव्याच्या मृतावशेषासारखेच आहे. (फुलवात, प्र. पृ. ९).

उपरोक्त मीमांसेचे महत्त्व

कवी अनिलांची आधुनिक मराठी काव्याच्या उद्‌गमाची मीमांसा विस्तृतपणे उद्धृत करण्याचे कारण हे की आधीच्या अर्वाचीन मराठी काव्याच्या समीक्षकांनी व आता द. भि. कुळकर्णी ह्यानीही प्रस्तुत मीमांसेकडे केलेले दुर्लक्ष. खरे पाहता उपरोक्त विवेचनातून नवी मराठी कविता केशवसुतानीच प्रथम लिहिली व त्यांची सामाजिक कविताही भावगीतच (लिरिक) का ठरते हे स्पष्ट होतेच. आणि कुंटे यांची कविता 'नवी' ठरत नाही हेही उघडच आहे. तेव्हा द. भि. कुळकर्णी ह्यांनी आपल्या 'अर्वाचीन मराठी काव्यातील परंपरांत' केशवसुतांच्या आधीचे प्रवर्तक म्हणून कुंटयांना गोवण्याचे अर्थाअर्थी कारण उरत नाही.

अर्वाचीन मराठी काव्याचा संबोध

द. भि. कुळकर्णी म्हणतात, अर्वाचीन मराठी काव्याचा संबोध अगदी साध्या भाषेत सांगावयाचा

म्हणजे १) कुंटे, विनायक, चंद्रशेखर, सावरकर, बी, गिरीश, ना. ग. जोशी. इ. कवींचे वस्तुनिष्ठ काव्य. २) केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, यशवंत, अनिल, बोरकर, मुक्तिबोध, इंदिरा, चित्रे इ. कवींचे आत्मनिष्ठ काव्य. ३) तांबे, माधव जूलीयन, कुसुमाग्रज, रेगे, मर्ढेकर, करंदीकर इत्यादी कवींचे नाट्यनिष्ठ काव्य. या तीन अंशांनी सिद्ध झाला आहे." (दु. प. पृ. १२).

वरील वर्गीकरण बिनचूक नाही. 'दुसरी परंपरा'मध्ये लेखकाने वस्तुनिष्ठ कुंट्यांसोबत नाट्यनिष्ठ तांबे, माधव जूलीयन, कुसुमाग्रज आणि वर न उल्लेखिलेले बापट व केचे ह्या कवींच्या काव्यकर्तृत्वाच्या मूल्यमापनातूनही अर्वाचीन मराठी काव्यसंबोधाची एक बाजू मांडली. त्यात नाट्यनिष्ठ मर्ढेकरांचा संबंधही नाही. तसाच तो 'पहिल्या परंपरे'तही नाही. (प. प., पृ. ७२).

केशवसुत संप्रदाय

द. भि. कुळकर्णी म्हणतात, "या संप्रदायाचे वेधक विश्लेषण जर कुणी केले असेल तर ते प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी." (प. प., पृ. ७५). पण 'टीकाविवेका'त प्रा. क्षीरसागर म्हणतात, "रोमँटिक काव्य हे विकसित, संवेदनशील, संपन्न अशा आधुनिक व्यक्तिवादाचे काव्य आहे. त्यात केवळ प्राचीन आदर्शाप्रमाणे रचलेल्या विद्वत्ताप्रचुर, विदग्ध काव्याला स्थान नाही. त्यात केवळ बहिर्मुख सौंदर्यवर्णनही भागण्यासारखे नाही. त्याचा विषय बाह्यसृष्टी आणि समाज यांच्यापेक्षा कवीचे व्यक्तित्व हा असतो व ह्या **व्यक्तिमत्वाची गळचेपी जुन्या कवितेत झालेली होती. ब्रिटिश अंमलाच्या आगमनाबरोबर व्यक्तीला आपल्या हक्कांची जशी जाणीव झाली, तशीच कवींना अलंकारशास्त्राच्या अडगळीत गुदमरलेल्या आपल्या व्यक्तिमत्त्वाचीही जाणीव झाली** पूर्वीच्या आदर्शानुसार केलेल्या स्त्रीवर्णनाने व निसर्गवर्णनाने त्यांचे समाधान होईना. त्या काव्यात त्यांना स्वतःची ओळख दिसेना व वस्तूची ओळखही उसनी अथवा Second-hand असल्याचे आढळून आले. आणि म्हणूनच **केशवसुतादी कवी स्वहृदयाच्या जाणीवेने जागृत होऊन उठले व स्वानुभूतीची काव्ये** लिहू लागले. अशा स्वानुभूतीचा काव्य-संप्रदाय म्हणजे आधुनिक मराठी काव्यसंप्रदाय होय. (टीकाविवेक, पृ. २३०).

इतके स्पष्टपणे प्रा. क्षीरसागरांनी केलेले विवेचन उपलब्ध असताना द. भि. कुळकर्णी म्हणतात, "प्रा. क्षीरसागरांबद्दल तक्रार करावयाची ती ही की त्यांनी रोमँटिसिझम ही एक मूलभूत प्रवृत्ती मानली. इथेच ते थांबले. ही जर मूलभूत प्रवृत्ती आहे तर ती या विशिष्ट स्वरूपात अर्वाचीन काळातच का आढळते, प्राचीन काळात कां आढळत नाही याचे उत्तर प्रा. क्षीरसागर यांच्या लेखनातून मिळत नाही. याचे उत्तर असे की केशवसुतांच्या सौंदर्य पूजनाचा संबंध व्यक्तिवादाशी आहेच." (प. प., पृ. ७५) ह्याचा अर्थ प्रा. क्षीरसागरांचे विवेचन परिपूर्ण नाही असे समजावे काय ?

द. भि. कुळकर्णी यांची काही विधाने

(१) 'पहिली परंपरा' पृ. ७३ वर 'केशवसुत हे इहलोकनिष्ठेचे कवी होते' (पासंग, कुसुमावती देशपांडे, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९६१, पृ. १७)' असे नमूद केले आहे. खरे पाहता 'पासंग'मध्ये कुसुमावतीबाईंचे वरील विधान पृ. १७ वरच काय कोणत्याही पृष्ठावर नाही. पृ. १८ वर मात्र कुसुमावतीबाईंचे विधान आढळते ते असे, "अर्वाचीन मराठी कवितेने इंग्रजी साहित्यापासून स्वीकारलेला सर्वांत प्रभावी विशेष म्हणजे तिची इहलोकनिष्ठा. केशवसुतांपासून आजच्या नवोदित कवींपर्यंत सर्वांची प्रतिभा ऐहिक जीवनाभोवती रुळत-खेळत आहे." येथे 'इहलोकनिष्ठा' याचा अर्थ 'जीवित्व साचे असे' ही दृष्टी. द. भि. कुळकर्ण्यांनी आधी तर कुसुमावतीबाईंचे म्हणून चुकीचे विधान द्यावे व वर ते 'व्यूहबाधक' व 'आत्मविसंगत' आहे असेही म्हणावे म्हणजे चमत्कारिकच नव्हे काय ?

(२) लौकिकवादी व अलौकिकवादी

द. भि. कुळकर्णी म्हणतात, "अंतिमतः केशवसुत संप्रदाय हा लौकिकवादी संप्रदाय आहे. अतीत प्रमाण, अतीत वास्तव, अतीत सौंदर्य यांना या संप्रदायात मूल्याचे स्थान असले तरी काव्यनिर्मिती, काव्याचे अस्तित्व व काव्याचा आस्वाद याबाबतची या संप्रदायाची भूमिका पूर्णपणे लौकिकवादी आहे. कवीच्या भूमिकेचे साधारणीकरण, काव्यसामग्रीचे साधारणीकरण, रसिकाच्या-भूमिकेचे साधारणीकरण व या विविध एकात्म साधारणीकरणातून लौकिकभिन्न रसाची निर्मिती ही अलौकिक-

वादी विचारसरणी या संप्रदायास मान्य नाही. म्हणूनच या संप्रदायास ' पहिली परंपरा ' म्हणजे ' लौकिकवादी परंपरा ' असे म्हणावयाचे. या लौकिकवादी भूमिके-मुळेच कवीच्या स्वातंत्र्याचे रूपांतर खाजगी भावना-विष्कारात म्हणजे निजसुखादिविवशीभाव या रस-विघ्नात, आत्माविष्काराचे रूपांतर आत्मपरतटस्थभाव या रसविघ्नात, क्लृप्तीचे रूपांतर लोकयात्राविस्मृतीत व पुरुषार्थविस्मृतीत आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे रूपांतर प्रचारकी उत्तरकर्तव्योन्मुख प्रेरणेत होताना दिसते. हे रूपांतरदोष या संप्रदायाच्या लौकिकवादी मूळपिंडातच दडलेले आहेत. उलट दुसरी परंपरा ही मूलत: अलौकिकवादी परंपरा आहे. ' पहिल्या परंपरे '-पेक्षा ' दुसरी परंपरा ' श्रेष्ठ ठरते ती या मूलभूत तात्विक बैठकीच्या आधारेच." (प. प., पृ. ७५–७६)

लौकिक व अलौकिक या संज्ञा आधुनिक मराठी काव्यासंबंधाने वापरताना त्या पूर्णपणे समजून घ्यावयास पाहिजेत. त्या तशा समजून न घेतल्यामुळे व भलत्याच प्रकारे वापरल्यामुळे द. भि. कुळकर्णी यांच्या विवेचनात केशवसुतांची ' झपूर्झा ' लौकिकवादी आणि कुंटयांची कविता अलौकिकवादी ठरण्याचा चमत्कार झाला.

रसाधिष्ठित काव्य–समीक्षेने केशवसुत संप्रदायी काव्याचे पुरेपूर आकलन होणेही कसे अशक्य होऊन बसते यासंबंधीचे प्रा. क्षीरसागरांचे मत उल्लेखनीय आहे. प्रा. क्षीरसागर म्हणतात, " वाङमय हे बाह्य नियमांनी बद्ध नसून अंतर्गत व स्वयंनिर्मित उद्दिष्टांनी व नियमांनी चालणारे आहे, ही कल्पना एकोणिसाव्या शतकातील सौंदर्यवादाच्या उदयाने विविध संप्रदायी टीकाकारांना या ना त्या स्वरूपात मान्य करावी लागली. याचाच अर्थ ललित वाङमय हे बाह्य नियमां-प्रमाणे रचिले जात नाही व बाह्य नियमांनी परीक्षिलेही जात नाही. काव्य ही कारागिरी नसून स्वयंस्फूर्त व स्वयंपूर्ण अशा अभिनव मनोमय वस्तूचा ' आविष्कार ' होय. मग तो कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा असो, की त्याच्या देशकालादी परिस्थितीचा असो की वस्तुगत सौंदर्यतत्त्वाचा असो, हे तत्त्व या काळाला सर्वमान्य झाले. अर्थात् या अर्वाचीन दृष्टीप्रमाणे विचार करताना रीती, अलंकार, रसपरिपोष आणि विचारांची तर्क-शुद्धता यांच्या चर्चेला गौण स्थान देते. " (' साहित्याच्या दरबारात, ' सुविचार, १९६१ पृ. ८.)

द. भि. कुळकर्ण्यांना ' रसविघ्न ' ह्या कल्पनेचेही योग्य आकलन झालेले दिसत नाही. भलत्या ठिकाणी ते ' रसविघ्न ' उभे करतात आणि केशवसुतांच्या कवितेत रसविघ्न उत्पन्न करणारे काही आहे अशी स्वत:ची समजूत करून घेऊन केशवसुत संप्रदायाचे काव्य ' कनिष्ठ ' आहे असे काही लिहितात. सारांश, द. भि. कुळकर्णी यांचे हे ग्रंथ त्यांच्या मनात संस्कृत साहित्यशास्त्र आणि पाश्चात्य साहित्यशास्त्र ह्यांच्या आकलनातील उणेपणाने आणि संकराने काय गोंधळ उडवून दिला आणि धमाल मचविली आहे ह्याची जाणीव मात्र करून देतात. अभ्यासकांच्या दृष्टीने तेही नसे थोडके !

– संदर्भ सूची –

१) डॉ. द. भि. कुळकर्णी:– १. ' दुसरी परंपरा ', प्रभा प्रकाशन, नागपूर, १९७४.
   २. ' पहिली परंपरा ', अमेय प्रकाशन, नागपूर, १९७६.

२) आ. रा. देशपांडे :– ' फुलवात ' वाग्विलास मंडळ, पुणे, १९३२.

३) कुसुमावती देशपांडे – ' पासंग ' मौज, १९६१.

४) श्री. के. क्षीरसागर :– १. ' टीकाविवेक ', पॉप्युलर, मुंबई १९६५.
   २. ' साहित्याच्या दरबारात,' सुविचार, पुणे–नागपूर, १९६१.

क वि ता

अतृप्त

श्रीकांत नरूले

घर
घर म्हणून स्वतःचे नाहीच
कुणाचे तरी भाड्याने घेतलेले.
म्हणून त्याला आपले समजायचे.
भटकणाऱ्या पायांना रोज़ सवयीने
तिथे आणायचे.

गाव
गाव म्हणून आपला असा नाहीच.
हात पसरला की भीक मिळते
त्यालाच आपला गाव समजायचे.

स्मशान
स्मशान आपल्या गावचे नाहीच.
तिथे पोहोचायचे साडेतीन हात
कुडीला विश्रांती देण्यासाठी
अतृप्त राहूनही तृप्त होण्यासाठी......

साक्षी

अनुराधा केने

साक्षीला घड्याळाचे काटे
साक्षीला श्वासाची लय
साक्षीला लपलेलं चांदणं
साक्षीला पापणीतलं दंव

साक्षीला चिमणे श्वास
साक्षीला रातराणीचा वास
कोसळलेलं उभं आयुष्य
पेटलेलं विक्राळ भविष्य.

वादळ

धर्मराज निमसरकर

नुस्ते वादळ
काळोखाच्या गुहेतून थैमान घालत
झाडांच्या थव्यावर धिंगाणा घालणारे.
पायाला गवसलेल्या वाटेवर
काट्यांची आरास उभे करणारे
चक्रीय वादळ.
हाताने आकाशात उंच केलेल्या
मशालीच्या ज्वालेवर
कोपलेले छद्मी वादळ
कंठातून बाहेर पडणाऱ्या
आवाजाचा निषेध करणारे
भन्नाट वादळ.
वादळाने बहरणारे मातीचे ढिगारे
ढिगाऱ्यातून निघणारे अस्वस्थ हुंकार
अभावग्रस्त आकाशाच्या पोकळीत विलीन...

पहाट

निरंजन उजगरे

शेवटी उगवलीच आपली पहाट...
शब्दफुलांची बरसात करीत एकमेकांवर,
सजवीत निघालो स्वप्न गुंफल्या बोटांचे;
माझ्या मनातल्या पाऊलवाटांवर,
घरंगळत होते बोल तुझ्या पैंजणांचे...
उगवत्या सूर्यास होऊन सामोरे,
आपले अस्तित्व एक झाले,
मागे पाहिले —
सावल्यांचे पुरावे नाही दिसले,
सावल्या पडणाऱ्या जगामधले..
शेवटी उगवलीच आपली पहाट.

द. चिं. सोमण

पां. व. गाडगीळ

द. चिं. उपाख्य बापूसाहेब सोमण हे एक प्रसिद्धि-विन्मुख साहित्यिक आहेत. प्रसिद्धिविन्मुखता ही आता वैदर्भीय लेखकांना अभिशाप ठरणार आहे. कवी प्रसिद्धिविन्मुख आणि त्याच्या टीकाकार मित्रांची अनास्था यामुळे कित्येक वैदर्भीय कवींना आणि साहित्यकारांना ज्या प्रमाणात प्रसिद्धी मिळावयास पाहिजे ती मिळत नाही. सोमण यांचेच उदाहरण घेऊ. सोमण यांचे चार काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत परंतु आजच्या तरुण साहित्यिकांना त्याबद्दल काहीच माहिती नाही. येवढ्या भांडवलावर सोमणांना प्रसिद्धीचे भरपूर पीक काढता आले असते. आजकाल कवी आपला पहिलाच काव्यसंग्रह प्रसिद्ध करताना केवढा गाजावाजा करतो. त्या पातळ काव्यसंग्रहाच्या प्रसिद्धीचा प्रकाशनसमारंभ एखाद्या साहित्यशौंडास अध्यक्ष करून व चार पाच उपवक्ते नेमून तो पार पाडतो. त्या संग्रहास जर एखाद्या साहित्य–गरिष्ठाची प्रस्तावना घेतली असल्यास तिचे एखाद्या दैनिकाच्या साहित्य-पुरवणीत पुनर्मुद्रण करून घेतो व कमीत कमी १०–१५ नियतकालिकांतून परीक्षण येईल याची व्यवस्था करतो. याउलट बापूसाहेबांसारख्या प्रसिद्धिपराङ्मुख साहित्यिकांची तऱ्हा. बापूसाहेबांचे काव्यसंग्रह त्यांचे मित्र श्री कुंडलराय मोहेकर यांनी प्रसिद्ध केले नसते तर त्यांच्या कविता नियतकालिकांच्या गळाठ्यात केव्हाच नष्ट होऊन गेल्या असत्या. दोन काव्यसंग्रह निघतील इतक्या कविता आज बापूसाहेबांजवळ पडून आहेत. शुद्ध भावनिक आनंदासाठी बापूसाहेबांनी लेखन केले. लौकिकाची वांछा धरली नाही. प्रसिद्धीसाठी त्यांनी काहीही केलेले नाही व तिच्यासाठी जीव टाकला नाही. 'स्वान्त:सुखाय' लेखन केले. मित्रांना वाचून दाखविले, संपले त्यांचे काम. परंतु त्यांच्या काव्यसंग्रहाची तारीफ करणाऱ्या त्यांच्या टीकाकार मित्रांनी मात्र प्रशस्तीपर चार ओळीही लिहिल्या नाहीत. बरोबर आहे. ज्यांचे नाव पुण्यामुंबईकडे गाजते त्या साहित्यिकांचा उदो उदो करण्यात आमचे वैदर्भीय लेखक धन्य मानतात. पुण्या-मुंबईकडे एकदा का तुमचे नाव झाले अगर तुमचे पुस्तक तिकडे प्रसिद्ध झाले म्हणजे मग नागपूर–वऱ्हाडच्या लेखकांना तुमच्या साहित्याची आठवण होते. परप्रत्ययनेय बुद्धीचा हा विलास आहे. असो.

बापूसाहेब राहतात ते वाशीम एक खेडेवजा तालुक्याचे गाव आहे. रुळवाटेपासून चांगले पन्नास क्रोशार्ध आत आहे. विदर्भाचे 'विदर्भविषय: सारस्वती जन्मभू:' असे वर्णन करणारा गीर्वाणकाव्यविमर्शकांचा मुकुटमणी, 'काव्यमीमांसा'कार राजशेखर हा महाराष्ट्री कविराज याच गावाचा निवासी होता. राजशेखराने अवन्तिसुंदरी या विदुषीशी लग्न केले होते. राजशेखराच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या वत्सगुल्म (वाशीमचे मूळ नाव) नगरीने फारशी साहित्यसेवा केल्याचे निदर्शनास येत नाही. पण या गावचे अगदी अलिकडे पु. भा. भावे यांच्या 'प्रथमपुरुषी एकवचनी' या आत्मवृत्तात चांगले वर्णन आलेले आहे. त्यांच्या 'सावल्या' या दीर्घ कथेची पार्श्वभूमी वाशीम हीच आहे. असे हे गाव बापूसाहेबांनी १९३५ मध्ये कायमचे स्थायिक होण्यासाठी निवडले. खरे पाहिले असता बापूसाहेबांना कायमचे पुण्यामुंबईत राहणे कठिण गेले नसते. यवतमाळच्या सुसंस्कृत सुसंपन्न घराण्यात बापूसाहेबांचा जन्म झाला. त्यांचे आनंदी विद्यार्थी जीवन पुणे, मुंबई, नागपूर या गावी गेले. त्यांचे घराणे श्रीमंत. बापूसाहेबांच्या वडिलांनी त्यांच्यासाठी भरपूर माया ठेवली होती. बापूसाहेब विनोदाने म्हणतात की माझ्या वडिलांच्या नावात 'चिन्ता' होती व म्हणून वडिलांनी माझ्यासाठी भरपूर शिल्लक ठेवली होती.

बापूसाहेबांची माझी ओळख १९४९–५० साली झाली. श्री. कुंडलराय मोहेकर यांच्या 'सुषमा' कार्यालयात झाली. पहिल्या ओळखीतच आम्ही परस्परांचे मित्र बनून गेलो. बापूसाहेबांचा अतिशय गोड स्वभाव, मित्रांबद्दल जातिवंत उमाळा, निगर्वी स्वभाव व सहानुभूतीचा ओलावा यांमुळे त्यांच्याशी एकदा का

परिचय झाला की तो माणूस त्यांचा मित्रच बनून जातो. बापूसाहेबांचे पहिले दर्शन आजही मला आठवते. उंची कापडाचा कोट, रेशमी शर्ट, 'परमसुख' किंवा 'फिन्ले'चे धोतर, सोनेरी काड्यांचा चष्मा आणि त्यांचा सदैव हसतमुख चेहेरा. बापूसाहेब स्वत:बद्दल कधीच बोलत नाहीत. इतरांच्या काव्याचे कौतुक करतात. त्यांना साहित्याप्रमाणे संगीत व चित्रकला यांचा नाद आहे. ते उत्तम चित्रे काढतात हे पुष्कळांना माहीत नाही. त्यांचा मानसशास्त्राचा चांगला अभ्यास आहे. त्यांना para psychology यां विषयातही गोडी आहे. अनेक कलांचा नादी, सौंदर्यासक्त तत्त्वजिज्ञासु वृत्तीचा हा रसिक मनस्वी गृहस्थ वाशीममधे ४० वर्षे राहात आहे. पण या गावातील लोकांना त्यांचे काव्य, कादंबरी, रहस्यकथा यांची काहीही माहिती नाही. त्यांना हृदयविकाराचे झटके दोनदा येऊन गेले, पण वृत्तपत्रात बातमी नाही.

मी बापूसाहेबांच्या कविता 'अभिरुचि' मासिकातून प्रथम वाचल्या. बापूसाहेबांचे काव्य मूलत: तत्त्वचिंतनपर आहे. ते लोकप्रिय होणे कठिणच. तसेच मानसशास्त्राचा आधार असलेल्या 'करपुतळी' सारख्या कविताही त्यांनी लिहिल्या आहेत. 'शांतम् – दह' ही त्यांची कविता पु. भा. भावे यांना फारच आवडली व त्यांनी त्या कवितेची प्रशंसा करणारे पत्र 'युगवाणी'त प्रसिद्ध केले होते. बापूसाहेबांनी फारच सुंदर प्रेमगीते लिहिली आहेत. 'सत्यकथे'त प्रसिद्ध झालेली 'अतृप्ति' कविता पहा –

अगदी हक्काने माझी दैनंदिनी
अवलोकिलीस तन्मय होऊनी
अर्धांगीस हवी कशास संमति
अनुपस्थितीच आवश्यक होती
गुन्हा केला माफ कबूली तू देता
ओढून जवळ तुजला चुंबिता !
उच्चार जयांचा केला न चुकून
त्याग, धैर्य, तप माझे विलक्षण
असामान्यत्व जे जीवनी सामान्य
दैनंदिनी देई तुज पटवून
बदललीस तू आणि पुरेपूर
व्यापिता हृदया असीम आदर
आता न ते हास्य विनोद मोकळा
हक्काची चुंबने रोपाचा अबोला
वेळी अवेळीचे वर्तन खटचाळ
हट्टासाठी हट्ट तशी धावपळ
तुझिया लोचनी केवळ आदर
अतृप्ति पोळते माझे हे अंतर !

'कातरवेली', 'शंका', 'बरे होते द्वैत' अशा कितीतरी सुंदर कविता त्यांनी लिहिल्या आहेत. 'झिमझिम' ही कविता उद्धृत करण्याचा मोह होत आहे.

झिमझिम पडे पाऊस सकाळी
थरथरतात अंगणात वेली
　　दारात तू उभी होत रोमांचित
　　पाऊस लोचनी तुझिया दिसत
सांगते मुखीचे परी मज स्मित
आनंदाश्रु तुझ्या लोचनी दाटत
　　आठवतो का तो तेव्हाचा दिवस
　　जेव्हा होती दोघां प्रीतीचीच आस
असेच तेधवां होत रोमांचित
आनंदाश्रु आणि लोचनी बघत
　　कथिले हृदींचे गूज परस्परां
　　जुळवीत आणि उत्कट अधरां !

'गुंजा' नावाचा त्यांचा रुबायांचा संग्रह आहे. वानगीदाखल काही थोड्याच रुबाया खाली देत आहे.

'कुणि गणिकागेही गेला सायंकाळी
ठरवून तये अन् सौदा नाणी दिधली
शय्येवर जेव्हा तिला पुशी तो नाव
ती वदली 'माझे गोड ऐकण्या नाम
पडतील तुम्हाला आणिक काही दाम'

—

दोन जरि लोचने एक रमणी दिसे
कैक जरि दर्शने एक लागे पिसे
　　एक लागे पिसे कैक परि आसवे
कैक अश्रूंपुढे दोन ती लोचने
दोन त्या लोचनी अश्रू ना मावणे

—

का दीप मालवुनी तुवां वद घेतले मम चुंबन
केलेस तू मुद्दाम का हे अंध माझे लोचन
　　वक्षावरी तू दाविले हे श्रांत झाले मस्तक
तरि आसवे उभयांसही बघ आपुली कळली परी
अभिषेक होता सारखा हृदयावरी, शीर्षावरी

सध्याच्या वास्तव जीवनासंबंधी व मानवाच्या विकलावस्थेसंबंधीही त्यांनी लिहिले आहे. त्यांची

'स्टेनलेसला होता धोका' ही कविता वाचल्यावर कोणत्या पुरोगामी टीकाकाराची विशाद आहे बापूसाहेबांना नवकवी न म्हणण्याची ? ही कविता 'युगवाणी'त प्रसिद्ध झाली होती पण फारच थोडया नवकवींचे लक्ष त्या कवितेकडे गेले होते. वाचा त्यांची कविता—

काळोखाच्या अभद्र छाया
भिकार रस्ता, गलिच्छ गल्ल्या
मिणमिण जळती दिवे मोजके
उजेड पिवळा त्यांच्या पुरता
कोंदट चाळी उघडया खिडक्या
हात रुंदीची पुढे गॅलरी
मवाळ रेंदा पायाखाली.
गटारातुनी मच्छरसेना
करीत गूं गूं लढवी हल्ला
फरफर गेली एक दुचाकी
कुणी खोकले बळी क्षयाचा
कोठे कुत्रे केकाटे अन्
माडीवरूनी थुक् थुक् टाळी
कैक मवाली तगडे ठेंगू
घामट कुडती रुमाल हिरवे
तोंडांभोवती धूर घुटमळे
अचकट विचकट शिव्या नी गाणी
माय कुणाची हवी कुणाला
दिल्ची भाषा घशात फुटक्या
सैल तुमानी चड्डया अर्ध्या
ट्रेल फ्लॅशची चाले चर्चा
'पेअर साली निकली तोबा !'
पचास गेले पचीस आले
झिंगत शिरले त्रिकूट गल्लीत
ये भपकारा हातभट्टीचा
समोरून ये सावध कोणी
पगडी, चष्मा, काठी, जोडा
पानपट्टीचे वसकट ठेले
एखाद्यावर झगमग गर्दी
आरशास कुणी ओठ लावितो
कुणी मारला कुणास ठोसा
किंचाळत तो गेला वेडा
'प्यारी ! प्यारी ! बोसा बोसा !'
छुन् छुन् छन् छन् आडोशाला
लाडिक कण्हणे 'बुढा मर गयी !'
काळी घागर पोटोबाची
अपुरे लुगडे जुने तांबडे
पोलक्यास नच एकही गुंडी
मळकट चंची सडकी पाने
मोजी नाणी सौदेवाली
किती घासाघिस मालन उंची
रुपया ? वा ! बा ! चौदा आणे
'आणे बारा' 'अच्छा बेटा !'
छातीवरचे काळे गोळे
थप्पट मांड्या, नखात माती
माथ्यावरच्या जटात गुंते
गालफडांचे द्रोण वाळले
क्वचितच साबू स्पर्शी देहा
केरसुणीने झटका कचरा !
चालू सगळा माल मामुली
या पेठेला हाच परवडे
कधि न तुटवडा किंमत माफक
या केव्हाही दुकान उघडे
बारा आणे जिना उतरता
पानासाठी वरती पैसा
या जर नसत्या कळकट थाळ्या
ताटे निर्मळ असती दुर्मिळ !
पडते दिवसा चक्क दरवडे
स्टेनलेसला होता धोका !

गेल्या वर्षीच्या उन्हाळयात मी बापूसाहेबांकडे गेलो होतो. सिव्हिल लाईन्समधे एका छोटयाशा बैठ्या बंगलीत ते राहतात. समोर माळरानाप्रमाणे खूप मोठी जमीन पडलेली आहे. व्हरांडयात त्यांचे वाचन, लेखन चालते. त्यांना कुठेही लिहिता येते. आजकाल दृष्टी फारच मंदावली आहे. एक डोळा कामातून गेला आहे. तरीही बापूसाहेबांचे लेखन चालूच आहे. लेखनापासून पैशाची अगर लौकिकाची त्यांनी कधीच हाव धरली नाही. 'स्वान्तःसुखाय' लेखन चालू आहे. स्वतःबरोबरच रसिक वाचकांना आनंद मिळावा हा त्यांच्या काव्यलेखनाचा हेतू आहे.

त्यांचे काव्यसंग्रह – भावना, झिमझिम, शबनम आणि गुंजा.

बोल बघ

प्रकाश जोशी

त्या शहरात मी नवखा होतो.

शहराचं नावही कधी ऐकलेलं नव्हतं.

शहरात काहीही काम नव्हतं.

जाता जाता बस थांबली.

पाटी वाचली.

' कल्पाउले '

कल्पाउले ?

काहीच बोध झाला नाही. माझ्या समोरच गावाच्या नावाची अक्षरं रंगवून रंगारी निघून गेला.

हे नाव कधी नकाशावर वाचलेलं आढळलं नाही.

न ऐकलेल्या नावाची गावं कधी नसतात का ?

पण ती नावं वाचल्यावर कधीतरी ऐकल्या-सारखी तरी वाटतात.

या शहराचं नाव तसं वाटलं नाही. पाटी वाचून वाटलं उतरावं.

उतरलो.

एस्. टी. निघून गेल्यावर वाटलं उगाचच उतरलो.

सारी माणसं येता जाताना दिसली. सगळं ठीक होतं. फक्त त्यांच्या पापण्या ओठाला भिडलेल्या होत्या. पापण्या हलल्या तरी ओठ हलत नी ओठ हलले तरी पापण्या हलत. त्यामुळे बघताना बोलत व बोलताना बघत. म्हणजे त्यांचं बोलबघणं होतं.

त्या बोलबघण्या माणसांच्या घोळक्यात मी असा उभा होतो. पण कुणाला साधं असं वाटलं नाही की वाटसरू आलाय तरी कुठून नी कशासाठी ? प्रश्नांची उत्सुकता त्या बोलबघण्यात कुठेच डोकावत नव्हती.

गाव बघण्याची इच्छा त्या बोलबघण्याने पार नासून गेली. पावलं थिजून मी तसाच स्टॅंडवर उभा राहिलो.

एस्. टी. ची वाट पाहात.

पोटात अन्नाचा कण नाही नी वर उन्हाचा वऱ्या-पैकी मारा. त्यात ते अलिप्त लगबगीचं बोलबघणं. त्यामुळे मला बस केव्हा एकदा येते नी केव्हा एकदाचा मार्गाला लागतो असं झालं.

जी पाटी बघून मी खाली उतरलो ती पाटी पुन्हा एकदा बघितली.

कल्पाउले.

खाली लहान अक्षरात खडूनं लिहिलं होतं.

' उर्फ बोलबघणे '

खडूने लिहिलेली ती अक्षरे तर मला सुरु-वातीलाच दिसली असती तर मी क्षणाचाही विलंब न करता ठरविलं असतं की इथं उतरण्यात अर्थ नाही.

कारण बोलबघणं हे मला कळायला लागल्या-पासून ओळखीचं. ज्या नावाच्या उत्सुकतेने खाली उतरलो त्या नावाचा अर्थही कळला.

' कल्पाउले ' हे या संस्थानाच्या आजच्या राणीचे नाव. बोलबघणं संस्थानातील राजाचं नाक फार लांब असलं तरी त्याची खूपशी लग्नं झालेली.

त्यातलं कल्पाउले हे कितवं कुणास ठाऊक ? अशाच एका लग्नात माझा जन्म झालेला असल्यामुळे ही लग्ने किती दिवस टिकतात हे मला ठाऊक.

बाईला दिवस गेले की तिला टाकून संस्थानचं नाव बदलणारा हा राजा.

आता कल्पाउले दिसायला कशी असेल कुणास ठाऊक ? पण सकाळी बाहेर पडलेल्या राजाला प्रथम दिसलेली मादी नी नंतर संध्याकाळी झालेली राजाची नवी राणी.

त्यात राजाचा दोष नव्हता. दिवस न जाणारी बाई त्याच्या वाटेला आलेली नव्हती.

दिवस गेलेल्या पत्नीला टाकून प्रथम दिसणाऱ्या

बाईशी माझा मुलगा लग्न करील असा नवस राज-मातेनं बोलला होता.

तिच्या तरुणपणी तिचं लग्न होऊन जेव्हा राजमाता सासरी आली तेव्हा संस्थानात सुबत्ता नांदत होती. राजमातेला दिवस गेले नी संस्थानात कोरडा दुष्काळ पडला. सगळी जमीन धुपून गेली. पाच वर्ष टिकलेल्या या दुष्काळाने गिधाडाघुबडांचे राज्य सुरू झाले. पाच वर्ष टिकलेल्या या दुष्काळाने राज-वाड्यातल्या कोठीघरातलं धान्यही संपलं.

पाच वर्षांच्या मुलाला बरोबर घेऊन राजमाता संस्थानच्या राजदेवतेला शरण गेली. राज–पुरोहिताने सांगितलेला नवस तिने घेऊन टाकला. हा नवसाचा वसा संपणार केव्हा तिलाही माहिती नाही.

राजपुरोहिताने वसा सांगितला त्याचं उद्यापन कसं करायचं हे सांगून व्हायच्या आतच हृदयविका-राच्या झटक्याने तो मरण पावला.

मरण्यापूर्वी माझ्या आईने त्याला पाणी पाजले. त्यावेळी तिला त्याने उद्यापन कसं करायचं हे सांगितलं असं लोक म्हणतात, राजालाही तसं वाटतं नी राज-मातेचं तर तसं ठाम मत आहे.

ज्या दिवशी अन्नपाण्यावाचून राजपुरोहित मेला त्याच दिवशी राजमातेनं वसा घेतला नी दुसऱ्याच दिवशी पहाटे पहाटे शयनमंदिरातून बाहेर पडणाऱ्या राजाच्या नजरेला दालनातील केर काढणारी माझी आई दिसली.

तिचे ओठ नी डोळे एकमेकाला भिडलेले होते. तिच्या लहानपणी राजवाड्यात आलेल्या एका ऋषीने तिला ' बोलवघ ' म्हणून हाक मारली नी तेच नाव रूढ झालं. राजाने नवसाची पहिली बायको म्हणून संस्थानचं मूळ नाव बदलून ' बोलवघणं ' ठेवलं. तेच नाव आता संस्थानचं मूळ नाव म्हणून रूढ झालंय. खरं मूळ नाव आता जवळजवळ सगळे विसरले आहेत.

राज्याच्या कल्याणासाठी आपल्या आईने घेतलेला वसा चालू राहावा म्हणून राजा दिवस गेलेली बायको टाकून नवी बायको करत गेला नी संस्थानचं नाव बदलत गेला.

दिवस गेलेल्या राणीने तावडतोब संस्थानची वेस ओलांडून परराज्यात जावे असा दंडक होता. राजापासून झालेले मूल कुठे तरी सोडून परत आपल्या मूळ नवऱ्याकडे किंवा लग्न झालेले नसल्यास आपल्या पित्याकडे परतण्यास मुभा असे.

सोडलेली पोरं पुढे आलेपाक विकतात किंवा एस्. टी. खात्यात कंडक्टर ड्रायव्हर म्हणून लागतात व पुढे जमल्यास चेकरच्या हुद्यापर्यंत जातात.

राजा सोळा वर्षांचा झाल्यावर आईला दिवस गेले. तिला दिवस गेल्यावर ती ज्या दिवशी संस्थान सोडून गेली त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी राजाच्या नजरेला पडली प्रधानाची कन्या. प्रधानाने आपल्या मुलीचा विवाह करण्यास नकार देताच बोलवघणे संस्थानात एकच खळबळ माजली. शेवटी प्रशस्त राज-पटांगणात दवंडी पिटवून जाहीर सभा घेण्यात आली. ह्यात सगळ्यांची भाषणं झाली. सगळ्यांनी ऐकली. संस्थानच्या हिताचा विचार झाला. दोन्ही बाजूने मते मांडण्यात आली. नवस जर मोडला तर न संपणारा कोरडा दुष्काळ पडून वंशनाश अटळ होता. किंवा आपल्या आयावहिणींची लग्ने वेळ पडल्यास राजाशी लावून देण्याची तयारी ठेवून सुखासमाधानात जगण्याची संधी साधता येणार होती.

काय करायचं ?

बोलणं नी बघणं एकाच वेळी करावं लागणार होतं. त्या वेळेपासून सगळेजण बोलवघणे झाले.

सभेत पंचसमितीने निर्णय घेतले. वसा पुढे चालू ठवायचा. बोलवघ संस्थानच्या बाहेर जाण्यापूर्वीच दुष्काळ संपला आहे. म्हणून लवकरच नवसाचं उद्यापन करावं. उद्यापन कसं करायचं हे बोलवघला माहीत असल्याने तिने मुलाला जन्म दिल्यानंतर तिच्याकडून त्याची माहिती काढावी. तोपर्यंत वसा पुढे चालू ठेवावा. वसा पुढे चालू आहे.

माझ्या आईने मला जन्म दिला तो संस्थानच्या हद्दीबाहेरील जंगलात. एका काळोख्या गुहेत. एका काळोखातून दुसऱ्या काळोखात आल्यासारखं वाटले. त्या निबिड अंधारात फक्त आईचे डोळे तेवढे माझ्या डोळ्यांना दिसले. तिचे ओठ दिसले नाहीत तरी त्यातून व्यक्त होणारी भीती तिने मला उराशी कवटाळल्यावर जाणवली. गुहेत दूर अंतरावर झिरपणाऱ्या पाण्याचा आवाज कानावर रेंगाळत राहिला. तिचे हुंदके त्यात विरून गेले. माझ्यामुळे तिला दुःखच झालंय् हे बघून मी आवाज न करता आतल्या आत झिरपत राहिलो.

तिचं आतडं तोडणारं, मला कवटाळून रडणारं दुःख आहे तरी काय ? हे मला अखेरपर्यंत समजलं नाही.

मला बरोबर घेऊन ती संस्थानाकडे न वळता वाट नसलेल्या जंगलाकडे वळली. गुहेगुहेतून आम्ही दिवस काढले. कंदमुळे खाल्ली. झऱ्याचं पाणी प्यालो. तिच्यासारखे माझे ओठ डोळ्यांना भिडलेले नाहीत. माझे डोळे नी ओठ यातील अंतर मोजणे हा तिचा वेळ घालविण्याचा एकमेव छंद.

प्रधानाच्या मुलीला दिवस गेले तरी बोलवघ कशी परत आली नाही म्हणून शोधाशोध सुरू झाली. आसपासच्या राज्यात दूत धाडले गेले. जंगलं धुंडाळण्यात आली. शेवटी एक दूत आमच्या गुहेसमोर येऊन उभा राहिला.

सिंहाच्या पावलांनाही न भिणाऱ्या आईने माणसाच्या पावलांचा आवाज ऐकून मला कपारीमागे लपविले. क्षणभर बोलवघितलं, नी श्वास रोखून उभी राहिली. दुसऱ्या क्षणी तिला फरफटत बाहेर ओढून काढण्यात आलं. कपारीत दगडासारखा खिळलेलो मी जेव्हा भानावर आलो तेव्हा ती संस्थानात दाखल झालेली होती. त्यावेळी माझं वयही फार नव्हतं. तिच्या शोधात जंगल सोडलं.

विचारपूस करत करत एक एक गाव मागे टाकत बोलवघण्याकडे येत होतो, ते तिच्याबद्दल चर्चा ऐकतच. तिचं नाव घेताना लोक थुंकत. द्वेषानं बोलत. नवसाचं उद्यापन कसं करायचं हे तिने सांगितलं नाही. नकार दिला. म्हणून लोकमत तिच्या विरुद्ध गेलेलं.

नंतर तिचा छळ कसा चाललाय याची वर्णनं चावडी चावडीवर ऐकायला मिळाली. ती ऐकून माझ्या डोळ्यात रक्त उसळे. वाटे एकेकाच्या नरडीचा घोट घ्यावा. पण त्यापेक्षा आईला भेटणे अधिक महत्वाचे वाटे. तिच्या हालाचे वर्णन ऐकून अंगावर शहारे आले, नी धावत सुटलो, ऊर फुटेस्तोवर दोन दिवस धावलो. तिसऱ्या दिवशी ज्या गावात पोहोचलो त्या गावावर प्रेतकळा पसरलेली दिसली. सूर्य चांगला हातभर वर आला तरी सगळेच चेहरे सुतकीच दिसत होते. झालं तरी काय ?

एका म्हाताऱ्याला विचारले.

' चांडाळीण न सांगताच मेली

तो काय सांगतोय मला काहीच अर्थबोध होईना. दुसऱ्याने ती कशी मेली ते सांगितले.

नराधमांनी ओठ पिळून आईचा जीव घेतला होता.

पण उद्यापन कसं करायचं हे काही तिचे ओठ बोलले नव्हते.

म्हाताऱ्याच्या छाताडात लाथ घालून मी राजवाड्याच्या दिशेने पिसाटासारखा धावत सुटलो.

तिने उद्यापन कसं करायचं हे का सांगितलं नसेल ? हा एकच प्रश्न सारखा छळत होता. मी धावत होतो.

सूडाची पेटलेली आग हळूहळू विझत गेली. नी तिने उद्यापन कसं करायचं हे का सांगितलं नाही हा प्रश्न छळत गेला.

राजवाड्याची दिशा सोडून मी दिशाहीन भटकत गेलो. गेली कित्येक वर्षे भटकतोय्. पण उत्तर सापडलेलं नाही.

उद्यापन कसं करायचं कुणालाच कळलेलं नाही. वसा पुढे चालू आहे. कारण कधी न संपणारा कोरडा दुष्काळ पडून वंश नष्ट व्हावा असे कुणालाच वाटत नाही.

आजच राजाचं आणखी एक लग्न झालेलं असावं. कारण रंगारी माझ्यासमोरच नवीन नावाची अक्षरं रंगवून गेला.

' कल्पाऊले. '

मी एस्. टी. ची. वाट पहात उभा आहे.

केव्हा एकदा शहर सोडीन असं झालय्. आजूबाजूला आलेपाक विकणाऱ्या पोरांची गर्दी आहे.

माझ्या शेजारी येऊन उभा राहिलेला हा माझ्या सारखाच कुणी अविश्रांत भ्रमंती करणारा दिसतोय. त्याच्या डोळ्यात नी ओठात माझ्या सारखेच अंतर आहे. माझ्याकडे न बघताच तो बोलू लागला.

' काय हे नाव बदलणारं संस्थान. हे लोक जीव का देत नाहीत ? आज संस्थानाला नाव दिलय् राजमाता कल्पाउले हिचं. होय, आज सकाळी राजाने प्रथम पाहिले राजमातेला, ते बोलवघण्या जनतेला समजलं. त्यांनी बळजबरीने राजाचं लग्न त्या ९० वर्षाच्या थेरडीशी लाऊन दिलंय्. शिव शिव शिव ! वसा पुढे चालू ठेवायचा म्हणून काय आईचं मुलाशी लग्न लावायचं ?

त्यापेक्षा ही मंडळी त्या वोलवघच्या मुलाला का नाही शोधत ?'

मी सावध चपापलो.

'त्याला पकडा नी त्याच्या नरडीच्या रक्ताचा अभिषेक घाला राजदेवतेला. नवसाचं उद्यापन होईल.'

माझ्या घशाला कोरड पडली.

तुम्हाला कसं माहिती ?

तो गडगडाटी हसला.

'कसं माहिती म्हणजे ? साऱ्या जगाला माहिती आहे. वोलवघ माझी प्रेयसी. मरण्यापूर्वी तिने मला कुण्णाला सांगू नका असं विश्वासात घेऊन सांगितलं. ती मेल्यावर मी राजाला विश्वासात घेऊन सांगितलं. त्याने प्रधानाला विश्वासात घेऊन सांगितलं. त्याने सेनापतीला विश्वासात घेऊन सांगितलं. त्याने दहा हजार खास सैनिकांना विश्वासात घेऊन सांगितलं. त्यांनी आसपासची सगळी जंगलं पालथी घातली. त्यात डोळे नी ओठ जोडून असणाऱ्या एकजात पोरांना पकडून आणण्याचा सपाटा लावला. नरडीच्या रक्ताचे अनेक अभिषेक झाले. पण उद्यापनाचा कौल राजदेवतेने अजून दिलेला नाही. तो पोरगा सापडेल की नाही कोण जाणे ?'

मी श्वास सोडला.

आईचं दुःख कळलं. ऊर भरून उतू गेलं.

मला तसा धोका नव्हता. पण क्षणभर त्या शहरात थांबावं असं वाटेना. जे सांगण्यास नकार देऊन आईने छळ सोसून जीव गमावला ते सांगत फिरणाऱ्या तिच्या प्रियकराकडे बघवेना.

एस्. टी. लवकर आली. जागा मिळाली. फार वेळ न थांबता ती सुरू झाली.

'कल्पाउले' शब्द अस्पष्ट होत गेले.

'वोलवघ' नाव आता इतिहासजमा झालेलं.

राजमातेला दिवस जाणार नव्हते.

अस्पष्ट होत गेलेलं 'कल्पाऊले' नाव कायम होत गेलं.

दोन कविता

बजरंग सरोदे

१.

डोळ्यांच्या शब्दात
अर्थ अंकुरले
देहात सुगंधी
उमलली फुले

० ०

२.

शब्दांचा पाऊस
मन ओले; मुके
हळुवार तुझ्या
देहाकडे झुके

वादळ

सुलभा हेर्लेकर

शिडीवरून घसरले ऊन
कलश भरून आली संध्याकाळ
नको बरसू पावसा अवेळी
वाट अडवू नको येणाऱ्या पावलांची

लय धारांची धारावली
गूढ कौलावर सर अडली
काळोखाचे अंथरून भिंग
चौकटीत ही उभी वेळ
रक्तातून फुले तेव्हा
तीक्ष्ण कळांचे वादळ. . .

मराठ्यांच्या इतिहासाची साधने पोर्तुगीज दप्तर

गो. बं. देगलूरकर

इतिहासाचा अभ्यास अस्सल साधनांच्या द्वारे होणे अत्यंत अवश्यक असते याबद्दल दुमत होणार नाही. पाश्चात्यांच्या संपर्कामुळे इतिहासाबद्दल आस्था बाळगायला सुरुवात होऊनही काही शतके आता उलटली. मात्र मध्यंतरीच्या काळात म्हणजे सुमारे २५ वर्षांपूर्वी ज्या प्रकारचा अभ्यास होत असे तसा अभ्यास करण्यासाठी जी निष्ठा, पोटतिडिक आणि चिकाटी हवी असते तशी आता राहिलेली आढळत नाही. एकेकाळी महाराष्ट्रात इतिहासाचार्य राजवाडे, श्री. वासुदेवशास्त्री खरे, पारसनीस, रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी एक परंपरा या इतिहासक्षेत्री निर्माण केली होती. ती एकाकीपणे प्रा. ग. ह. खरे चालवीत आहेत असे दिसते. ही अनास्था इतिहास घडविलेल्या महाराष्ट्रीय मंडळींना खचितच भूषणास्पद नाही.

पूर्वीच्या मानाने कुठल्याही क्षेत्रातील संशोधनार्थ आता अधिक सोयी–सवलती उपलब्ध झालेल्या आहेत. अनेक संस्थांच्या कडून पुरेसे द्रव्यबळही उपलब्ध होण्या-सारखी परिस्थिती आहे. तेव्हा अशा सुवर्ण संधीचा फायदा घेण्यासाठी इतिहास–संशोधकांनी तत्पर असणे आवश्यक आहे.

हजारो वर्षांपूर्वीचा इतिहास पुरातत्त्वाच्या अभ्यासाने उभारता येतो आणि शेकडो वर्षांपूर्वीचा उभारला जाऊ शकतो तो शिलालेखांच्या, ताम्रपत्रांच्या आणि नाण्यांच्या सहाय्याने. कागदाचा शोध लागला तेव्हापासूनच्या इतिहासाची नोंद घेणाऱ्या इतिहास-कारांचे कार्यक्षेत्र फार विस्तृत झाले. खूप घटनांची विपुल प्रमाणात झालेली नोंद पडताळणे आणि त्या नोंदींची कागदपत्रे जपून ठेवणे हे दुहेरी काम त्यांना करणे भाग आहे.

त्यात परकीयांच्या राज्यकालामध्ये झालेल्या परकीय भाषेतील नोंदींची दखल घेणे क्रमप्राप्त ठरले. अन्यथा त्या त्या कालखंडांचा इतिहास एकांगी ठरतो. मग परकीय भाषा जाणणाऱ्या इतिहासज्ञाची उणीव भासू लागली. ही उणीव काही प्रमाणात भरून काढण्यासाठी जी मंडळी पुढे सरसावली त्यांत सदर्हू ग्रंथाचे अनुवादक आणि संपादक श्री. स. शं. देसाई यांची गणना केली पाहिजे असे कार्य त्यांनी केलेले आहे.

आपल्याकडे गेली काही वर्षे असे भाषांतर इतिहासाच्या साधनांच्या समृद्धीसाठी होते आहे. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रा. ग. ह. खरे यांच्या मार्गदर्शनाखाली बिकानेरला संशोधकांची एक तुकडी काही वर्षांपूर्वी पाठविलेली होती. मोंगलांच्या दरबारातील रजपूत मनसबदारांच्या संस्थानातील डिंगली भाषेतील कागदपत्रे तेथे एकत्रित केलेली होती. शिवाय मोडी लिपीतील काही कागद-पत्रांचे भाषांतरही केले गेले. श्री. सेतु माधवराव पगडी फारशीतील कागदपत्रांचा इंग्रजी व मराठी अनुवाद वेळोवेळी इतिहासकारांसमोर आणतात. मात्र फ्रेंच आणि पोर्तुगीज भाषेतील कागदपत्रांचा म्हणावा त्या प्रमाणात अनुवाद होत नव्हता. ही म्हटल्यास संशोधनक्षेत्रातील मोठीच उणीव होती. फारशी कागदपत्रांवरून कळणारा दृष्टिकोण एकांगी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी संबंधित घटनेवर समकालिनांनी केलेली पोर्तुगीज भाषेतील नोंद अभ्यासकासमोर आली तर त्या घटनेसंबंधीचा त्याचा निष्कर्ष सत्याच्या अधिक जवळचा ठरू शकतो. उदा. मोंगल दरबारातील कागदपत्रावरून 'शिवा' हा एक सामान्य जहागिरदार होता असा मजकूर आलेला असेल त्याच वेळी पोर्तुगीज व्हाइसरॉयने त्याची तुलना

आलेक्झांडरशी व सीझरशी केल्याचे आढळते (प्रस्ता. पृ. ५). तसेच जेव्हा काही कागदपत्रांत शिवाजी चार मावळे जमवून दंगा करतो असा उल्लेख आढळतो तेव्हा पोर्तुगीज कागदपत्रात कुठल्याही मोगल किंवा भारतातील इतर सत्ताधाऱ्यापेक्षा महाराजांची लष्करी प्रतिभा अजोड होती असा मजकूर आढळतो. काही वेळा अशा भाषांतरामुळे नवीच माहिती उजेडात येते. उदा. सुरतेची लूट महाराजांनी होड्यांतून भरून आणली, असा इंग्रजी कागदपत्रात न आढळणारा उल्लेख पोर्तुगीज कागदात आढळतो.

वरीलप्रमाणे ऐतिहासिक घटनांवर नवा प्रकाश टाकणारी कितीतरी माहिती प्रस्तुत ग्रंथाच्या सुमारे २९५ पृष्ठांत सामावलेली आहे. या ग्रंथात पोर्तुगीज व्हाइसरॉयची, शिवाजी, संभाजी, राजाराम आणि अनेक पेशव्यांची पत्रे आलेली आहेत. पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या पत्रांवरून, त्यांचा मतलबीपणा, मानभावी स्वभाव, धूर्तता, वनवावनवी, व्याजस्तुती, स्वदेशाभिमान इत्यादी पैलूंवर प्रकाश पडतोच; शिवाय ते त्यांच्या वकिलांना हेरगिरी करण्यास, लाच व बक्षिसी देण्यास कसे प्रवृत्त करीत हेही नजरेला येते.

त्याशिवाय पृष्ठ क्र. ३९–४५ वर पत्र क्र. ७२ मधील नारायणरावांच्या खुनासंबंधी व नंतरच्या हालचालीसंबंधी आलेली विस्तृत माहिती पोर्तुगीज नीतीवर पुरेसा प्रकाश टाकणारी आहे.

पुस्तकाच्या पृ. १५२ पासून विशिष्ट प्रकरणासंबंधीचा भाषांतरित मजकूर दिलेला आहे. तो एकत्रित केलेला असल्यामुळे संबंधित प्रकरणावर विशेष विचार करता येईल असा आहे. उदा. चौथाईचा उगम (१५२ – १५५), रायगडला पोर्तुगिजांचे शिष्टमंडळ (पृ. १५६ – १७४), शिवाजी महाराज आणि कोकण (पृ. १७५ – १८६), शिवाजी (पृ. १८७ – २२७), संभाजी (पृ. २२८ – २८५) आणि राजाराम (पृ. २८६-२९४). प्रस्तुत प्रकरणांपैकी संभाजी–पोर्तुगीज संबंधावर सुमारे अठ्ठावन्न पृष्ठांचा मजकूर आलेला आहे. संभाजी राजांच्या चरित्रातील कितीतरी गोष्टींवर त्यामुळे प्रकाश पडतो. पन्हाळगडातील कैदेतून स्वतःची सुटका करून घेताच, पुढील हालचालीस प्रारंभ करण्याच्या आधीच त्याने पोर्तुगीजांशी शांततेचा तह करण्याचा मनसुबा केल्याचे त्याच्या दूरदर्शित्वाचे व राजकीय सावधतेचे उदाहरण यात आढळते.

सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक डॉ. पांडुरंग स. पिसुर्लेकर यांनी संपादिलेल्या पोर्तुगीज भाषेतील मराठ्यांच्या इतिहासाची साधने ठरणाऱ्या कागदपत्रांच्या भाषांतराचे हे कार्य पुढे चालविण्याचे दायित्व अत्यंत योग्य व्यक्तीकडे आले याचा आनंद होतो. श्री. स. शं. देसाई यांनी योग्य शब्दांत रसाळ भाषांतर केल्याचे पानोपानी आढळते. एवढेच नव्हे तर इतिहासाची योग्य जाण त्यांना असल्याची खात्री पटते. निरनिराळ्या परकीय भाषांतील कागदपत्रांत दडून राहिलेली इतिहासाची साधने संशोधकांच्या समोर आली पाहिजेत आणि मराठ्यांचा ओजस्वी इतिहास सर्वांगाने पुष्ट झाला पाहिजे, सत्याच्या निकषाला उतरला पाहिजे. श्री. देसाई पोर्तुगीज भाषेतील साधने मराठी भाषिकांना उपलब्ध करून देत राहतील अशी अपेक्षा बाळगू या. पुढे अरबी – फारशी जाणणारा मराठी माणूस काय की पोर्तुगीज जाणणारा मराठी माणूस दुर्मिळ होणार आहे (ही भीती खरी न ठरो); हे लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने, संशोधन–संस्थांनी आणि विद्यापीठांनी श्री. देसाई यांच्यासारख्या विद्वानांकडून कार्य करून घेण्याची त्वरा करणे आवश्यक आहे, असे नमूद करावेसे वाटते.

(**मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर – खंड दुसरा, प्रमुख संपादक** : डॉ. पांडुरंग स. पिसुर्लेकर, **संपादक – अनुवादक** श्री. स. शं. देसाई, महाराष्ट्र राज्य साहित्य – संस्कृती मंडळ. मुंबई, किंमत रुपये १२ = ५०)

तिमिरातून तिमिराकडे

जयन्त बाळकृष्ण कुलकर्णी

अर्वाचीन मराठी कवींत केशवसुतांचे स्थान अद्वितीय आहे. काव्यार्थाची व काव्यबंधाची नवी दृष्टी त्यांनी काव्यातून निर्माण केली आणि मराठी कवितेला रुळलेल्या मार्गातून बाहेर काढून तिला नवीन संकेत, नवीन अर्थ प्राप्त करून दिले. यामुळे त्यांचे काव्य विजेसारखे लखलखणारे ठरले. त्यांनी कवितेला वीज म्हटले आहे आणि ही वीज धरताना शंभरापैकी नव्याण्णव जणांचे हात होरपळून जातात असे उद्गार काढले आहेत. या वीज धरण्याच्या प्रयत्नात ते स्वत:ला संपूर्ण विसरले होते. कवितेने त्यांना शब्दश: वेडे केले होते. म्हणून--

तिने मला वेडा केले
तिच्यावरी ही फिर्याद

असे वर्णन केले आहे. अशा प्रतिभेचे जन्मजात लेणे लाभलेला पृथ्वीतलावर असंतुष्ट राहिला असल्यास नवल ते कोणते ? त्यांच्या या 'ती अत्यद्‌भुत गूढ शक्ति सहसा संचारता अंतरीं, मुक्तात्मा गगनी उडे' याची जाणीव न झाल्यामुळे पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत असताना त्यांना प्रिन्सिपाल आपटेंनी 'दुर्मुखलेला' म्हणून हिणवले. मानी केसवसुतांना हे आवडले नाही. त्यानी मग रोखठोक उत्तर दिले–

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनी या, चालावयाचा पुढें
आहे सुंदर तो सदा सरसवाङ्‌मनिष्यन्द चोहींकडे ।
तुम्हीं नाहिं तरी सुतादि तुमचे घातील तो प्राशुनी ।
कोणीही पुसणार नाहिं, 'कवि तो होता कसा आननीं ?'

आणि खरोखर केशवसुत ही व्यक्ती गूढ ठरली आहे.

जन्मतिथी कोणती ?

अमर्याद शक्तीचा साक्षात्कार झालेल्या या कवीने आपल्याबद्दल असे लिहून ठेवले नाही. त्यामुळे त्यांचा जन्म केव्हा झाला, हा एक वादळग्रस्त प्रश्न ठरला. केशवसुतांच्या जन्माबाबत पूर्वी चर्चा झाली नाही असे नाही. परंतु या चर्चेला महत्व आले ते जन्म-शताब्दी जसजशी जवळ आली तेव्हा. दि. १५ मार्च १९६५ च्या 'दैनिक मराठ्या'त आचार्य अत्र्यांनी एक सुरेख अग्रलेख लिहून पुढील वर्षी म्हणजे दि. १५ मार्च १९६६ रोजी येणारी केशवसुत जन्मशताब्दी सर्वांनी मोठ्या उत्साहाने साजरी करावी असे आवाहन केले. आचार्य अत्र्यांनी ही तारीख उपलब्ध माहितीच्या आधारे दिली होती. ही तारीख चुकीची असून ७ ऑक्टोबर १८६६ ही जन्मतारीख असल्याचे काही जणांनी यावेळेस पत्रद्वारे कळविले. तेव्हा या तारखेंचा घोटाळा का झाला याची उलटसुलट चर्चा सुरू झाली. काव्यरत्नावलीच्या १९०५ च्या सालगुजर या सदरात संपादकांनी केशवसुतांची जन्मतारीख मार्च १८६६ दिली आहे. मात्र तारखेचा उल्लेख नाही. ही माहिती केशवसुतांचे बंधू श्री. मोरो केशव दामले यांनी पुरविली आहे अशी टीप या माहितीला जोडली आहे. एक तर घरातून मिळालेली माहिती आणि तीसुद्धा केशवसुतांच्या मृत्यूनंतर लवकर प्रसिद्ध झाल्यामुळे ती अधिकृत ठरली गेली.

इंदूरचे कवी कै. नरहर शंकर रहाळकर हे केशवसुतांचे स्नेही व भक्त होते. त्यांनी मासिक मनोरंजनाच्या १९०६ च्या अंकात केशवसुतांची जन्मतारीख १५ मार्च १८६६ दिली. हीच तारीख केशवसुतांचे एक सहाय्यक शिक्षक व फैजपूर यथे शेजारी राहणारे कै. श्री. वा. वा. गद्रे यांनी 'केशवसुत-स्मृतिग्रंथात' दिली. यामुळे प्रा. रा. श्री. जोग व कै. वि. स. खांडेकर यांनी १५ मार्च हीच तिथी आपल्या पुस्तकात दिली. प्रा. भवानीशंकर श्री. पंडित यांनी 'समग्र केशवसुत' या आपल्या ग्रंथात पुढील माहिती दिली आहे. "केशवसुतांचा जन्म शके १७८७ मध्ये फाल्गुन वद्य १४ म्हणजे इ. स. १८६६ च्या मार्चमध्ये दिनांक १५ ला रत्नागिरीजवळ मालगुंड या गावात झाला."

केशवसुतांचे बंधू कै. सी. के. दामले यांनी संपादित केलेल्या 'केशवसुतांच्या' आवृत्तीत केशव-

सुतांची जन्मतिथी भाद्रपद वद्य १४ शके १७८८ म्हणजे दि. ७ ऑक्टोबर १८६६ ही दिली आहे. हीच तिथी केशवसुतांचे पुतणे प. चिं. दामले यांनी त्यांच्या पुस्तकात स्वीकारली आहे. या तिथीला आधार म्हणजे जन्मकुंडली. दैनिक मराठ्यात जेव्हा १५ मार्चचा उल्लेख झाला तेव्हा सुप्रसिद्ध ज्योतिषी इन्दुमती पंडित आणि बोरकर यांनी पत्रिका बरोबर असून जन्मतिथी ७ ऑक्टोबर १८६६ असण्याचे मत व्यक्त केले. परंतु कै. सी. के. दामले यांनी केशवसुतांच्या मृत्युतिथीबद्दल पूर्वी निरर्थक वाद घातला होता. त्यामुळे एका बाबतीत चूक झाली. यावरून दुसरी बाब बरोबर कशावरून ? असे काही जणांना वाटले. यामुळे मोरो केशव दामले यांनी पुरवलेली तिथीच योग्य असे मानण्याकडे कल गेला आणि ते साहजिकच होते. मात्र महाराष्ट्र शासनाने ७ ऑक्टोबर १८६६ ही तिथी मान्य करून त्या दिवशी राज्यात जन्मशताब्दीचा फार मोठा कार्यक्रम घडवून आणला.

धांडोळा घेता

केशवसुतांनी अनेक ठिकाणी वास्तव्य केले, नोकऱ्या केल्या. तेव्हा त्यांपैकी एखाद्या ठिकाणी त्यांच्या जन्मतिथीची नोंद मिळते का म्हणून अनेक जणांनी प्रयत्न केले. १८९० ते ९७ या काळात ते मुंबईत होते. मुंबईत शांताराम चाळीसमोरील माधवजी प्रेमजी चाळीत ते राहात होते. या वेळेस केशवसुतांचा इतरांप्रमाणे वैद्य बन्धूंशी परिचय झाला. या वैद्य बंधूंपैकी सुन्दरराव वैद्य हे एक चित्रकार होते. त्यांनी स्मरणाने काढलेले हेच काय ते केशवसुतांचे चित्र म्हणून आता आपण ओळखतो. जुन्या काळच्या लोकांना डायऱ्या लिहिण्याची संवय होती. सुंदररावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या डायऱ्या कोणत्यातरी संस्थेला दिल्याचे समजते. कदाचित यांपैकी एकाद्या डायरीत केशवसुतांची माहिती असण्याचा संभव अधिक आहे. प्रयत्न झाला पाहिजे.

मुंबईच्या वास्तव्यात केशवसुतांनी दादर न्यू इंग्लिश स्कूल (सांप्रतचे छबिलदास लल्लूभाई हायस्कूल) येथे नोकरी केली. चौकशी करता रेकॉर्ड नष्ट झाल्याचे कळले. हाच अनुभव कल्याणची सुभेदार वाडा शाळा, नागपूरचे जुने नीलसिटी हायस्कूल (सांप्रतचे दादासाहेब धनवटे नगर विद्यालय) व धारवाडची सरकारी शाळा यांबाबत आला. रेकॉर्ड उपलब्ध नाही हाच सर्वत्र सूर उमटला. यासंबंधी मालगुंडकरांनी फार परिश्रम घेतले. आपल्या गावच्या थोर साहित्यिकाची जन्मशताब्दी मोठ्या प्रमाणावर साजरी होणार या कल्पनेने प्रफुल्लित होऊन त्यांनी शंभर वर्षांचे रेव्हिन्यू दप्तर बारकाईने तपासले. अनेक वृद्ध लोकांच्या मुलाखती घेतल्या. परंतु केशवसुत कोणालाच गवसले नाहीत.

मात्र विलक्षण अनुभव आला, तो पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचा. केशवसुत या शाळेत सन १८८६ मध्ये शिकत होते. शाळेचे रजिस्टर पाहिले असता जन्मतारखेचा रकाना कोराकरीत ! यापुढे आणखीनच गंमत आहे. जन्मस्थानचा उल्लेख आहे तो ' Walw किंवा ne म्हणजे ' वळणे सारखा वाटतो. (आली आपत्ती ! हे कोणते जन्मस्थान ? मग ' मालगुंडचे ' काय करायचे असा प्रश्न उपस्थित होतो. तथापि हे कारकुनाचे लिखाण असल्यामुळे चूक होण्याचा संभव अधिक आणि इतर पुरावे पाहाता मालगुंड हेच जन्मस्थान ठरते.) नोकरीनिमित्त धारवाडला राहिलेल्या माझ्या मित्राने केशवसुतांसंबंधी संशोधन करण्याचा खूप प्रयत्न झाला. परंतु त्याला काही साध्य झाले नाही.

जन्मतारखेप्रमाणे फोटोचाही अभाव हे केशवसुतांच्या जीवनातील एक वैशिष्ट्य आहे. सुंदरराव वैद्यांनी चितारलेले चित्र हे केशवसुतांचे एकमेव चित्र. स्मरणातून काढलेले हे चित्र केशवसुतांची हुबेहूब छबी दाखवीत नाही, ही केशवसुतांना पाहिलेल्या लोकांची तक्रार. त्यामुळे केशवसुत दिसायला कसे होते हा प्रश्न शेवटपर्यंत गूढच राहिला.

केशवसुतांच्या जन्मग्रामी म्हणजे मालगुंडला ज्या घरात केशवसुत जन्मले तेथे स्मारक उभारावे असा शासनाचा बेत होता. परंतु कायदेशीर बाबीमुळे ही सुंदर योजना सोडून द्यावी लागली ! अशा प्रकारे स्वर्ग–पृथ्वीचे मीलन घडवून आणण्याची स्वप्ने बाळगणारा हा प्रतिभावान कवी जेव्हा आपल्यातून गेला, तेव्हा जाताना त्याने जणू काय पुढील कूट प्रश्न टाकला होता —

कवी तो होता कसा आननीं ?

हेल्पलेस

सुरेश खेकाळे

टक् टक् – टक् टक् – टक् टक् घड्याळाचा आवाज अखंड चालू होता. एवढा मोठा वॉर्ड असूनही शांततेमुळे त्या टोकाला असलेल्या घड्याळाचा आवाज या टोकाला स्पष्टपणे ऐकू येत होता. त्याची चुळबुळ चालू होती. सुरुवातीपासून झोप अजिबात आलेलीच नव्हती. रात्री नऊ ते दहाच्या दरम्यान हाऊस सर्जन्स, रजिस्ट्रार्स, नर्सेस आणि मेट्रनचे राऊंडस् आटोपले होते. त्यानंतर झोपेची इंजेक्शन्स, गोळ्या त्या त्या पेशंटला देऊन झाली. आजूबाजूच्या वॉर्डातल्या स्टाफ नर्सेस स्टुडंट नर्सेसच्या भेटी–गाठी गप्पा–टप्पा कॉफी–पान आटोपले होते. आणि जिकडे तिकडे शांतता झाली. फक्त सर्जिकल वॉर्ड जागा होता. नुकतेच ऑपरेशन झालेले पेशंट्स् विव्हळत होते. काहींना सलाईनच्या बाटल्या चढविण्याचे काम चाललेले होते. त्या वॉर्डाच्या बाजूला इंटेंसिव्ह केअर युनिटची खोली. तिच्या दारावर बाहेरून लालभडक दिवा लागलेला आणि त्या लाल प्रकाशात भयाण वाटणारी पांढरी अक्षरं ' सायलेन्स प्लीज '. त्या खोलीत मात्र शांततेचा भंग न करता डॉक्टर – नर्सेसची वर्दळ चालू होती. कुणी तरी सिरीअस असावा.

आजुबाजूच्या हालचालींचा हिशेब पूर्ण झाला तरी फक्त बाराच वाजले होते. डोळ्यात झोप अजिबात नव्हती. डोळे सताड उघडे ठेवून तो पडून होता. सिस्टरला रिक्वेस्ट करूनही झोपेचे इंजेक्शन रिपीट करायला ती तयार नव्हती. घड्याळात एक ठोका पडला. काही वेळानं आणखी एक ठोका. बापरे ! आत्ताशी एक वाजला. अजून पहाट व्हायला चार तास अवकाश ! जातील, जातील, हे चार तासही जातील. गेला महिना गेला तसे हे चार तासही जातील.

बरोबर एक महिन्यापूर्वी त्याला त्या हॉस्पिटलात ॲडमिट करण्यात आलं होतं. रात्रीच्याच वेळी. सिरीअस केस म्हणून त्याला बघायला सारी डॉक्टर मंडळी ताबडतोब जमली होती. त्याचं सगळं अंग घामानं डवडवलं होतं. छातीतली धडधड अखंड चालू होती. श्वासोच्छ्वास मधेच केव्हा तरी खंडित होत होता. अन् मग घबराट सुरू होत होती. डॉक्टर काळजीपूर्वक हार्टबीट्स् ऐकत होते.

' हार्टबीट्स् नॉर्मल, रेग्युलर. लिव्हर नॉट पाल्पेबल. नो टेंडरनेस इन् दी लिव्हर रीजन. नो स्वेलिंग ओव्हर दी फीट. नो एडिमा. नो साइन्स, ऑफ कन्जेस्टिव्ह कार्डियक फेल्युअर. लंग्ज क्लिअर. बी. पी. नॉर्मल.' – हाऊससर्जन भराभर नोट्स् घेत होता. फिजिशिअन अशी अक्षरं ॲप्रनवर असलेला सोनेरी फ्रेमचा चष्मा लावल्यामुळे गंभीर वाटणारा तो डॉक्टर भराभर पण काळजीपूर्वक तपासणी आटोपत होता. तपासत असतानाच त्याचे बोलणेही चालू होते–

' नो कन्जेशन इन् दी लंग्ज. दो दि पेशंट इज ब्रेथलेस. आर यू रायटिंग ?'

' येस् सर. '

' प्रोफ्यूज स्वेटिंग अँड पाल्पिटेशन, जर्कस्, रिफ्लेक्सेस नॉर्मल. नथिंग रांग वुअिथ दि कॉर्डिओ व्हॅस्क्युलर ऑर दि नर्व्हस ऑर दि रेस्पायरेटरी सिस्टीम्स्. प्रॉबेब्ली ही हॅज एन्क्झायटी न्युरोसिस. एनी वे गिव्ह हिम् अ प्रिक् ऑफ डायझिपाम टू सी. सी. स्टॅट. रेस्ट ऑफ दि थिंग्ज टुमॉरो. ओ. के. ?'

' ओ. के. सर. थँक्यू अँड गुड् नाईट.'

' ओ. के. यंग मॅन. डोंच्यू वरी नाऊ. यू वुअिल बी ऑल राअिट.'

' पण डॉक्टर. तो घुसमटलेल्या स्वरात म्हणाला– ' मला काय झालंय तेच कळेनासं झालंय. आतापर्यंत मी कधीही आजारी पडलो नाही. काय आहे तरी काय हे, सांगा ना डॉक्टर प्लीज. एनि थिंग रॉंग वुअिथ माय हार्ट ? खरं खरं सांगा. मी अजिबात घाबरणार नाही. पण ही घबराट आणि छातीतली

अनुक्रमणिका

धडधड मला बिलकुल सहन होत नाही.' आणि तो चक्क रडू लागला.

'सो ? इंजेक्शन डायझिपाम अं ?' डॉक्टर.

'येस सर' हाऊस सर्जन.

दुसरा दिवस. धडधड अधून मधून होत होती. घाम बराच कमी. पण हुरहूर कायम. 'काय होतंय मला ? कशामुळे होतंय ? माझं काय होईल ? माझी मुलं लहान आहेत. पत्नी अशक्त, नेहमी आजारी. तिचं काय होईल ? बापरे ! पुन: धडधड, घाम ! दातखिळी. पळा पळा, धावा–धावा. डॉक्टर, सिस्टर. . लवकर. . .पुन्हा एकदा शांतता. मेडिकल युनिट पूर्ण हजर. सिनिअर असोसिएट फिजिशिअन्स. रजिस्ट्रार्स, हाऊस सर्जन्स आणि स्टूडंट्स्.

'अॅन इन्टरेस्टिंग केस इन्डीड.'

'येस, सर.'

'अॅपरंटली इट् लुक्स लाइक अ केस ऑफ एन्क्झायटी न्युरोसिस. बट ही शुड् बी थरोली इन्व्हेस्टिगेटेड. गेट हिज कोलेस्टेरॉल, सी. बी. सी. ब्लड शुगर, युरीन, स्टूल्स, लिव्हर फंक्शन टेस्ट्स् डन. गेट हिज एक्स रे चेस्ट ऑल्सो.'

'येस सर.'

तिसरा, चवथा, पाचवा, सहावा, सातवा दिवस, सर्व मेडिकल युनिट पूर्ण लवाजम्यासह हजर. 'वेल–जंट्लमन, हाऊ आर् यू ? वेल् अं ?' बोलता बोलता इन्व्हेस्टिगेशन रिपोर्टस् चाळणं चालू. 'अच्छा तर आता सगळे रिपोर्टस् आले आहेत. आणि आय अॅम हॅपी टु टेल यू, यू आर परफेक्टली ऑल राईट !' 'थांबा डॉक्टर, मला 'ऑल राईट' म्हणून डिक्लेअर करण्यापूर्वी माझं पूर्ण ऐकून तरी घ्या. मला स्वत:लाच अनेक वेळा असं वाटतं की आपण पूर्णपणे नॉर्मल आहोत आणि काही क्षणांनीच धडधड, घबराट आणि घाम सुरू होतो. हातापायांना मुंग्या येतात, डोक्याला बधीरपणा येतो, डोकं जड होतं. काही आजार असल्याशिवायच ही लक्षणं होतात का ?'

डॉक्टरांनी स्मितपूर्ण नजरेनं सर्वांकडे पाहिलं. 'येस् ? गो ऑन.' 'तर डॉक्टर, आयुष्याची जवळ जवळ पस्तीस वर्षे मी निरोगीपणे काढली. कुठलाही रोग मला झाला नाही. आणि आताच हे काय सुरू झालंय, कळत नाही. सगळ्या हातपायांना मुंग्या येतात. बधीरता येते. छातीत धडधड होते, तिची तीव्रता इतकी वाढते की हृदयाचे ठोके नखांच्या टोकापर्यंत आणि दातांपर्यंत जाणवतात. आजचंच बघा ना. दुपारपर्यंत मी ठीक होतो. या खिडकीतनं करमणूक म्हणून सहज समोर दिसणाऱ्या शेतातल्या विहिरीकडे बघत होतो. त्या विहिरीकडे काळजीपूर्वक पाहिलं असताना माझ्या लक्षात आलं की ती विहीर जुनी, पडित असली तरी फारच सुंदर रीतीने बांधलेली आहे. तिचा चबुतरा आणि आजुबाजूचा भागही अवशेषरूपानेच शिल्लक असला तरी फारच कलात्मक आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने बांधलेला होता. ते दृश्य पाहात असतानाच एके काळी हा परिसर किती सुंदर दिसत असेल, याचं काल्पनिक दृष्य डोळ्यांसमोर क्षणभर उभं राहिलं. आणि दुसऱ्याच क्षणी त्या बांधकामाचे आता फक्त अवशेषच उरले आहेत अशी जाणीव झाली. तेवढं निमित्त झालं आणि लगेच धडधड नि घबराट सुरू झाली. माझे हात पाय किती गार पडलेयत, ते बघितलेत ना ? मी अजिबात खोटं बोलत नाही, डॉक्टर. खरोखर जो त्रास मी भोगतोय, तोच मी तुम्हाला सांगतोय. यातलं काहीही काल्पनिक नाही. तुमचे रिपोर्टस् ठीक आहेत. पण मला त्रास होतोय, हेही तेवढंच खरंय.'

'येस्. येस्. यू आर परफेक्टली राईट. तुम्ही खोटं बोलताय, असं मी कधी म्हटलंय ? मी फक्त एवढंच म्हटलं की तुमचे सगळे रिपोर्टस् नॉर्मल आहेत. त्याच बरोबर तुम्हाला त्रास होतोय, हेही मी मान्य करतो. वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टिकोनातून मी तुमच्या आजाराचं थोडं फार स्पष्टीकरण देऊ शकेन. . . . .' त्याची नजर डॉक्टरांच्या चेहऱ्यावर स्थिर झाली होती.

'तर मी काय सांगत होतो – माणूस तरुण असताना त्याच्यात एक जोम असतो, एक उत्साह असतो. त्या उत्साहाच्या मानाने जबाबदाऱ्या कमी असतात. पण तो जसजसा वयाने वाढत जातो, तसतशी भौतिक जगातली अस्वस्थता, काळजी त्याला घेरू लागते. केवळ शारीरिक कष्ट करण्याची क्षमता जरी त्याच्याजवळ असली, अंगावर दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात पडत जाणाऱ्या जबाबदाऱ्यांचा ताण त्याच्या मनाला सोसवत नाही. . .'. त्याची नजर

अजूनही डॉक्टरांच्या चेहऱ्यावरच स्थिरावलेली असते. डॉक्टरांनी दाढी केलेली नसते. दाढीच्या वाढलेल्या काळ्या खुंटांतून मधूनच पांढरे खुंट डोकावत असतात. सोनेरी फ्रेमच्या चष्म्यामुळे त्यांच्या चेहऱ्याला आलेल्या गांभीर्यात पांढऱ्या खुंटांमुळे अधिकच भर पडलेली असते. हिप्नॉटिझम करणाऱ्या व्यक्तीच्या डोळ्यांनी आकर्षून घ्यावी तशी त्या पांढऱ्या खुंटांनी त्याची नजर वेधून घेतली होती.

'आणि शेवटी मनातल्या अनिश्चितपणाशी जो लढा यशस्वीपणे तो आजवर देत असतो, त्या लढ्यातल्या पराभवाची छाया त्याच्या मनाला झांकोळून टाकते'...डॉक्टर अभ्यासू मुद्रेनं बोलत राहातात. त्याच वेळी त्याच्या मनात विचार येत राहातात, 'डॉक्टरांचं वय किती असेल ? त्यांच्याही मागे माझ्यासारख्या काळज्या असतील काय ?' त्याच्या काळ्याशार दाट केसांचा त्याला किती अभिमान होता ! आणि एक दिवस केस विंचरताना त्याला अचानक पांढरा केस दिसला. पहिला, दुसरा, तिसरा...आणि मग अनेकानेक पांढरे केस दिसू लागले. त्यात भर पडली चेहेऱ्यावर नुकत्याच दिसू लागलेल्या सूक्ष्म सुरकुत्यांची.

'आयुष्यातल्या निश्चितता आणि अनिश्चितता यांच्या मधोमध स्थिरावणारा काटा अनिश्चिततेकडे झुकू लागतो आणि प्रौढत्वात प्रवेश करीत असल्याची चाहूल मनाला अस्वस्थ करून टाकते आणि मन व शरीर यांतील समतोल जाऊन निरनिराळी शारीरिक लक्षणं दिसू लागतात. असं झालं की त्याचा ग्रह होऊन बसतो की आपल्याला एखादा मोठा रोग झाला आहे. आणि वैद्यकीय दृष्ट्या तर शरीरात काहीच दोष आढळत नाही. अशा या विकाराला आम्ही 'एन्क्झायटी' म्हणतो...'

डॉक्टरांचे बोलणे त्याच्या कानावर कितपत गेले आणि त्यापैकी त्याला कितपत समजले हे त्यालाच ठाऊक. कारण त्यावेळी तो गार पडत चाललेल्या हातपायांच्या चिंतेत व्यग्रचित्त होता. तळहात पायांना येत चाललेल्या मुंग्या डोक्याचाही तावा घेण्याच्या बेतात होत्या.

रोज राऊंडच्या वेळी डॉक्टर त्याला 'एन्क्झायटी'चे तत्वज्ञान सांगायचे. 'विचार करणे अजिवात सोडा, काळजी मुळीच करू नका, लवकर वरे व्हाल' म्हणून आश्वासन द्यायचे पण लगेच असेही सांगायचे की, 'कित्येकदा माणूस ह्या काळज्या, विचार करणे इत्यादी सिसिअरली विसरण्याचा प्रयत्न करतो. पण ती हुरहुर, काळजी मन अगदी सवकॉन्शस लेव्हलला असताना गुपचुप मनात प्रवेश करते.' अर्थात डॉक्टरांच्या या सर्व सांगण्याचा त्याच्यावर फारच थोडा परिणाम व्हायचा. कारण त्या वेळी त्याचे मन नाना प्रकारच्या विचारांनी चिंतांनी व्यापून टाकलेले असायचे. या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात विषयांना वाण नव्हती. क्षणाक्षणाला नवीन विचार, नवीन काळजी, नवीन विकार, नवी औषधे, नवी इंजेक्शने, नवीन आश्वासने. हॉस्पिटलात अॅडमिट होऊन महिना झाला, तरी म्हणण्यासारखा फरक त्याला प्रकृतीत वाटत नव्हता. पण रोग्यांचे विव्हळणे, ग्लुकोजच्या वाटल्या, औषधे, डॉक्टर्स, नर्सेस यांनी भरलेल्या या वातावरणातच त्याला सुरक्षित वाटत होते.

शेवटी आज सकाळी डॉक्टर राऊंडला आल्यावर म्हणाले होते, 'तुम्ही आता पूर्ण निरोगी आहात. आता खुशाल घरी जा. तुमच्या मुलावाळांत मिसळा, आनंदात राहा. अजिवात काळजी करू नका. आणखी पन्नास वर्षे तरी तुमच्या जिवाला धोका नाही. मधेच काही कमीजास्त झाले तर आम्ही जबाबदार आहोत. बस ? सिस्टर उद्या सकाळी यांना डिसचार्ज द्यायचा हं. डिसचार्ज कार्ड तयार करून ठेवा.'

त्याच्या 'हो – नाही'ची वाट न पाहाता डॉक्टर पुढच्या बेडकडे गेले. आणि त्याचं मन निराशेनं भरून गेलं. त्याला जे काही होत होतं, त्याचा उपाय या प्रचंड आणि अत्याधुनिक हॉस्पिटलात नव्हता. हे सगळे बडे बडे एम्. डी., एम्. आर. सी. पी. डॉक्टर्स त्याच्या दृष्टीने निरुपयोगी ठरले होते. त्याच्या मनाला आश्वासन देण्यात या सर्व भौतिक शक्ती असमर्थ ठरल्या होत्या. "हेल्पलेस ! हेल्पलेस !! आता या हॉस्पिटलात राहायचे नाही. उद्या सकाळी नक्की निघायचे. डॉक्टरांनी 'राहा' म्हटले तरी थांबायचे नाही. पण जायचे कुठे ? पुन: धडधड वाढली तर ? पुन: घाम आला तर?" स्क्रू पिळला जात होता. टेन्शन वाढत जात होते. भुंग्याने लाकूड पोखरावे तसे ड्रीलिंग मेंदूत आत आत जात होते. टण्. टण्. टण्. रात्रीचे तीन वाजले होते. अजून दोन तासांनी पहाट होणार होती. ती धडधड,

घबराट बंद होणार होती. सिस्टर्स येणार होत्या. हॉट वॉटर बॅग्ज गार हातापायांखाली ठेवणार होत्या. डायझिपामचे इंजेक्शन देणार होत्या. मग घबराट, घडघड कमी होणार होती. पण तोपर्यंत? दोन तास कसे जातील? कसे जातील??? ओह् गॉड्! आय ॲम हेल्पलेस्! हेल्पलेस!!

रसिक पत्रे

'समीक्षा' – म्यु. कॉलनी, पुणे ४
१०–११–७६

प्रिय डॉ. आष्टीकर,

स. न. वि. वि.

युगवाणीचा दिवाळी अंक वाचला. त्यातील लेख विदर्भ साहित्य संघाच्या प्रतिष्ठेस शोभतील असेच आहेत. मला अंक व आपले संपादन आवडले.

आपला

रा. श्री. जोग.

१४९६, सदाशिव, पुणे ३०
४–११–७६

स. न. वि. वि.

युगवाणीचा दीपावली विशेषाङ्क वाचला. दर्जेदार साहित्याने तो नटलेला आहे. मला आवडला. कृपालोभ असावा ही विनंती.

आपला

य. दि. पेंढरकर (यशवंत)

मासिक 'वसंत', मुंबई–४
१६–११–७६

सा. न. वि. वि.

युगवाणी दिवाळी अंक मिळाला. चांगला भारदस्त व वैशिष्टयपूर्ण वाटला. आपण संपादक झाल्यापासून युगवाणीचे स्वरूप चांगले झाले आहे याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन!

बाळशंकर देशपांडे
संपादक.

कवी – शेमा हराळे
रिपीटर स्टेशन कॅम्प, अमरावती
१६–११–७६

कृतानेक सा. न.

सहजी 'युगवाणी'चा दिवाळी अंक दृष्टिपथात आला. अंतर्यामी 'काव्यक्षेत्री' आपलाही मोहोर अवलोकून मनस्वी तृप्ती ओटंगली. 'युगवाणी'चे आजचे हे सुबक नि निर्मळ रूप (वाङ्मयीन लेणं ल्यालेलं) पाहून सर्वप्रथम नजरेत आली ती आपली सोज्ज्वळ मूर्ती. ही 'युगवाणी' ही आपल्या स्मरणरीतीचेच एक माप. नव्या–जुन्याचे समसमायोजन अतिशय चपखलपणे आपणच करू जाणे. आपले अभिनंदन!

शेमा हराळे

दिवा एक विझताना

नीलकृष्ण देशपांडे

आयुष्य आता झुकलेले दाटल्या संध्याछाया डोळाभर
आठवणींची निरांजने थरारली अंधारताना क्षणभर
उलगडत गेले पापुद्रे साऱ्या जीवनाचे आमरण
झुगारलेली निमंत्रणे आमंत्रिली रचताना सरण
शोधावे संदर्भ की जपावे रामनाम डोळे मिटताना
अघांतरीच तरीही जीव सारे सारे संपताना
कमाई की पुण्याई ? काय आतापर्यंत मिळवलेले
दिवा एक विझताना मरण अवघे सजलेले.

अनुक्रमणिका

निकाय : सर्वंकष क्रांतीचे अक्षर पीठ

ह. चं. घोंगे

डॉ. मधुकर वासनिक आणि डॉ. भाऊ लोखंडे यांच्या संपादनाखाली विद्रोही भावनेच्या अभिव्यक्तीचे 'निकाय' नागपुरातून प्रकाशित होत आहे. कोणत्याही साहित्यकृतीला प्रांतिक अस्मितेची बंधने नसावीत हे जरी स्वीकृत केले गेले तरीपण निर्माण होणाऱ्या साहित्यकृतीत, निकटच्या परिसरातील भाव, भावना, वेदना, जीवन आणि जाणीवा यांचे रंग अपरिहार्यपणे उमटत असतात. 'निकाय'चे संपादन ह्याला अपवाद ठरू शकत नाही. किंवा 'निकाय'च्या संपादकांनी प्रादेशिक कुंपणे काही काळ धरून ठेवणे अधिक हितावह आहे.

निकाय हे विदर्भातून प्रकाशित होणारे नियतकालिक आणि संपादकांच्या जीवनाचे पिंड आणि मनाचे आकार विदर्भाच्या मातीत घडलेले आहेत. औद्योगिक क्रांतीचे संदर्भात विदर्भ हा पश्चिम महाराष्ट्रापेक्षा मागासलेला असल्यामुळे येथील मालगुजारी संस्कृतीने दलितांना जे गुलामीचे जिणे दिले त्या वेदनेविरुद्ध टाहो फोडण्याचे धैर्य वैदर्भीय जनतेला अगदी अलिकडच्या काळात आलेले आहे. विदर्भातील दलित प्रबोधन नुकतेच आरंभ झालेले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील विद्रोहाने आता समायोजनाची वाट धरली असावी असे वाटते. अक्षरे हळुवार होत आहेत. या हळुवार अभिव्यक्तीची जाणीव बाबुराव बागुलांच्या कथेतून नेहमीच प्रत्ययास येते. बागुल तेवढे तीक्ष्ण वाटत नाहीत.

विद्रोही वृत्ती थकल्यानंतर ज्यावेळी समायोजनाचे तत्त्वज्ञान पांघरते त्यावेळी क्रांती उत्क्रांतीत परिवर्तित होते आणि बदलू पाहणाऱ्या समाजरचनेवर पुन्हा परंपरेची बुरशी धरते. समाजातील, संस्कृतीतील विसंगतीवर कठोर प्रहार करणारे साहित्य अशा वेळी आवश्यक ठरते. 'निकाय'ने काळाची ही अपरिहार्य गरज लक्षात घेतली आहे. विद्रोही मनाच्या अभिव्यक्तीला निकायने व्यासपीठ दिलेले आहे. समाजप्रबोधनात निकायचे कार्य या दृष्टीने मोलाचे ठरणारे आहे. प्रत्येक क्रांतीमागे एक विद्रोही विचार असतो आणि प्रत्येक क्रांतीतून एक नवा विद्रोही विचार रूढ होत असतो—बदनाम राजसत्तेविरोधात क्रांती करण्याचा विचार, व्होलटेरने दिला आणि फ्रान्सच्या राज्यक्रांतीतून लोकशाहीचे नवे तत्त्वज्ञान जन्मास आले. डॉ. आंबेडकरांनी दलितांना क्रांतिप्रवण केले. पण या क्रांतीतून कोणती समाजरचना अभिप्रेत आहे याचे दर्शन डॉ. आंबेडकरांच्या अनुपस्थितीत निकायसारख्या नियतकालिकांना करावयाचे आहे आणि निकायने हे उत्तरदायित्व समर्थपणे आणि यशस्वीपणे स्वीकारले आहे.

निकाय मध्ये नवकवींची स्वप्नांची अर्थहीन दुनिया नाही. निकायमध्ये निरर्थक आणि भुलावण देणाऱ्या शब्दगंधांनी नटलेल्या शून्य समीक्षा नाहीत. उच्च मध्यमवर्गीयांच्या अतृप्त वासनांवर आधारलेल्या ललित कथा नाहीत.

तात्पर्य निकायमधून प्रसिद्ध होणाऱ्या कलावंताचे साहित्य हे केवळ कलावादी नाही, ते जीवनवादी आहे. निकायच्या दिवाळी विशेषांकात (१९७६) डॉ. अ. ना. देशपांडे यांनी जी समीकरणे मांडली आहेत ती या दृष्टीने मननीय आहेत. डॉ. देशपांडे म्हणतात की 'कलावादात कृतघ्नता आहे,' 'कलावादात अज्ञान आहे.' पण त्या पलिकडे जाऊन सांगता येईल की कलावाद हा श्रीमंती, भोगवादी, अशा आळशी आणि दुबळ्या मनाचा निरर्थक खेळ आहे. जो केवळ कलावादी असतो तो डॉ. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे समाजाचे संदर्भात कृतघ्न तर असतोच पण तो वृत्तीने तेवढाच कृतघ्न आणि विचारांनी कृपण असतो.

निकायच्या दिवाळी अंकातील परिसंवाद हा निकायच्या तत्त्वज्ञानावर भाष्य करण्यासाठीच आयोजिलेला आहे असे वाटते. विशेष म्हणजे डॉ. लोखंडेंनी ह्या परिसंवादात प्रोफेसर मुक्तिबोधांना लिहिते केलेले आहे. डॉ. अ. ना. देशपांडे प्रांजळ वाटतात. पण त्यांचा

लेख अर्थपूर्ण आहे. प्रोफेसर मुक्तिबोधांनी दलित वाङ्मयाचा दलित जाणीवेशी संबंध लावलेला आहे. दालित्य हे जातिनिरपेक्ष असावे. अन्यथा विद्रोही विचाराच्या संसारात दलित साहित्याची पुन्हा एक वेगळी जात चोखोबासारखी साहित्य-मंदिराच्या द्वारावर बसून राहील अशी भीती वाटते. डॉ. द. भि. कुळकर्णींचा लेख निरर्थक शब्दबंबाळ शैलीचा अर्थहीन नमूना म्हणून अगदी उत्कृष्ट आहे.

निकायचे संपादक हे नुसतेच गोजिरवाण्या कविता करणारे स्वप्नरंजनी कवी नाहीत. डॉ. भाऊ लोखंडे यांचा 'बुद्धाची बदनाम अहिंसा' हा लेख त्यांच्या व्यासंगाची साक्ष देणारा आहे. बौद्धांच्या अहिंसावादी तत्त्वज्ञानाने भारतीय भूमीला परकीयांच्या स्वाधीन केले असा एक महत्वाचा वाटणारा विचार इतिहासात रूढ झाला होता. डॉ. लोखंडे यांनी या विकृत इतिहासाची साक्ष काढलेली आहे.

प्रा. मनोहरांच्या दीर्घ कविता या निकायचा विशेष म्हणून उल्लेखित करण्यासारख्या आहेत. मनोहरांच्या दोन दीर्घ कविता निकायतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. महन्मंगले पशुदेवते ही व्हॉल्टेअरची कविता मननीय आहे. मौन पांघरून बसलेल्या पोटार्थी दांभिक संस्कृतीच्या दलालांवर त्यात कोरडे ओढलेले आहेत.

निकायचे अंक चाळलेत तर त्यातून निकायच्या साहित्य जीवनाची उत्क्रांती दिसू शकते. दलित साहित्य संसदेची मुखपत्रिका म्हणून तिचा जन्म झाला. दलित साहित्य संसदेला नाही म्हणावयास दलित जातीचे पांघरूण होतेच. पण संपादकांनी निकायची भूमिका स्पष्ट केली. 'बुद्धिवाद व विद्रोह सर्वगामी आहे त्याला धर्म जात भाषेची मर्यादा नाही' (अंक १). या भूमिकेसाठी निकायने दलित जातीचा त्याग केला आणि दलित जाणीव स्वीकृत केली. दलित साहित्य संसदेने अधिक विशाल व्हावयाचे ठरविले. ती 'सम्यक् विचारांची संसद' म्हणून नांदू लागली.

निकाय जे प्रगट होते ते मुखपृष्ठापासूनच. हेमंत नागदेवेची मुखपृष्ठावरील सजावट, ही देखील विद्रोही भावनेचे चित्रण करणारी असते.

निकाय हे रंजल्या गांजल्यांचे अमोघ अस्त्र ठरेल. निकायला मानवाची दुःखमुक्ती मोलाची वाटते. (अंक २ रा). या संदर्भात निकायचे ऋण दुःखी मानवाने मान्य करावयास हवे. मानवतेचे प्रश्न सोडविणारी वृत्तपत्रे फारशी अस्तित्वात नाहीत. संस्कृतीच्या गीतांनी पोट भरते यासाठी नवा विचार दडपून टाकण्याची इकडच्या अनेक वृत्तपत्रांची मार्जारी नीती. भोळ्या भाबड्या जनतेला डोळे उघडू द्यायचे नाहीत यासाठी नव्या संशोधनाचा सदैव उपहास. या प्रसिद्धीच्या साधनांवर कलावाद्यांचे पोट आहे, नियंत्रण आहे. निकायने मात्र मानवी जीवनाच्या समस्यांना अभिव्यक्त करावयाचे ठरविले आहे. यासाठीच 'सर्वकष क्रान्तीचे अक्षरपीठ' म्हणून निकायने नेतृत्व स्वीकारले.

निकायमध्ये प्रसिद्ध झालेले सारेच साहित्य विद्रोही आहे. प्रा. जनबंधूंची कथा (अंक ३ रा) उल्लेखित करावीशी वाटते. कारण कथेच्या क्षेत्रात हे नाव फारसे प्रसिद्ध नाही. बाबुराव बागुलांच्या ललित लेखनाविषयी अधिक ते काय सांगायचे? बागुलांचे लेखन निकायचे एक आकर्षण ठरते. हि. ल. कोसारे यांचा डॉ. मिराशींना आव्हान देणारा लेख विद्रोहीच म्हणावा लागेल. प्रा. कुरुंदकरांचे नाव निकायात झळकले आहे पण त्यांचे लेखन मनःपूर्वक नाही. प्रा. सौ. पावडे यांच्या लेखातील आशय अत्यंत महत्त्वाचा आहे पण लेखाची शैली मात्र त्यातील आशयाला अनुरूप नाही. डॉ. मधुकर आष्टीकरांचा लेख शैलीयुक्त आणि माननीय आहे (अंक ३). विदर्भातील प्रसिद्धीची साधने अत्यल्प आहेत. आहेत ती एका विशिष्ट विचारसरणीचा पाठपुरावा करणारी आहेत. यासाठी विद्रोही अभिव्यक्तीला मुक्त वाट देण्यासाठी निकाय तत्पर आहे ही अशांत मनाला दिलासा देणारी घटना आहे.

निकायचे संपादन निःपक्ष आहे. एखादी साहित्यकृती ज्यावेळी नियतकालिकांच्या स्वरूपात जन्माला येते त्यावेळी त्या भोवती कांही मित्र-लेखकांचे वर्तुळ तयार होते. महाराष्ट्रातल्या साहित्य पत्रिका, साप्ताहिके मासिके यातील लेखनाचे फेर धरणारे लेखक ठरलेले असतात. निकायच्या संपादकांनी लेखक मित्र जोडलेले दिसत नाहीत. म्हणूनच निकायातील विद्रोहाचे शब्द व्यक्तिपरत्वे बदलतील अशी अपेक्षा.

निकायचा एक विशेष जाणवतो. निकायमध्ये तरुण सुंदरींच्या प्रीती स्पंदनाला संपादकांनी स्थान

दिलेले नाही. या स्पंदनाचा अनुनय करणारी आधाशी वृत्ती संपादकाने पूर्णतः दूर ठेवली आहे. निकायचे लेखन त्यामुळे जेवढे विद्रोही त्यापेक्षा अधिक निरोगी, त्याहीपेक्षा अधिक निर्मळ वाटते. तिथे कामातुरांच्या कामनाविष्काराला रतिभर जागा मिळू नये हीच अपेक्षा.

कर्पूरवडी

प्रमिला भागवत

त्या मधुर क्षणांच्या पाऊलखुणा
मी जपून ठेवल्याहेत हृदयात नीट
त्या रेशीमगाठी, ती मनाची संदने
ते फुललेले वसंत, ती कोकिळकुजने
त्या नीरव रात्री, ती सोनेरी स्वप्ने
   साऱ्या साऱ्यांचा
होतास ना तू साक्षी ? माझ्या जिवलगा !

   आता सारीच नक्षी
पुसट होत गेली आहे ह्या काळाच्या घोडदौडीत.
   खरंच तू कुठला ?
अन् मी तरी कुठली ?
   क्षणभराने
विझणारच आहे कर्पूरवडी
माझ्याही आरतीतली.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (१ आक्टोबर १९७६ ते ३० नोव्हेंबर १९७६)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ कार्यकारी मंडळाची १८ वी सभा (१९७६–७७ ची चवथी सभा) दि. ७–११–७६ ला वणी येथे भरली. सभेत आरंभी, इतिहास संशोधक कै. दे. गो. उपाख्य बाबाजी लांडगे व नाटककार कै. वा. वा. उपाख्य तात्यासाहेब भोळे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर खालील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. (१) वि. सा. संघाच्या कार्यकारिणी सभासदांची १९७७–७८ ते १९७९–८० या आगामी त्रैवार्षिक निवडणूकीसाठी घटना कलम १२ (ऐ) अन्वये नागपूरचे ॲडव्होकेट श्री. पांडुरंग बाळकृष्ण गडकरी यांची 'निर्वाचनाधिकारी' म्हणून नियुक्ति करण्यात आली. (२) चिखली येथील वि. सा. संघाच्या शाखासभेने, १९७६ सालाचे वि. सा. संघाचे विदर्भ साहित्य संमेलन चिखली या ठिकाणी भरविण्यात यावे अशी विनंती केली. त्या विनंतीला सभेने मान्यता दिली. (३) मूर्तिजापूर येथे स्थापन झालेल्या वि. सा. संघाच्या शाखा सभेला मान्यता देण्यात आली.

१.२ नवीन आजीव सभासद :

(१) श्री. प्रभाकर श्रीकृष्ण गाडगीळ, नागपूर.

(२) श्री. नरेश महेश्वर गद्रे, नागपूर.

(३) श्री. के. वालमुकुंद, नागपूर.

२. सांस्कृतिक कार्यक्रम

२.१ **राष्ट्रीय लेखक संघाचे संमेलन** – राष्ट्रीय लेखक संघाचे 'महाराष्ट्र संमेलन' नागपूर येथे वि. सा. संघाच्या विद्यमाने दि. १६ व १७-१०-७६ या दोन दिवशी आयोजित करण्यात आले. खासदार श्री. यशपाल कपूर अध्यक्ष होते. संमेलनप्रसंगी श्री. जेमिनी कडू यांनी प्रा. केशव मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या सामाजिक जाणीवा' हा स्वतःचा अभ्यास लेख वाचला. ह्या संमेलनाच्या अंतर्गत एक परिसंवाद आणि विदर्भ लेखक शिबिर हे कार्यक्रम होते, आणि वैदर्भीय लेखकांच्या ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

२.२ **श्री शिव छत्रपती शलाकाशिल्प** हे शलाकाशिल्प श्री. अनिल मनोहर आणि सौ. नील अनिल संवत्सर यांनी श्री. विलास बजरंग भिंगारदेवे (चित्रकार), श्री. मणिरामजी विश्वकर्मा (मिस्त्री), श्री. श्रीराम मोतीराम राऊत व श्री. शामराव दिनाजी खाणकुरे (अपंग कारागीर) यांच्या सहाय्याने नागपूरच्या अपंग सेवा उद्योगाच्या कार्यागारात बनविले.

विदर्भ साहित्य संघाच्या श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या उभारणीचा आरंभ प. वा. श्री. पु. बा. आणि सौ. अनसूयाबाई काळे यांनी निर्माण केलेल्या 'काळे प्रतिष्ठान'च्या निधीतून मिळालेल्या भरीव आणि उदार देणगीने झाला. त्याच प्रतिष्ठानाच्या रजत जयंती निमित्त काळे कुटुंबियांनी पुन्हा तीन हजार रुपयांची देणगी 'श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला' दिली. त्या देणगीतून या शिल्पाची निर्मिती करण्यात आली.

शलाका शिल्पाचे उद्घाटन पंजाबचे मुख्यमंत्री श्री. सरदार ग्यानी झैलसिंग ह्यांचे हस्ते रविवार दि. १७ ऑक्टोबर ७६ ला झाले. उद्घाटन समारंभाच्या वेळी श्री. यशपाल कपूर आणि श्री. श्रीकांत वर्मा हे खासदार उपस्थित होते. विदर्भ साहित्य संघाचे हितचिंतकहि फार मोठ्या संख्येत उपस्थित होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात समारंभ संपन्न झाला. त्याप्रसंगी ह्या शलाका शिल्पाच्या निर्मितीस सहाय्य करणाऱ्या सर्वांचा शाल, श्रीफल व अन्य भेट वस्तू देऊन गौरव करण्यात आला.

मुख्यमंत्री सरदार ग्यानी झैलसिंग ह्यांनी अपंग कारागिरांना उत्तेजनार्थ पाचशे एक रुपयांची देणगी अपंग कारागीर श्री. श्रीराम मोतीराम राऊत ह्यांच्या स्वाधीन केली. ह्या कारागीराला सत्कारार्थ दिलेले घडयाळ खासदार श्री. यशपाल कपूर ह्यांनी त्याच्या मनगटास बांधले.

२.३ **साहित्यिक कार्यक्रम** : दि. ४-१०-७६ ला 'ग्रंथसमीक्षण' हा साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉ. सौ. शकुंतला खोत यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर प्रा. शिरीष देशपांडे यांनी 'पहिली परंपरा' या पुस्तकाविषयी विचार मांडले. सौ. सुलभा हेर्लेकर व डॉ. सनील सुभेदार ह्यांनी 'मुंबई दिनांक' या कादंबरीवर आपली मते व्यक्त केली. सर्वप्रथम संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' ह्यांनी समीक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. व शेवटी समारोपाचे भाषण केले.

काव्यदर्शन दि. १२–११–७६ ला सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध कवयित्री श्रीमती योगिनी जोगळेकर यांचे काव्यगायन झाले.

२.४ **सत्कार समारंभ** दिनांक २०-१०-७६ ला सायंकाळी ६ वाजता प्रा. मधुकर त्रिंबक सहस्त्रबुद्धे यांचे 'मौलिक मानवी प्रेरणा व मेक्सिको येथील आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेतील अनुभव' या विषयावर भाषण झाले. याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला.

दि. ४-११-७६ ला सायंकाळी ६ वाजता वणी येथील वैदर्भीय लेखिका संमेलनाच्या अध्यक्ष सौ. यमुनाताई शेवडे ह्यांचा सत्कार करण्यात आला. ह्याप्रसंगी संमेलनातील परिसंवादाच्या अध्यक्ष म्हणून डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत, काव्यदर्शन कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून सौ. उषा लिमये आणि संमेलनात महत्त्वपूर्ण भाग घेणाऱ्या श्रीमती योगिनी जोगळेकर व सौ. वसुंधरा पटवर्धन ह्यांचाहि गौरव करण्यात आला. डॉ. आष्टीकर ह्यांनी आभार मानले.

वैदर्भीय लेखिका संमेलनाच्या उद्घाटक सौ. गिरजा कीर, मुंबई, ह्यांनी विदर्भ साहित्य संघाला दि. ९-११-७६ ला भेट दिली. त्यावेळी अनौपचारिकपणे साहित्यविषयक चर्चा झाली आणि त्यांचा सत्कार करण्यात आला.

३. प्रकट शोकसभा

३.१ सुप्रसिद्ध नाटककार वा. वा. उपाख्य तात्यासाहेब भोळे यांचे दि. ४-१०-७६ ला मुंबई येथे निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि. २६-१०-७६ ला प्रकट शोकसभा आयोजित करण्यात आली. शोकसभेत श्री. शंकरराव कुळकर्णी, डॉ. मेने, ॲड. गोवर्धनदास अग्रवाल, श्री. वसंत वरखेडकर, डॉ. मधुकर आष्टीकर, डॉ. श्यामलाबाई चितळे व डॉ. सौ.

शकुंतलाबाई खोत ह्यांनी आपल्या भाषणात प. वा. दादासाहेब भोळे ह्यांच्या नाट्यक्षेत्रातील कार्याचा गौरव केला आणि शोकसंवेदना व्यक्त केली. श्री. आ. ग. देशपांडे 'अनिल', अध्यक्ष यांनी शोकप्रस्ताव वाचून दाखविला आणि उपस्थितांनी उभे राहून मौन श्रद्धांजली अर्पण केली.

३.२ दि. २७-११-७६ ला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक व पत्रकार श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांचे देहावसान झाले. त्यांच्या दुःखद निधनाची वार्ता कळताच वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) व सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी त्यांच्या घरी जाऊन संघातर्फे पुष्पमाला अर्पण करून शोकसंवेदना प्रकट केली. त्यांचे अंत्य-दर्शनासाठी त्यांची शवयात्रा संघाच्या प्रांगणात दुपारी ११॥ वाजता आली असता त्यांच्या पार्थीव देहावर उपाध्यक्ष श्री. त्रि. गो. देशमुख आणि श्री. बाबुरावजी धनवटे यांनी पुष्पमाला अर्पण केली.

दि. २८-११-७६ ला सायंकाळी ६ वाजता कै. भाऊसाहेब माडखोलकरांच्या निधनानिमित्त श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांचे अध्यक्षतेखाली संघाच्या प्रांगणात प्रकट शोकसभा आयोजित करण्यात आली. आरंभी संघाध्यक्ष अनिल यांनी आचार्य वसंत परब यांनी रेखांकित केलेल्या कै. भाऊसाहेबांच्या चित्राला पुष्पहार अर्पण केला. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते, श्री. श्रीधर बाळकृष्ण रानडे (सदस्य, रविकिरण मंडळ), प्राचार्य म. ना. अदवंत (उपाध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद), श्री. मा. ज. कानेटकर, श्री. पुरुषोत्तम दि. ढवळे, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. शंकरराव सुरडकर, प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रा. या. मु. पाठक, प्राचार्य डॉ. गो. मा. कुळकर्णी, प्रा. म. ना. लोही, डॉ. प्रभुदेसाई, श्री. घारपुरे व श्री. शंकरराव डहाळे यांची भाऊसाहेबांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाविषयी गौरवपर भाषणे झाली. अध्यक्षांनी शोकप्रस्ताव वाचून दाखविला व उपस्थितांनी उभे राहून मूक श्रद्धांजली अर्पण केली.

३.३ **कै. वि. रा. हंबर्डे स्मृतिदिन :–** विदर्भातील सुप्रसिद्ध नाटककार प. वा. वि. रा. उपाख्य भाऊसाहेब हंबर्डे यांच्या तेराव्या स्मृतिदिन समारंभाची रूपरेखा आखण्यासाठी दि. ९-११-७६ ला सायंकाळी साहित्यप्रेमी सभासदांची बैठक भरविण्यात आली. आणि त्यानुसार दि. १९-११-७६ ला हंबर्डे स्मृतिदिन श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या सभेत प्रा. म. ना. लोही, श्री. रामराव बाळबुधे, श्री. नाना रेटर व डॉ. मधुकर आष्टीकर यांची भाषणे झाली. याच सभेत प. वा. हंबर्डे ह्यांच्या स्मारक कार्यासाठी तीनशे रुपयांची आश्वासने देण्यात आली. श्री. विजय हंबर्डे ह्यांनी संघाला प. वा. वि. रा हंबर्डे ह्यांचे छायाचित्र भेटी-दाखल दिले.

४. नाट्यसमिती :

दि. ५-११-७६ ला 'रंगभूमीदिन' साजरा करण्यात आला. डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांनी रंगभूमी विषयक प्रश्नावर आपले विचार प्रकट केले.

५. संगीत समिती (स्वरमंडळ):

दि. २४-११-७६ ला डॉ. कुमार गंधर्व, सौ. वसुंधरा कोमकली व श्री. मुकुल कोमकली ह्यांनी संघाला भेट दिली. नंतर सौ. वसुंधरा कोमकली यांचे सुश्राव्य गायन झाले. साथीला सर्वश्री बबनराव आठवले व गोपाळराव वाडेगावकर होते. शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

६. शाखा सभा वृत्त :

६.१. वणी शाखा

वैदर्भीय लेखिका संमेलन : वैदर्भीय लेखिका संमेलन दि. ६ व ७ नोव्हेंबर १९७६ ला अतिशय उत्साहाने साजरे झाले. वैदर्भीय लेखिकांचे हे पहिलेच संमेलन. या संमेलनाच्या मंडपाला 'कुसुमावती देशपांडे नगर' असे नाव देण्यात आले होते. दि. ६-११-७६ ला दुपारी ३ वाजता संमेलनाचा आरंभ झाला. वणी शाखा सभेचे अध्यक्ष श्री. माधवराव सरपटवार यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर प्रा. मंजिरी देशपांडे यांनी शारदास्तवनपर गायन केले. नंतर सौ. विमलाताई गोहोकर यांनी स्वागताचे भाषण केले. सौ. गिरिजा कीर यांनी उद्‌घाटन केल्यानंतर वरोरा येथील आनंदवनाच्या सौ. साधनाताई आमटे ह्यांच्या हस्ते सन्माननीय महिलांचा सत्कार करण्यात आला. सौ. वसुंधरा पटवर्धन ह्यांनी स्मरणिकेचे आणि संमेलनाध्यक्ष सौ. यमुनाताई शेवडे यांनी डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांच्या 'सोनेरी पाने' या कथासंग्रहाचे प्रकाशन केले. सौ. यमुनाताई शेवडे यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर शाखा सभेच्या उपाध्यक्ष सौ. विजयाताई पाटील यांनी आभार मानले.

दि. ६ ला रात्री ९ वा. वणी येथील महिलांनी 'पद्मश्री धुंडीराज' ह्या नाटकाचा प्रयोग सादर केला.

दि. ७ ला सकाळी ८ वा. डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांच्या अध्यक्षतेखाली 'लेखिकांचे अनुभव विश्व मर्यादित आहे काय?' या विषयावर परिसंवाद झाला. नंतर सौ. उषा लिमये यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले. दुपारी ३ वाजता कथा कथनाच्या कार्यक्रमानंतर संमेलनाची समारोपपर भाषणे झाली. रात्री ९ वाजता सुप्रसिद्ध गायिका मालती पांडे यांचे सुश्राव्य गायन झाले.

६.२ गोंदिया शाखा सभा

दि. ३-१०-७६ ते ९-१०-७६ पर्यंत सात दिवस पं. भालचंद्रशास्त्री मुळे, नाशिक यांची श्रीमद्‌भागवतावर प्रवचने झाली. दि. २७-११-७६ आणि २८-११-७६ ला माँ योगशक्ती यांची 'योगदर्शन' आणि 'परदेश के संस्मरण' या विषयावर व्याख्याने झाली. दि.२८-११-७६ ला प. वा. गजानन त्र्यंबक माडखोलकर ह्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्या प्रसंगी श्री. रमेश ललगूणकर व प्रा. कृष्णा चौधरी ह्यांनी भाऊसाहेबांच्या गुणगौरवपर भाषणे करून शोक संवेदना व्यक्त केली. त्यानंतर शोक प्रस्ताव वाचून दाखविला व सर्वांनी उभे राहून मूक श्रद्धांजली अर्पण केली.

६.३ मूर्तिजापूर शाखा सभा :

दि. १२-१०-७६ ला या शाखेचा उद्‌घाटन समारंभ श्री. जयनारायणजी बूब ह्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. श्री. गो. रा. वैराळे ह्यांनी उद्‌घाटन केले. ह्याप्रसंगी प्रा. भाऊ भालेराव. व श्री. प्रभाकरराव उपाख्य दादासाहेब खेळकर ह्यांची भाषणे झाली. शाखा सभेच्या उपाध्यक्ष सौ. निरुपमा कुळकर्णी यांनी आभार मानले. समारंभाचे संचालन शाखा सभेचे चिटणीस विनय देशमुख ह्यांनी केले. नंतर प्रा. भाऊ भालेराव यांचे अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले.

६.४. अकोला, अकोट, उमरखेड, खामगाव, चंद्रपूर, चिखली, तुमसर, दारव्हा, बुलढाणा, यवतमाळ, ह्या शाखासभांचे कार्यवृत्त हाती आले नाही.

अनुक्रमणिका

साभार पोच

[१-१०-७६ ते ३०-११-७६ पर्यंत 'युगवाणी' ला भेटीदाखल आलेली पुस्तके]

पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव, मुंबई ३४

मखमल : राजा वढे, १ + ११६, रु. १५.

विविधज्ञानविस्तार (इतिहास व वाङ्मय विचार) : वा. ल. कुळकर्णी, १ + १७६, रु. १५.

पंडित अनंत कुळकर्णी ग्रंथागार, १८६, शनवार पेठ, पुणे ३०

अल्ला हो अकबर : ना. सी. फडके, १ + ३६७, रु. २०.

मराठी लघुनिबंधाचा जनक कोण? : ना. सी. फडके, १ + १७३, रु. १०,

इतर :

यज्ञसंभवा : सुशिला पाटील, मनोरा प्रकाशन, १८६, शनवार, पुणे ३०, १ + ११० रु. ६. **व्ययाफूल** : वासुदेव मुलाटे; साहित्यरुचि प्रकाशन, करीमपुरा बीड, १ + १००, रु. १०. **मूक** : शे. मा. शिरसाट, वंदना प्रकाशन, आनंद गृह, सुभाष रोड, कानसई रोड उल्हास नगर ४, १ + ५७ रु. ४. **धुंडिराज लिलामृत** : वा. पु. दामले, धुंडिराज महाराज कवीश्वर, सौरीशांती सोरवाग समिती, देऊळगावराजा, १ + ४९, रु. १.५०. **प्रल्हाद कथामृत** : वा. पु. दामले, श्रीराम त्रिवक उर्फ बाबुराव मेरेकर, चैतन्यवाडी, बुलढाणा, १ + ५८ रु. १. **राज वैरागी** : गो. मा. पुरंदरे, प्रभा प्रकाशन, देवनगर, खामला रोड, नागपूर १५, ४ + २७५, रु. २०.

परीक्षा समिति कार्यवृत्त (३० नोव्हेंबर ७६ पर्यंतचे)

(१) **शासनमान्य मराठी प्रवीण परीक्षा** (चूक दुरुस्ती) : **श्री रघुनाथ हरिसाधन मुकर्जी** हे ऑगष्ट/सप्टेंबर १९७६ या सत्रात झालेल्या शासकीय निम्मस्तर **मराठी प्रवीण** परीक्षेत **प्रथम श्रेणीत** उत्तीर्ण झालेत. अनवधानाने दीपावली विशेषांकात हा उल्लेख गाळला गेला याबद्दल खेद वाटतो.

—संचालक, परीक्षा समिती.

(२) द्वितीय सत्र परीक्षा १२ फेब्रुवारी ७७ पासून सुरू होत असून ह्या परीक्षेकरिता केंद्र व्यवस्थापकांकडून आवेदनपत्रे स्वीकारण्याची अंतिम तारीख १० जानेवारी १९७७ ही आहे.

आपले याकडे लक्ष वेधू इच्छितो !

सर्व सभासदांसाठी निवडणूक–विषयक सूचना

सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, दि. १–४–१९७७ ते ३१–३–१९८० ह्या तीन वर्षाकरिता विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे १६ सभासद यांच्या निवडणूकीचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहतील

१. वरील पदांकरिता पाठवावयाच्या नामनिर्दर्शक पत्रिका निर्वाचनाधिकाऱ्याचे नावे केंद्रीय कार्यालयात शनिवार, दि. २२–१–७७ सायंकाळी ७ वाजेपर्यंत पोचावयास पाहिजेत. मतदारांच्या सूचीतील कोणत्याही व्यक्तीस सभासदांची सूची (दुरुस्त्यांसहित) मधील कोणत्याही व्यक्तीचे नाव तिच्या लेखी अनुमतीसह सुचविता येईल. नामनिर्देशन पत्र जर पोष्टाने पोचते करणे असेल तर ते रजि **पोष्ट अॅकनॉलेजमेंट ड्यू** पद्धतीनेच पोचते केले पाहिजे. अशा तऱ्हेने पोचते झालेले नामनिर्देशनपत्र जर नेमलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत निर्वाचनाधिकाऱ्यास मिळाले असेल तरच ते छाननीत घेतले जाईल.

२. नामनिर्दर्शक पत्रिका केंद्रीय कार्यालयात मिळतील. नामनिर्दर्शक पत्रिकेच्या शेवटी दिलेल्या टीपेतील सूचना बंधनकारक राहतील.
रविवार दि. २३–१–७७ सायंकाळी ७ वाजता केंद्रीय कार्यालयात उमेदवारांच्या नामनिर्दर्शक पत्रिकांची छाननी करण्यात येईल. ह्यावेळी उमेदवारांना किंवा त्यांनी लेखी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

४. छाननी नंतर स्वीकृत झालेल्या उमेदवारांची यादी केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर रविवार दि. २३–१–७७ ला रात्रौ ८–३० वाजता लावण्यात येईल.
नामनिर्दर्शन पत्रिकांच्या स्वीकृती किंवा अस्वीकृती बाबत लवादाकडे तक्रार अर्ज करण्याची अंतिम तारीख शुक्रवार दि. २८–१–७७ ही राहील.
लवादासमोर पहिल्या सुनावणी करिता गुरुवार दि. ३–२–७७ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.

७. तक्रारीच्या अंतिम निकालाची तारीख शुक्रवार दि. ११–२–७७ सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील.

८. नामनिर्देशन पत्रिका परत घेण्याची अंतिम तारीख सोमवार दि. १४–२–७७ सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील.
उमेदवारी परत न घेतल्या गेलेल्या व ज्यांची उमेदवारी वैध आहे अशा उमेदवारांची यादी मंगळवार दि. १५–२–७७ सायंकाळी ७ वाजता सूचना फलकावर लावण्यात येईल.
मतपत्रिका केंद्रीय कार्यालयातून शुक्रवार दि. १८–२–७७ ला पाठविण्यात येतील.

११ सभासदांकडून मतपत्रिका केंद्रीय कार्यालयाकडे बुधवार दि. ९–३–७७ ला **सायंकाळी ७ वाजेपावेतो** पोचणे आवश्यक आहे.

१२. मतपत्रिकांची मोजणी रविवार दि. १३–३–७७ ला सकाळी वाजेपासून सुरु होईल.


१३. निवडणूकीचा निकाल रविवार दि. १३–३–७७ ला वि. सा. संघ कार्यालयात सायंकाळी ७ वाजता घोषित करण्यात येईल.

१४. [अ] घटना कलम १२ (ड) प्रमाणे तक्रार नोंदविण्याची अंतिम तारीख मंगळवार दि. २२–३–७७ सायंकाळी ७ वाजता ही राहील.
[ब] लवादाने तत्संबंधी निकाल देण्याची अंतिम तारीख सोमवार दि. २८–३–७७ सायंकाळी ७ वा. ही राहील.


टीप—निवडणुकीसंबंधीचा सर्व पत्रव्यवहार निर्वाचनाधिकारी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२, ह्या पत्त्यावर करावा. अन्य पत्त्यावर केलेल्या व्यवहाराची जबाबदारी स्वीकारण्यात येणार नाही.

पांडुरंग बाळकृष्ण गडकरी

नागपूर, १० डिसेंबर १९७६. निर्वाचनाधिकारी, विदर्भ साहित्य संघ, नागपूर.




पहिल्या वैदर्भीय लेखिका संमेलनाच्या आयोजनाबद्दल आनंद प्रदर्शित करताना
संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे, कविवर्य 'अनिल'. वणी, ६–११–१९७६



संमेलनाचे मार्गदर्शक प्राचार्य राम शेवाळकर आभाराचे भाषण करताना;
वणी, दि. ७ नोव्हेंबर १९७६

युगवाणी [Yugwani] Regd. No. 1174 M H.

वैदर्भीय लेखिका संमेलन, वणी



दीप प्रज्वलित करून संमेलनाचे उद्घाटन करताना सौ. गिरिजा कीर; सोबत कार्याध्यक्ष श्री. माधव सरपटवार. दि. ६ नोव्हेंबर १९७६

प्रकाशक : *गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२*
मुद्रक : *श्या. श्री. बनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२*